म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय वा. वा.
दा. क्र. २९६५

# पंडित जवाहरलाल नेहरू

IPBK-0102965
IRBK-0102965

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय चा. चा.
दा. क्र. २९६५.

# पंडित जवाहरलाल नेहरू

IRBK-0102965
IRBK-0102965

भारत–भाग्य–विधाता

# पं. जवाहरलाल नेहरू

## यांच्या जीवनाचें ओझरतें दर्शन

म. ग्रं. सं. ठाणें
विषय [illegible]
धा. नं. [illegible]

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २

भारत–भाग्य–विधाता

# पं. जवाहरलाल नेहरू

यांच्या जीवनाचें ओझरतें दर्शन

संग्रहालय
वा. वा.
ग्रं. क्रं. ४०८५
वाचनालय
म. ग्रं. सं. अधो, वाचना
दा. क्र. २९६५ नों. दि.
वि. ... क्र. ...
वा. वा.

किंमत सव्वा रुपया

IRBK-0102965
IRBK-0102965
०२३
२।१११८४७

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २

प्रकाशक :
दा. त्र्य. जोशी,
चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव,
पुणें २

★

मुद्रक :
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय,
२९१ शनवार, पुणें २

★

नवी सुधारलेली आवृत्ति
१४ नोव्हेंबर १९४९

सर्व हक्क प्रकाशकाधीन

# प्रास्ताविक निवेदन

भारत-भाग्य-विधाते पं. जवाहरलाल नेहरू यांच्या ६१ व्या वाढदिवशीं प्रसिद्ध होणारें त्यांचें हें चरित्र म्हणजे त्यांच्या पांच तपांच्या आयुष्याचें धांवतें सिंहावलोकन आहे. हें जीवनचरित्र मुख्यतः निवेदनात्मक पद्धतीनें लिहिलेलें असल्यामुळें त्यांत चर्चा, मीमांसा, मूल्यमापन किंवा तत्त्वशोधन आढळणार नाहीं. पंडितजींचें जीवनचरित्र शक्यतों त्यांच्या आत्मचरित्राच्या आधारें या पुस्तकांत सुसंगत रीतीनें निवेदन करण्यांत आलें असल्यामुळें तें अधिकृत आहे हें निराळें सांगण्याची जरूरी नाहीं. पं. नेहरूंच्या आत्मचरित्राखेरीज त्यांचा 'भारताचा शोध,' 'म. गांधी,' 'स्वातंत्र्य आणि त्यानंतर' इत्यादि पुस्तकांचा या चरित्राच्या कामीं उपयोग झाला आहे. इतर आधारभूत वाङ्मयापैकीं 'नेहरू युअर नेब्रर' (पी. डी. टंडन), 'जवाहरलाल, मॅन अँड हिज मेसेज्' (अल् काफीर), 'नेहरू, दि रायझिंग स्टार ऑफ इंडिया' (अनुपसिंग), पंडित जवाहरलाल (श्रीवास्तव) इत्यादि पुस्तकांचा अवश्य उल्लेख केला पाहिजे. या सर्व ग्रंथकारांचा लेखक अत्यंत ऋणी आहे.

पं. नेहरूंचीं भाषणें व व्याख्यानें इतकीं असंख्य आहेत कीं त्या सर्वांचा परामर्श घेतां येणें शक्य नाहीं. तसेंच त्यांच्या अफाट वाङ्मयाचेंही अगदीं थोडक्यांत चुटपुटतें विहंगावलोकनहि करतां येणार नाहीं. तथापि या प्रासंगिक म्हणजे प्रसंग साधून प्रसिद्ध होणाऱ्या चरित्रांत पं. नेहरूंचें जितकें सर्वांगीण दर्शन घडवितां येणें शक्य आहे तितकें घडविलें आहे. पं. जवाहरलाल नेहरू ही विभूति नसून व्यक्ति आहे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. त्याचप्रमाणें ते मुख्यत्वेंकरून एकनिष्ठ देशभक्त व ध्येयवादी मुत्सद्दी आहेत. या भूमिकेवरून त्यांच्या अमेरिकेच्या दौऱ्याचें निरीक्षण केलें तर तो हिंदी

# विषयानुक्रमणिका

९२०८३
८।७७।५३

प्रास्ताविक निवेदन
१ काश्मिरी पंडित ... ... १
२ जीवनाची पूर्वतयारी ... ... ७
३ राजकारणांत प्रवेश ... ... १३
४ अटक, शिक्षा, तुरुंगवास ... ... १७
५ अध्यक्षपदापासून पंतप्रधानपदापर्यंत ... ... २३
६ म. गांधी आणि पं. नेहरू ... ... ३२
७ पंडितजींच्या शब्दांत पं. नेहरू ... ... ३९
८ पंतप्रधानांचा एक दिवस ... ... ४८
९ व्यक्ति आणि वाङ्मय ... ... ५४
१० पंडितजींचें विविध दर्शन ... ... ७२

परिशिष्टें

अमेरिकेचा शोध ... ... ८०
पंडितजींची कुंडली ... ... ८३
ठळक प्रसंगांची सनावली ... ... ८४
पंडितजींचें वाङ्मय ... ... ८७

संग्रहालय
वा. वा.
ग्रा. क्र. ५०६
वाचनालय शाखा

राष्ट्राच्या दृष्टीनें किती महनीय, यशस्वी व गौरवास्पद झाला आहे
येईल. नेहरूंच्या या दौऱ्यामुळें हिंदी राष्ट्राचा दर्जा अमेरिकन व
जगांत अनेक पटीनें उच्च श्रेणीला जाऊन पोंचला आहे यांत शं
नेहरूंचें कर्तृत्व व व्यक्तिमत्त्व यांना महात्मा गांधींच्या खालोख
जागतिक स्वरूप येत:चाललें आहे. असा हा थोर पुरुष 'भारत-भाग्
आहे, हें कोणालाही अमान्य करतां येणार नाहीं. पं. नेहरूंच्या या
जन्मदिवसाच्या प्रसंगीं वाढदिवसाची शुभेच्छादर्शक अल्पस्वल्प भेट
चरित्र त्यांना अर्पण करण्यांत लेखकाला अभिमानपूर्वक आनंद वा

ता. १४-११-४९

# विषयानुक्रमणिका

१२०८३ / ८।११।५३

प्रास्ताविक निवेदन
१ काश्मिरी पंडित ... ... १
२ जीवनाची पूर्वतयारी ... ... ७
३ राजकारणांत प्रवेश ... ... १३
४ अटक, शिक्षा, तुरुंगवास ... ... १७
५ अध्यक्षपदापासून पंतप्रधानपदापर्यंत ... ... २३
६ म. गांधी आणि पं. नेहरू ... ... ३२
७ पंडितजींच्या शब्दांत पं. नेहरू ... ... ३९
८ पंतप्रधानांचा एक दिवस ... ... ४८
९ व्यक्ति आणि वाङ्मय ... ... ५४
१० पंडितजींचें विविध दर्शन ... ... ७२

परिशिष्टें

अमेरिकेचा शोध ... ... ८०
पंडितजींची कुंडली ... ... ८३
ठळक प्रसंगांची सनावली ... ... ८४
पंडितजींचें वाङ्मय ... ... ८७

संग्रहालय
वा. वा.
ग्रा. नं. ५०६
वाचनालय शाखा

# स्वातंत्र्यदिनाचा संदेश

" स्वातंत्र्याच्या या दुसऱ्या वाढदिवशीं आपण गेल्या वर्षी जें कार्य केलें आणि जें आपल्याला करतां आलें नाहीं त्याचा हिशेब करूं या. येत्या वर्षांत जें महान् कार्य करावयाचें आहे त्यासाठीं आपण सिद्ध होऊं या. आपले परिश्रम व कार्य यांच्यावरूनच आपली किंमत ठरत असते, आपल्या बोलण्यावरून नव्हे.

या उगवत्या वर्षी हिंदुस्थानचें प्रजासत्ताक राज्य अस्तित्वांत येईल. आणि आपल्या देशाच्या इतिहासांतील एका नव्या पर्वाला प्रारंभ होईल. संक्रमणाचा एक कालखंड संपेल व दुसरा सुरू होईल. ज्या हिंदी प्रजासत्ताक राज्यासाठीं आपल्यापैकीं ज्यांनीं आमरण अविश्रांत श्रम केले त्याचा पाया आपण सावकाशीनें, पण निश्चितपणें घालीत आहों.

म्हणूनच आपण सर्वांनीं राष्ट्रकार्यास वाहून घेतलें पाहिजे. कोठलाही पक्ष, पंथ किंवा प्रांत याऐवजीं समग्र भारताच्या कल्याणाचा अखंड विचार केला पाहिजे. त्यांतही सामान्य जनतेचा विचार केला पाहिजे. या जनतेवर संकटाचें व जबाबदाऱ्यांचें दडपण मोठें आहे. आणि या जनतेच्या कल्याणावर व समाधानावरच भारताचें अंतिम भवितव्य अवलंबून आहे. सांप्रतच्या आर्थिक संकटामुळें या सामान्य जनतेलाच मोठा धक्का बसला आहे; त्यांतल्या त्यांत मध्यमवर्गावर तर आपत्तीच कोसळली आहे. पण हें दुर्भाग्य कांहीं आपल्याच वांट्याला आलेलें नाहीं; जगाच्या फार मोठ्या भागालाही तेंच सहन करावें लागत आहे.

आपण एक गोष्ट नेहमीं ध्यानांत बाळगली पाहिजे कीं, आर्थिक धोरण जरी आम्हीं कोणतेंही स्वीकारलें तरी देशांत शांतता व सुव्यवस्था नांदत असली तरच तें सफल होईल. बेबंदशाहींतून, गोंधळांतून कांहींच निष्पन्न होणार नाहीं. म्हणूनच ज्यानें ज्यानें हिंदुस्थानचें हित उराशीं बाळगलें आहे

त्यानें त्यानें हिंसा व बेबंदशाही यांना विरोध केला पाहिजे. त्याचप्रमाणें प्रत्येकानें हें उमजलें पाहिजे कीं, स्वतंत्र भारताचा स्वतंत्र नागरिक म्हणून आपल्याला जबाबदारी व श्रम यांचें ओझें उचललें पाहिजे. सरकार कितीही उत्तम असलें तरी त्याचें कार्यक्षेत्र मर्यादितच असतें. त्यांतल्या त्यांत लोकशाही सरकारला कोणताही मोठा प्रश्न सोडवावयाचा झाला तर जनतेच्या संपूर्ण सहकार्याची व परिश्रमाची अधिकच जरूरी असते.

आपल्यापुढें अन्नाचा आज महत्त्वाचा प्रश्न आहे. अन्न ही माणसाची प्राथमिक गरज आहे. या प्रश्नाला आपण अग्रस्थान दिलें पाहिजे. हा प्रश्न सोडविण्यांत आपणांला जितक्या प्रमाणांत यश मिळेल तितक्या प्रमाणांत आपण व्यापक आर्थिक क्षेत्रांत यशस्वी होऊं. अन्नाच्या उत्पादनकार्यांत व तें फुकट न दवडण्यांत या ना त्या प्रकारें, प्रत्येक स्त्रीपुरुषाला मदत करतां येईल. आज आपण अन्नासाठीं दुसऱ्यावर अवलंबून आहोंत, पण आपल्याला स्वयंपूर्ण बनतां येईल. म्हणून आपल्यापैकीं प्रत्येकानें या तांतडीच्या कार्याला वाहून घेतलें पाहिजे. या समान कार्यांतून व्यापक प्रमाणांत सहकार्य उत्पन्न होईल आणि या सहकार्याच्या जोरावरच आपले इतरही अनेक प्रश्न सुटतील.

आपल्या निष्ठेला आपण चिकटून राहिलों तर सर्व कांहीं ठीक होईल आणि निष्ठेला चिकटून राहावयाचें म्हणजे राष्ट्रपित्याच्या संदेशाचें सतत स्मरण करावयाचें. तसेंच नव्या राज्यघटनेच्या उद्देश-पत्रिकेंत व्यक्त झालेल्या लोकशाही तत्त्वांचें विस्मरण होऊं देतां कामा नये. आजच्या ऐतिहासिक महत्त्वाच्या दिवशीं आपण आदरपूर्वक महात्मा गांधींचें व त्यांच्या संदेशाचें स्मरण करूं या. ”

—जवाहरलाल नेहरू
१५ ऑगस्ट ४९

... संग्रहालय ...
था. थी.
५०६
... शाखा

# भारत – भाग्य – विधाता

# पं. जवाहरलाल नेहरू

## काश्मिरी पंडित : : १

पंडित जवाहरलाल नेहरू यांचा जन्म अलाहाबाद येथें ता. १४ नोव्हेंबर १८८९ रोजीं झाला. शालिवाहन शकाप्रमाणें त्यांची जन्मतिथि मार्गशीर्ष वद्य ६ शके १८११ ही आहे. फलज्योतिषशास्त्रज्ञांनीं या तिथीवर जन्मलेल्यांचें काय जातक वर्तविलेलें असेल तें असो, पण पंडित जवाहरलाल नेहरूंनीं आपल्या तेजस्वी व प्रतापी आयुष्यक्रमानें ज्योतिष्यांना अभ्यासाचा एक विषय करून दिला आहे यांत शंका नाहीं. पं. नेहरूंच्या कर्तृत्वासंबंधीं जीं जीं भविष्यें वर्तविण्यांत आलीं त्यांपैकीं एकही खोटें ठरलें नाहीं. पं. मोतीलाल यांनीं नेहरू हें कुलनाम धन्य केलें तर त्यांचे सुपुत्र पं. जवाहरलाल यांनीं तें अधिक उज्ज्वल व चिरंजीव केलें. काश्मीरांतून येऊन गंगेच्या कांठीं स्थायिक झालेल्या सप्रू–कुंझरूप्रमाणें नेहरूंनीं आपला कीर्तिध्वज दिगंत फडकाविला आहे. हिंदुस्थानांत गोखले, टिळक, गांधी, मालवीय, टागोर इत्यादि नांवांना जी महनीयता प्राप्त झाली आहे त्याच प्रभावळींत नेहरूंचा निःसंशय अंतर्भाव होतो.

पं. जवाहरलाल नेहरू यांचें घराणें मूळचें काश्मिरी. नेहरू हे काश्मिरी पंडित किंवा काश्मिरी ब्राह्मण होत. दोनशें वर्षांपूर्वी नेहरू कुटुंबाचा मूळपुरुष आपलें नशीब काढण्यासाठीं काश्मीरच्या पहाडी मुलखांतून दिल्लीच्या समृद्ध प्रदेशांत येऊन दाखल झाला. आणि तेव्हांपासून नेहरू घराण्याचा काश्मीरचा संबंध फक्त नांवाचाच राहिला. तथापि पं. जवाहरलाल यांना काश्मीरचा अजूनही इतका अभिमान वाटतो कीं जणूं कांहीं त्यांची जन्मभूमि संयुक्त प्रांत नसून काश्मीरच आहे. वेळीं अवेळीं काश्मीरचे पोवाडे गातांना, काश्मीरच्या निसर्गसौंदर्याचें वर्णन करतांना ते अगदीं देहभान विसरून जातात. त्याचप्रमाणें जेव्हां जेव्हां वेळ सांपडेल तेव्हां तेव्हां काश्मीरला भेट देण्याची एकही संधि ते दवडीत नाहींत. काश्मीरच्या निसर्गरम्य सौंदर्याचें अवगाहन करण्यांत पं. नेहरूंना स्वर्गीय आनंद वाटतो. आतांपर्यंत त्यांनीं काश्मीरला अनेक वेळां भेटी दिल्या असतील, तेथील बर्फाच्या टेंकड्यांवर त्यांनीं मनमुराद सहल केली असेल, तेथील फळें व फुलें यांचा भरपूर आस्वाद घेतला असेल, पण प्रत्येक वेळीं पंडित नेहरूंना काश्मीर ही स्वप्ननगरींतील यक्षभूमि वाटते. आपल्या या यक्षभूमीचें वर्णन पंडितजींनीं अनेक वेळां केलें आहे. त्यांच्या अलोट काश्मीरप्रेमाचा पुढील उतारा वाचकांना मनोरंजक वाटल्याशिवाय रहाणार नाहीं:—

"माझा आणि काश्मीरचा संबंध असला तर तो दूरचा आहे. पण काश्मीरच्या सौंदर्यामुळें तें मला नेहमींच जवळचें वाटतें. काश्मीरचें सृष्टिसौंदर्य माझ्या अंतःकरणाच्या फलकावर जणूं काय कायमचें मुद्रित होऊन बसलें आहे. गेलीं कित्येक वर्षें केवळ मनोराज्यांत किंवा स्वप्नसृष्टींत विहार करतांना मी जीं कल्पनामय चित्रें रेखाटलीं होतीं तीं संपूर्ण वास्तव स्वरूपांत मला पहावयास मिळालीं होतीं. झेलम नदीचा प्रचंड प्रवाह, उंच अंतराळांत गेलेले पॉप्लर वृक्ष, दीर्घायुष्य लाभलेले व खूप विस्तार पावलेले चिनार वृक्ष आणि या सर्वांपेक्षां सुदृढ बांध्याच्या सौंदर्यसंपन्न तरुणी व गुटगुटीत,

गोंडस मुलें या सर्वांत मला काश्मीरच्या सौंदर्याचें सारसर्वस्व सांपडलें. एकादी स्त्री अप्रतिम सौंदर्यवती असावी आणि तिचें सौंदर्य इतकें अमूर्त व स्वर्गीय असावें कीं तिच्याकडे पहाणारांच्या मनांत कामुक वासनाच उत्पन्न होऊं नये; अगदीं अशा प्रकारें काश्मीरचें स्वर्गीय सौंदर्य आहे. हें काश्मीरचें सौंदर्य इतकें विविध कलापूर्ण व विविधरंगी आहे कीं त्याचा मी जसजसा मनमुराद रसास्वाद घेऊं लागतों तसतसा मी देहभान विसरून जातों. माझ्या डोळ्यांपुढें स्वप्नांत निर्माण झालेली मयसृष्टीच उभी आहे कीं काय असें मला काश्मीर पाहून नेहमीं वाटतें."

१८ व्या शतकाच्या प्रारंभीं पं. नेहरूंचा एक पूर्वज काश्मीर सोडून उत्तर हिंदुस्थानांत येऊन दाखल झाला. त्यावेळीं औरंगजेब मृत्यु पावला होता व त्याचें मोंगल साम्राज्य मोडकळीस आलें होतें, आणि फरुक्शायर हा दिल्लीच्या गादीवर बादशहा म्हणून राज्य करीत होता. पं. नेहरूंचा हा पूर्वज राजकौल या नांवाचा होता व काश्मीर प्रांतांत संस्कृत व फार्शी पंडित म्हणून त्यानें नांव कमावलें होतें. फरुक्शायर काश्मीर प्रांतांत आला असतां त्याची आणि राजकौलची भेट झाली असावी व त्याच्या विद्वत्तेनें आकृष्ट होऊन बादशहानें त्याला आपल्या दरबारीं पाचारण केलें असावें, असें दिसतें. कारण १७१६ सालीं तो आपल्या कुटुंबीयांसह दिल्लीस आला व बादशहानें त्याला एका कालव्याजवळ जहागीर दिली. या कालव्याच्या सान्निध्यामुळें राजकौल यांना कौल-नेहरू असें म्हणूं लागले. नहर म्हणजे कालवा व कालव्याजवळ रहाणारे ते नेहरू, अशी नेहरू शब्दाची व्युत्पत्ति आहे. प्रारंभीं कौल-नेहरू असें जोड आडनांव लावलें जात असे, पण पुढें फक्त नेहरू येवढेंच नांव प्रचारांत आलें.

पं. नेहरूंचे पणजोबा पं. लक्ष्मीनारायण नेहरू हे दिल्लीच्या नामधारी मोंगल दरबारीं 'कंपनी सरकार' चे पहिले वकील होते. मोंगल बादशहा-कडून नेहरूंना मिळालेली जहागीर कालचक्राच्या फेऱ्यांत नष्ट झाली होती व

नेहरू कुटुंबाला वाईट दिवस आले होते. पण लक्ष्मीनारायण नेहरूंनीं आपल्या कर्तबगारीनें मानाचें स्थान मिळवून कुटुंबाला सुस्थिति प्राप्त करून दिली. त्यांचे चिरंजीव म्हणजे पं. नेहरूंचे आजोबा गंगाधर नेहरू हे १८५७ च्या बंडापूर्वीं दिल्लीचे कोतवाल होते. आणि त्याच नेहरूंचे नातू आज जवळ जवळ शंभर वर्षांनंतर दिल्लीचे पंतप्रधान झाले आहेत. पं. नेहरूंचे पणजोबा कंपनी सरकारचे वकील होते तर त्यांची भगिनी आज अमेरिकेच्या दरबारीं हिंदी सरकारची वकील म्हणून काम करीत आहे. नेहरू कुटुंबांतील राजदरबारीं अधिकार मिळविण्याचा हा वारसा त्यांचे पूर्वज राजकौल यांच्यापासून सतत चाललेला दृष्टीस पडतो. गंगाधर नेहरू आपल्या वयाच्या ३४ व्या वर्षीं १८६१ मध्यें मृत्यु पावले.

पण मृत्यूपूर्वीं त्यांच्या कुटुंबावर पुन्हां एकदां नव्या संकटाचा घाला आला. १८५७ च्या बंडाच्या ज्वाला उत्तर हिंदुस्थानांत जसजशा भडकूं लागल्या तसतसे लोक दिल्ली सोडून पळूं लागले. या दंगलींतच गंगाधर नेहरूंचे जुने कागदपत्र व इतर मौल्यवान वस्तु नाहींशा झाल्या व ते सर्वस्वाला मुकले आणि आश्रय मिळविण्यासाठीं इतर लोकांसमवेत ते आग्र्याला पळून आले. त्यावेळीं त्यांच्याजवळ कांहींहि नव्हतें. पण अशा पूर्ण निष्कांचन स्थितींत त्यांच्याजवळ एक भक्कम आधार होता. त्यांच्या दोघा मुलांना म्हणजे पं. नेहरूंच्या चुलत्यांना थोडेसें इंग्रजी येत होतें व त्याचा त्यांना आर्थिक व इतर दृष्टींनीं फायदा झाला.

हें कुटुंब कांहीं वर्षें आग्रा येथेंच स्थायिक झालें होतें व ६ मे १८६१ रोजीं पं. मोतीलाल नेहरूंचा जन्म झाला. मोतीलालांचा जन्म होण्यापूर्वीं तीन महिने त्यांचे वडील म्हणजे गंगाधर नेहरू स्वर्गवासी झाले होते.

त्यामुळें कुटुंबाची सर्व जबाबदारी पं. नेहरूंच्या दोघां चुलत्यांवर पडली. त्यांपैकीं सर्वांत थोरले बन्सीधर नेहरू ब्रिटिश सरकारच्या न्यायखात्यांत

शिरले आणि धाकटे नंदलाल नेहरू सरकारी नोकरींत न शिरतां एका संस्थानचे दिवाण झाले. राजपुतान्यांतल्या खेत्री संस्थानांत दहा वर्षं दिवाण-गिरी केल्यावर त्यांनीं कायद्याचा अभ्यास केला व आग्रा येथें वकिलीची पाटी लावली. मोतीलाल नेहरूंचें सर्व लालनपालन, शिक्षण व संवर्धन याच बंधूंच्या देखरेखीखालीं झालें व त्यांनीं मोतीलाल यांच्यावर पुत्रनिरपेक्ष प्रेम केलें.

नंदलाल नेहरूंचा वकिलीचा व्यवसाय उत्तरोत्तर अधिक बरकतीचा होऊं लागला व अलाहाबाद येथें हायकोर्ट स्थापन झाल्यावर नेहरू कुटुंबानें आग्र्याहून स्थलांतर केलें व तें अलाहाबाद येथें स्थायिक झालें. आणि आज-तागायत तें तेथेंच असून याच ठिकाणीं या घराण्याचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत गेला. पं. नेहरूंचा जन्म याच शहरीं झाला.

आपले जेष्ठ बंधु नंदलाल नेहरू याच्या देखरेखीखालीं मोतीलाल नेहरूंचें शिक्षण सुरू होतें. नंदलाल हे अलाहाबाद हायकोर्टांत पहिल्या दर्जाचे वकील समजले जात असल्यामुळें त्यांचें कुटुंब अधिकाधिक संपन्न होत चाललें होतें. त्यामुळें मोतीलाल यांच्या शिक्षणाची विशेष चिंता नव्हती. त्यांचें पर्शियन व अरबी शिक्षण कानपूर व अलाहाबाद येथील शाळा-कॉलेजांतून झालें. त्यानंतर त्यांच्या इंग्रजी शिक्षणास सुरुवात झाली. फार्शी भाषेचे पंडित म्हणून त्यावेळीं मोतीलाल यांची प्रसिद्धि झाली होती. कॉलेजांत दंगेखोर व खोडकर विद्यार्थी म्हणून त्यांनीं नांव मिळविलें असलें तरी ते हुषार होते. याच वेळीं अलाहाबादच्या मूर कॉलेजांत असतांना पं. मदन-मोहन मालवीय व सर सुंदरलाल हे त्यांचे सहाध्यायी होते. बी. ए.पर्यंत त्यांनीं मजल मारली पण ते पदवीधर झाले नाहींत. तथापि त्यांनीं वकील होण्याचें ठरविलें. आपल्या बंधूंचें उदाहरण त्यांच्यापुढें होतेंच. त्यांनीं हायकोर्ट वकीलीच्या परीक्षेचा अभ्यास सुरू केला व ते परीक्षेस बसले. यावेळीं मात्र त्यांची खरी बुद्धिमत्ता दिसून आली. सर्व विद्यार्थ्यांत ते पहिले आले इतकेंच नव्हे तर त्यांना एक सुवर्णपदकहि मिळालें.

मोतीलाल नेहरू हे जसे महत्त्वाकांक्षी होते तसे मोठे खेळाडू व कुस्तीचे शोकी होते. कानपूरला प्रारंभीं वकिली करीत असतां ते आपला हा षोक पुरा करीत असत. १८८३ सालीं त्यांनीं कानपूरला वकिली करण्यास सुरुवात केली व तीन वर्षांतच एवढें नांव कमावलें कीं मोठ्या क्षेत्रांत पदार्पण करण्यासाठीं ते अलाहाबादला आले. तेथें लवकरच त्यांचा चांगला जम बसतो न बसतो तोंच त्यांचे पितृतुल्य बंधु पं. नंदलाल एकाएकीं निधन पावले. त्यामुळें पं. मोतीलाल यांना आपलें पितृछत्र हरपल्यासारखें वाटलें असल्यास नवल नाहीं.

पं. मोतीलाल नेहरू अलाहाबादला वकिली करावयास आले त्यावेळीं त्यांचें वय अवघें २५ वर्षांचें होतें. ऐन पंचविशींत पं. मोतीलाल नेहरूंनीं अलाहाबाद हायकोर्टांत कायदेपंडित म्हणून कीर्ति मिळविली, ती केवळ 'तीक्ष्ण बुद्धिमत्ता व वाढती महत्त्वाकांक्षा यांच्या बळावर संपादन केली. पं. मोतीलाल यांची कीर्ति जसजशी वाढत गेली तसतसा त्यांचा दर्जा व वैभव यांचीही वाढ होत गेली. याच चढत्या वैभवाच्या काळांत पं. मोतीलाल यांना त्यांच्या वयाच्या २८ व्या वर्षीं, ता. १४ नोव्हेंबर १८८९ रोजीं, पहिल्या पुत्ररत्नाचा लाभ झाला. या पुत्ररत्नाचें नांव जवाहरलाल नेहरू.

९५०२३
८।७११८३

# जीवनाची पूर्वतयारी : : २

पं. जवाहरलाल यांचें बालपण अगदीं एकाकी गेलें. घरांत त्यांच्या बरोबरीचीं कोणी मुलें नव्हतीं. पं. मोतीलाल हे समाजांत प्रतिष्ठा पावलेले वरिष्ठ दर्जाचे वकील असल्यामुळें आजूबाजूच्या इतर मुलांचाही जवाहरलाल यांना संपर्क लागणें शक्य नव्हतें. जवाहरलालांसाठीं, त्यांची सर्वतोपरी काळजी घेण्यास मोतीलाल नेहरूंनीं एका इंग्रज बाईची योजना केली होती. ही बाई त्यांची दाई, मोलकरीण, आया व शिक्षकीण होती असें म्हटल्यास चालेल. आपल्या मुलासाठीं अशी ' गव्हर्नेस ' ठेवणें हें पं. मोतीलाल यांच्या मोठेपणाचें व वैभवाचें गमक होतें. तसेंच आपल्या मुलाला इतर मुलांची संगत लागू नये म्हणून त्याला शाळेंत न पाठविणें हेंही त्यांच्या प्रतिष्ठेचें आणखी एक लक्षण समजलें जात होतें. त्यामुळें जवाहरलाल यांना घरांत जसे कोणी समवयस्क सवंगडी नव्हते त्याप्रमाणें शाळासोबतीही कोणी नव्हते. त्यांना बालकमंदिरांत किंवा कोणत्याही प्राथमिक शाळेंत घालण्यांत आलें नाहीं. घरींच शिक्षक ठेवून अगर इंग्रज गव्हर्नेस, यांच्याकरवीं त्यांचें प्राथमिक शिक्षण झालें. वयाच्या अकराव्या वर्षापर्यंत त्यांना भावंड नव्हतें. त्यांच्या दोघी बहिणी त्यांच्यापेक्षां बऱ्याच लहान असल्यामुळें त्यांचें बालपण अगदीं एकाकी

गेलें तरी संपन्न आईबापांचा एकुलता एक मुलगा म्हणून त्यांचे लाडही पुष्कळ करण्यांत आले. कोणत्याही गोष्टीची त्यांना कमतरता नव्हती.

बाळपणीं जवाहरलाल यांना वडिलांच्या करडेपणाची व रागाची भीति वाटत असे. एकदोनदां त्यांनीं वडिलांच्या हातचा प्रसादही खाल्ला आहे. तथापि मोतीलाल यांचा प्रेमळपणा व लाड यांना मर्यादा नसे. जवाहरलाल यांचा लहानपणीं आई, चुलती व मुनशी मुबारकअल्ली यांच्याशीं सगळ्यांत निकटचा संबंध आला. पहिल्या दोघांनीं त्यांना रामायण-महाभारतांतील पौराणिक गोष्टी सांगितल्या तर मुनशींनीं ऐतिहासिक अगर अरबी भाषेंतल्या गोष्टी सांगून त्यांची कल्पनाशक्ति जागृत केली. बालपणीं पं. नेहरूंच्या मनावर हे जे संस्कार झाले ते पुढें कधींही पुसले गेले नाहींत, इतके ते बलवत्तर होते. जवाहरलाल पुढें धार्मिकतेचा अगर हिंदुत्वाचा उपहास करूं लागले तरी त्यांच्या अंतरंगांत भिनलेल्या भारतीय संस्कृतीचा एक अंशही पुसला गेला नाहीं. त्यांनीं स्वतःच म्हटल्याप्रमाणें ते जरी कांहीं काळ ‘ इंग्रजाळलेले ’ झाले असले तरी त्यांच्या पाश्चिमात्य बहिरंगाच्या आंत हिंदी राष्ट्र व हिंदी संस्कृति यांचा अभिमान जागृत होता. ‘ भारताचा शोध ’ या ग्रंथांत पंडित नेहरूंनीं आपल्या प्राचीन भारतीय संस्कृतीचा जो गुणानुवाद गायिला आहे त्यावरून ते आंतरराष्ट्रीय विचाराचे असले तरी नखशिखान्त भारतीय आहेत याची साक्ष पटते.

वयाच्या अकराव्या वर्षीं जवाहरलाल यांना शिकविण्यासाठीं फर्डिनांड टी. ब्रूक्स यांची योजना करण्यांत आली. शिवाय हिंदी व संस्कृत शिकविण्यासाठीं एक पंडित येत असत. पं. नेहरूंच्या भावी जीवनावर ब्रूक्स यांच्या शिकविण्याचा व त्यांच्या थिऑसॉफिकल मतांचा पुष्कळच परिणाम झाला. त्यांच्या तीन वर्षांच्या शिक्षणाच्या कारकीर्दींत नेहरूंनीं अनेक उत्तमोत्तम इंग्रजी पुस्तकांचें वाचन केलें, तसेंच त्यांना विविध विषयांचें सामान्य ज्ञान

करून देण्यांत आलें. पं. नेहरूंच्या शिक्षणाची अशी पूर्वतयारी झाल्यावर १९०५ सालच्या मे महिन्यांत वयाच्या पंधराव्या वर्षी उच्च शिक्षणासाठीं ते आपल्या वडिलांबरोबर इंग्लंडला गेले.

पं. नेहरूंच्या भगिनी श्री. कृष्णा हाथीसिंग यांनीं आपल्या पुस्तकांत पंडितजींच्या लहानपणाबद्दल व त्यांच्या त्यावेळच्या स्वभावाबद्दल अनेक मनोरंजक आठवणी सांगितल्या आहेत. आपल्या पुस्तकांत एके ठिकाणीं त्या म्हणतातः—

" जवळ जवळ सात वर्षेपर्यंत जवाहर हा आईबापांना एकटाच मुलगा होता. त्यामुळें त्यांनीं—विशेषतः आईनें—त्याचे फार लाड केले. तो शाळेंत जात नसे. त्याला शिकण्याकरितां घरींच शिक्षक येत असत. वडील लाड करीत पण त्याचबरोबर ते त्याला शिस्तीचेंही वळण लावीत असत.

जवाहरला आपल्या वडिलांबद्दल अत्यंत आदर वाटत असे. आपण वडिलां-सारखें व्हावें अशी त्याची आकांक्षा होती. वडिलांबद्दल त्याला जितका आदर आणि प्रेम वाटे तितकेंच भयही वाटत असे.

बरींच वर्षेपर्यंत मला जवाहरचा खरा स्वभाव कळू शकला नाहीं. कधीं मला त्याच्याबद्दल प्रेम वाटे, कधीं आदर वाटे, तर कधीं रागही येई. सत्या-ग्रहाच्या चळवळीमध्यें त्यानें जेव्हां उडी घेतली तेव्हां मात्र मला त्याचें जवळून दर्शन झालें. त्याची उज्ज्वल बाजू तेव्हां मला दिसून आली आणि त्याच्याबद्दलचा माझा आदर शतपटीनें वाढला.

आम्हां दोघां बहिणींपेक्षां तो वयानें बराच मोठा आहे, पण आपला वडीलपणाचा अधिकार मात्र त्यानें आम्हांवर कधीं गाजविला नाहीं. कधीं कधीं आमच्या हातून त्याला न आवडणाऱ्या गोष्टी घडून येत. त्यावेळीं तो मोठ्या सौजन्यानें आणि कौशल्यानें आमची चूक आमच्या नजरेस आणून देई. तो आपलीं मतें आमच्यावर कधींच लादीत नसे व उपदेशही करीत नसे.

वडिलांप्रमाणें जवाहर मोठा रागीट आहे. मी त्यावेळीं १४ वर्षांची होतें. जवाहरनें मला गणित शिकवावयाचें ठरविलें. माझी अर्थातच इच्छा नव्हती. पण त्यांतून सुटणेंही शक्य नव्हतें. त्यावेळीं मला जवाहरची भीति वाटत असे. पण त्याची शिकविण्याची पद्धत मला आवडूं लागली. पण एके दिवशीं मला कांहींच आठवेना. त्यामुळें तो चिडून गेला. मला मोठमोठ्यानें बोलूं लागला. मलाही फार वाईट वाटलें व माझ्या डोळ्यांतून अश्रुधारा सुरू झाल्या. हें पाहतांच त्याचा राग कोठच्या कोठें निघून गेला. आपण उगीच रागावलों असें त्याला वाटलें. त्यानें मला जवळ घेऊन माझी पुष्कळ समजूत केली, पण मी पुन्हां त्याच्याजवळ गणित शिकलें नाहीं."

हिंदुस्थानांतल्या कोणत्याही शाळेंत जवाहरलाल यांनीं पाऊल ठेवलें नव्हतें. तरी घरगुती शिक्षणामुळें त्यांचें ज्ञान कोणाही सामान्य विद्यार्थ्यांपेक्षां कितीतरी पटीनें अधिक होतें. इंग्लंडमध्यें आल्यावर हॅरो येथील सुप्रसिद्ध शाळेंत त्यांनीं प्रवेश केला. या शाळेंतल्या इंग्रज विद्यार्थ्यांपेक्षां नेहरू अधिक बहुश्रुत व अधिक व्यासंगी होते व त्यांना सार्वजनिक व राजकीय जीवनाची आवड उत्पन्न झाली होती. त्यांनीं शाळेंत हुषारीबद्दल कांहीं बक्षिसेंही मिळविलीं होतीं.

हॅरोच्या विद्यालयांतून पं. नेहरू १९०७ च्या ऑक्टोबरांत केंब्रिजच्या ट्रिनिटी कॉलेजांत दाखल झाले. या कॉलेजांत असतांना हिंदुस्थानांतील चळवळींच्या व अशांततेच्या बातम्या वाचून पं. नेहरूंच्या अंतःकरणांत प्रक्षोभ उत्पन्न होत असे. त्यांच्या हृदयांत देशभक्तीची प्रेरणा जी झाली ती परदेशांत स्वदेशांतल्या हकीगती वाचून व तेथील परिस्थिति पाहून झाली.

केंब्रिजच्या कॉलेजांत पं. नेहरूंनीं सृष्टिशास्त्र, विज्ञान, वनस्पतिशास्त्र व भूगर्भशास्त्र हे विषय पदवी परीक्षेसाठीं घेतले होते. कॉलेजांत असतांना त्यांनीं बहुतेक कोणत्याच कार्यक्रमांत भाग घेतला नाहीं. विद्यार्थ्यांच्या 'मजलिस'-मध्येंही त्यांनीं कधीं भाषण केलें नाहीं. त्या काळीं अनेक हिंदी पुढारी केंब्रिजला येत असत व हिंदी विद्यार्थ्यांपुढें व्याख्यानें देत असत. गोखले,

बिपिनचंद्र पाल, हरदयाळ, श्यामजी कृष्णवर्मा इत्यादिकांना भेटण्याची अगर त्यांचें भाषण ऐकण्याची संधि पं. नेहरूंना याच अवधींत मिळाली होती. लाहोर कॉंग्रेसचे स्वागताध्यक्ष डॉ. किचलू, डॉ. सय्यद महंमूद व बॅ. सेनगुप्त हे पं. नेहरूंचे कॉलेजांतील सहाध्यायी होत. वयाच्या विसाव्या वर्षी १९१० सालीं पं. नेहरू दुसऱ्या वर्गात बी. ए. झाले.

पदवीधर झाल्यावर पुढें काय करावयाचें हा त्यांच्यापुढें प्रश्न उभा राहिला. त्यांच्यापुढें दोन मार्ग होते; आय. सी. एस्. किंवा बॅरिस्टर. आय. सी. एस्. परीक्षेला त्यावेळीं भलताच मान होता आणि त्यांनीं जर मनांत आणलें असतें तर या परीक्षेंत उत्तीर्ण होणें त्यांना मुळींच कठीण नव्हतें. पण त्यासाठीं त्यांना इंग्लंडमध्यें आणखी दोन वर्षें काढावीं लागलीं असतीं. कारण या परीक्षेला वयाची अट होती आणि ज्यांचें वय २२ ते २४ आहे त्यांनाच परीक्षेला बसतां येत असे. शिवाय आय. सी. एस्. होण्याला मोतीलाल यांचा विरोध होता. ते जरी त्यावेळीं सरकारजमा प्रागतिक पक्षांत सामील झाले होते व आपल्या मुलानें मानाची सरकारी नोकरी करण्यांत अभिमानही वाटला असता तरी ते आय. सी. एस्.च्या विरुद्ध होते. कारण जवाहरलाल हा त्यांचा एकुलता एक मुलगा होता. व तो जर सरकारी नोकरींत शिरला तर दुरावेल अशी त्यांना भीति वाटत होती. पुत्र-प्रेमाला बळी पडून अखेर मोतीलाल यांनीं जवाहरलाल यांना आय. सी. एस्.-पासून परावृत्त केलें व त्यांनीं बॅरिस्टर व्हावें असें ठरविलें. यासंबंधीं पं. नेहरू आपल्या आत्मचरित्रांत म्हणतात: "मी जरी राजकीय बाबतींत अधिकाधिक जहाल होत चाललों होतों तरी आय. सी. एस्. होऊं नये असें मला मुळींच वाटत नव्हतें." अखेर वडिलांच्या म्हणण्याप्रमाणें पं. नेहरूंनीं बॅरिस्टरीच्या अभ्यासासाठीं 'इन्नर टेंपल' मध्यें आपलें नांव दाखल केलें व १९१२ सालीं बॅरिस्टर होऊन सात वर्षांच्या वास्तव्यानंतर ते हिंदुस्थानांत परत आले.

पं. नेहरूंनीं या सात वर्षांच्या वास्तव्यांत युरोपांतील अनेक देशांत प्रवास केला. जर्मनी, आयर्लंड, नॉर्वे, इत्यादि देश पाहिले, अनेक लोकांशीं ओळखी केल्या, आधुनिक जगाचें नवीन ज्ञान संपादन केलें व पाश्चिमात्य देशांतील समाजव्यवस्थेचें त्यांनीं निरीक्षण केलें. या काळांतील वास्तव्यानें पं. नेहरूंना नवी दृष्टी दिली. तिचा विकास पुढील काळांत झाला. याचें श्रेय अर्थात् पं. मोतीलाल यांना जितकें आहे तितकेंच पं. जवाहरलाल यांच्या तेजस्वी जागृत जिज्ञासेलाही आहे. यदाकदाचित् पं. नेहरू आपल्या हट्टाला पेटून आय. सी. एस्. झाले असते तरी थोड्याच दिवसांत सुभाषबाबूंप्रमाणें त्यांनीं सरकारी नोकरीचा राजीनामा दिला असता, यांत मुळींच शंका नाहीं. त्यांची राष्ट्रभक्ति इंग्लंडांतच अधिक प्रखर झाली होती व आपल्या वडिलांनीं जहाल राजकीय पक्षांत दाखल न होतां प्रागतिक पक्षाला जाऊन मिळावें याचा त्यांना विषाद वाटत होता. राष्ट्रीय पक्षाबद्दल त्यांच्या अंतःकरणांत आत्मीयता उत्पन्न झाली होती. टिळक, अरविंद घोष, गोखले इत्यादिकांबद्दल त्यांना आदर वाटत होता व राष्ट्रासाठीं आपण कांहीं तरी केलें पाहिजे असें त्यांना वाटूं लागलें होतें. तथापि त्यांचीं मतें व विचार पूर्ण पाश्चिमात्य वळणाकडे झुकत होते. पाश्चिमात्यांबद्दल व त्यांच्या चालीरीतींबद्दल त्यांना एक प्रकारचें आकर्षण वाटत होतें. इंग्रज लोकांबद्दल त्यांची भावना प्रेमादराची होती, पण पुढें लवकरच त्यांचा भ्रमनिरास झाला. जे पंडितजी एके काळीं इंग्रजांचे चाहते होते ते पुढें त्यांचे द्वेष्टे बनले व ब्रिटिश साम्राज्यशाहीचा नाश कसा होईल याचा विचार करूं लागले. पं. मोतीलालही प्रारंभीं असेच ब्रिटिश राज्यकर्त्यांचे गोडवे गात असत; पण पुढें म. गांधींच्या सान्निध्यांत आल्यावर त्यांना नवी दृष्टी आली व ते ब्रिटिश सरकारचे कट्टे शत्रू बनले.

• • •

## राजकारणांत प्रवेश : : ३

पं. जवाहरलाल नेहरू बॅरिस्टर होऊन १९१२ सालच्या अखेर हिंदुस्थानांत परत आले त्यावेळीं देशांत एक प्रकारची शांतता नांदत होती. बंगालच्या फाळणीचा प्रश्न सुटला होता व मोर्ले-मिंटो सुधारणा योजनांकडे पुढाऱ्यांचें लक्ष लागलें होतें. कॉंग्रेस प्रागतिकांच्या हातीं होती व लो. टिळकांसारखे जहाल पुढारी तुरुंगांत अडकले होते. मवाळ पुढाऱ्यांपैकीं गोखले हेच काय ते त्यांतल्या त्यांत पुरोगामी होते व त्यांनाच खरी राजकीय दृष्टी होती. अशा वातावरणांतच बांकीपूर उर्फ पाटणा येथें मुधोळकर यांच्या अध्यक्षतेखालीं कॉंग्रेसचें २७ वें अधिवेशन भरलें. पं. जवाहरलाल नेहरूंनीं पाहिलेली ही पहिलीच कॉंग्रेस. हें अधिवेशन पाहून त्यांना अत्यंत विषाद वाटला. जी राष्ट्रीय सभा हिंदी स्वातंत्र्यासाठीं अस्तित्वांत आली त्या सभेचें हें अधिवेशन म्हणजे उच्चवर्णीयांचा एक सामाजिक समारंभ आहे असें त्यांना वाटलें. या बैठकींत राजकारण जवळ जवळ नव्हतेंच. गोखले नुकतेच आफ्रिकेंतून परत आलेले असल्यामुळें त्यांच्या भाषणांत आफ्रिकेंतील हिंदी लोकांविषयीं उल्लेख आलेला असेल तेवढाच. बाकी सर्व अधिवेशन अगदीं नीरस झालें.

पं. नेहरूंनीं विलायतेहून आल्याबरोबर थोड्याच दिवसांत हायकोर्टांत जाण्याचें सुरू केलें. पण लवकरच त्यांना या वकिली धंद्याचा कंटाळा आला. कोर्टांतलें तें ठराविक वातावरण, वकिलांच्या त्या ठराविक गप्पा व ते ठराविक चेहरे यामुळें त्यांना या व्यवसायांत मुळींच उत्साह वाटेना. " बौद्धिक दृष्ट्या हें वातावरण मुळींच प्रोत्साहक नव्हतें, इतकेंच नव्हें तर हें जीवन अगदींच बेचव व निर्जीव आहे अशी माझी भावना झाली. " पं. नेहरूंच्या या उद्‌गारांवरून त्यांनीं पुढें किती दिवस वकिली केली असेल हें सांगण्याचें कारण नाहीं. त्यांच्या स्वभावाला वकिलीचा व्यवसाय मानवण्यासारखा नव्हता, त्यामुळें या धंद्यांत त्यांचें मन रमेना. कोर्टांत जाण्याकडे त्यांचें मन लागेना. या जीवनांत कांहीं अर्थ नाहीं असें त्यांच्या मनानें निश्चित केलें व राजकारणांत पडण्याचा त्यांनीं निर्णय घेतला. राजकारण म्हणजे परकीय सत्तेविरुद्ध आक्रमक स्वरूपाची राजकीय चळवळ, अशा व्यापक अर्थानें पं. नेहरूंनीं आपल्या जीविताचें तारूं राजकीय प्रवाहांत सोडून दिलें. शिवाय विलायतेंतील वास्तव्यामुळें व अभ्यासामुळें त्यांना एक नवी दृष्टी आली होती. त्यामुळें राजकारण हेंच त्यांच्या आयुष्याचें ध्येय ठरावें हें स्वाभाविकच होय. वकिली करून राजकारण करण्याचें मवाळांचें धोरण त्यांना मुळींच मान्य नव्हतें. राजकारण हा फुरसतीचा व्यवसाय नसून दिवसाचे चोवीस तासही ज्याला पुरत नाहींत असा धंदा आहे. पं. नेहरूंच्या स्वभावाला व प्रवृत्तीला हाच धंदा मानवणारा असल्यामुळें म. गांधींची असहकारिता सुरू होण्यापूर्वींच पं. नेहरूंनीं कोर्टावर बहिष्कार घातला. त्यानंतर त्यांनीं कधीं बॅरिस्टरीचा झगा अंगावर चढविला नाहीं. आणि जो चढविला तो २४ वर्षांनीं फक्त एकदांच. सुभाषबाबूंच्या आझाद हिंद फौजेंतील कॅ. शहानवाज, धिलन प्रभृति सेनापतींवर लष्करी कोर्टानें जेव्हां खटला भरला होता तेव्हां त्यांच्या बचावासाठीं १९४६ सालीं पं. नेहरूंनीं आपली वकिलीची सनद बाहेर काढली होती. असा हा एकच अपवाद

वजा केल्यास पं. नेहरूंनीं आपल्या आयुष्यांत कधींही वकिली केली नाहीं. त्यांच्यावर अनेक वेळां राजद्रोहाबद्दल व कायदेभंगाबद्दल खटले भरण्यांत आले, पण त्यांनीं कधीं आपला बचाव केला नाहीं. तथापि आपलें म्हणणें कोर्टापुढें निधडेपणानें मांडण्यास ते कमी करीत नसत.

महात्मा गांधींशीं संबंध येण्यापूर्वीं पं. नेहरू जें राजकारण करीत त्यांत कॉंग्रेसचें कार्य करणें, लो. टिळक व ॲनी बेझंट यांनीं काढलेल्या होमरूल लीगचे सभासद होणें व क्वचित् एखाद्या सभेंत भाषण करण्याचा प्रयत्न करणें येवढेंच होतें. १९१६ च्या लखनौ कॉंग्रेसच्या वेळीं महात्मा गांधी व पं. नेहरू यांची पहिली भेट झाली. दक्षिण आफ्रिकेंतील लढ्याचे विजयी सेनापति म्हणून सर्व लोक गांधीजींकडे मोठ्या आदरानें पाहत होते. पं. नेहरूंनीं त्याच दृष्टीनें त्यांची भेट घेतली. पण या पहिल्या भेटींतच गांधींविषयीं नेहरूंचें मत बिघडलें. ‘ या गृहस्थाला दक्षिण आफ्रिकेपलीकडे दुसरा कोणताच विषय माहीत नाहीं व हिंदी राजकारणांत त्याला कांहींच गम्य नाहीं ! ’ अशी आपली समजूत झाल्याचें पं. नेहरूंनीं लिहिलें आहे. पण पुढें याच गांधींनीं नेहरूंच्या जीवनांत क्रांति केली व राष्ट्राचें राजकारण कसें करावयाचें असतें हें दाखवून हिंदी राष्ट्राला स्वातंत्र्य मिळवून दिलें.

पं. मोतीलाल व पं. जवाहरलाल हे पितापुत्र जवळजवळ एकाच वेळीं कॉंग्रेसच्या राजकारणांत दाखल झाले. पं. मोतीलाल हे आपली भरभराटीची वकिली सांभाळून फावल्या वेळांत मवाळांच्या राजकारणांत भाग घेत असत. लो. टिळक किंवा पं. मालवीय यांच्याप्रमाणें ते आपल्या आयुष्याच्या ऐन उमेदींत राजकारणाच्या आखाड्यांत उतरले नाहींत. साठीच्या घरांत आल्यावर म. गांधींच्या प्रेरणेनें ते खरेखुरे राजकारणांत पडले. तोंपर्यंत ते कॉंग्रेसपासून अगदीं अलिप्त होते अशांतला भाग नाहीं. १९०७ सालीं ते संयुक्त प्रांत राजकीय परिषदेचे अध्यक्ष होते. १९१७ मध्यें ते होमरूल

चळवळींत भाग घेत असत व कायदे-मंडळांत सनदशीर राजकारण चालवीत असत. १९१९ च्या पंजाब प्रकरणामुळें त्यांच्यांतली देशभक्ति उफाळून वर आली व म. गांधींच्या असहकारितेच्या चळवळीपासून तर कॉंग्रेसच्या पहिल्या दर्जाच्या पुढाऱ्यांत त्यांची गणना होऊं लागली. पं. मोतीलाल नेहरूंच्या देशसेवेच्या या राजकीय पार्श्वभूमीवर पं. जवाहरलाल यांचें राजकीय जीवन विशेषच खुलून दिसतें. १९२० पासून पितापुत्र नेहरूंचें नांव कॉंग्रेसच्या राजकारणांत अग्रभागीं चमकूं लागलें. मोतीलाल दोन वेळां कॉंग्रेसचे अध्यक्ष झाले तर जवाहरलाल यांना हा मान तीन वेळां मिळाला. मोतीलाल यांचें ज्वलज्जहाल राजकीय आयुष्य १०—१२ वर्षांपेक्षां अधिक नव्हतें तर जवाहरलाल यांची आतांपर्यंतची बहुतेक सर्व हयात राजकारणांतच गेली आहे.

१९१६ सालीं वसंत-पंचमीच्या दिवशीं दिल्ली येथें जवाहरलाल नेहरूंचा विवाह झाला. नेहरूंची पत्नी कमला त्यांच्याप्रमाणेंच काश्मिरी होती. पं. नेहरूंच्याबरोबर तिनें राष्ट्रीय चळवळींत भाग घेऊन तुरुंगवासही भोगला. वीस वर्षांच्या वैवाहिक जीवनानंतर १९३६ सालीं युरोपांत तिचें निधन झालें. नेहरू-दांपत्याला इंदिरा उर्फ प्रियदर्शिनी नांवाची एकुलती एक कन्या असून फिरोज गांधी यांच्याशीं तिचा अलीकडेच विवाह झाला. तिला राजीव व संजीव नांवांचे दोन मुलगे आहेत.

# अटक, शिक्षा आणि तुरुंगवास : : ४

हिंदुस्थानांतल्या पहिल्या दर्जाच्या प्रत्येक राष्ट्रीय पुढाऱ्याला तुरुंगवासाचें दिव्य करावें लागलें. तुरुंग ही पुढाऱ्यांच्या देशभक्तीची कसोटी किंवा मिरास असली तरी राष्ट्रकार्यांत सरकारी पाहुणचार हा अपरिहार्य असतो. इतर पुढाऱ्यांप्रमाणें पं. नेहरूंवरही अटकेचे व तुरुंगवासाचे प्रसंग आले; पण त्यांना जितक्या शिक्षा झाल्या तितक्या इतरांच्या वांटयाला आल्या असतील, असें वाटत नाहीं. लो. टिळक, म. गांधी, लाला लजपतराय इत्यादिकांप्रमाणें जवाहरलाल नेहरूंच्या जीवनांत तुरुंगाचा फार निकट संबंध आला आहे. त्यांचें राजकीय जीवन सुरू झाल्यापासून तुरुंगांत त्यांच्या इतक्या खेपा झाल्या कीं जणू काय घर आणि तुरुंग यांच्या भिंती एकमेकांना लागूनच होत्या! घरापेक्षां तुरुंगांतच त्यांचें अर्धें अधिक आयुष्य गेलें, म्हणूनच त्यांनीं आपल्या आत्मचरित्राला ‘ तुरुंगांत आणि तुरुंगाबाहेर ’ असें अर्थपूर्ण नांव दिलें होतें. पुढें प्रकाशकांच्या म्हणण्याप्रमाणें तें नांव बदललें; पण पंडित नेहरूंच्या जीवनचरित्राला तें नांव किती अन्वर्थक होतें, हें सांगण्याची जरूरी नाहीं.

पं. नेहरूंच्या २५ वर्षांच्या राजकीय जीवनांत त्यांच्यावर अनेक वेळां शिक्षेचे प्रसंग आले. कित्येकदां त्यांना चौकशीशिवाय स्थानबद्ध करून ठेवण्यांत आलें तर कांहीं वेळां त्यांच्यावर स्थलमर्यादेचे निर्बंध घालण्यांत आले. या दोन तपांच्या काळांत पंडितजींना एकूण नऊ वेळां तुरुंगांत जावें लागलें. शेवटचा त्यांचा तुरुंगवास ३५ महिन्यांचा होता. त्यांना झालेली कमींत कमी शिक्षा सहा महिन्यांची होती. १९२० सालच्या मे महिन्यांत ते मसुरी येथें सेव्हॉय हॉटेलांत असतां त्यांच्यावर अगदीं पहिला सरकारी हुकुम बजावण्यांत आला. त्या हॉटेलांत राहत असलेल्या अफगाण शिष्टमंडळाबरोबर पंडितजींनीं कोणताच संबंध ठेवूं नये असा त्यांच्यावर निर्बंध घालण्यांत आला. वास्तविक असें एकादें शिष्टमंडळ या हॉटेलांत राहत आहे याचीही त्यांना दखल नव्हती. त्यामुळें डिस्ट्रिक्ट मॅजिस्ट्रेटला त्यांनीं लेखी हमी देण्याचें नाकारलें. त्याचा परिणाम असा झाला कीं मॅजिस्ट्रेटनें त्यांच्यावर हद्दपारीचा हुकुम बजावला व २४ तासांत डेहराडून जिल्हा सोडून जाण्याचें फर्मान काढलें. पं. नेहरूंना त्यावेळीं कायदेभंग करावयाचा नव्हता, म्हणून ते लागलींच मसुरी सोडून गेले.

पं. जवाहरलाल नेहरूंना कारागृहवासाचा पहिला अनुभव त्यांच्या वडिलांबरोबरच आला. असहकारितेच्या अमदानींत संयुक्तप्रांत सरकारनें स्वयंसेवकदल बेकायदेशीर ठरविल्यामुळें व नेहरू पितापुत्रांनीं त्याच्या शपथपत्रिकेवर सह्या केल्यामुळें त्यांना ता. ६ डिसेंबर १९२१ रोजीं पकडण्यांत आलें, व दोघांनाही सहा महिन्यांची शिक्षा झाली. पण जवाहरलाल यांची मुदत पुरी होण्यापूर्वीं त्यांना ता. ३ मार्च १९२२ रोजीं सोडण्यांत आलें. तथापि दोन महिन्यांच्या आंत ते लखनौ येथील तुरुंगांत मोतीलालजींच्या भेटीस गेले असतांना राजद्रोहाच्या आरोपावरून त्यांना २१ मे रोजीं अटक करण्यांत आली. त्यावेळीं त्यांच्यावर अनेक आरोप ठेवण्यांत आले होते. त्यांनीं कोर्टांत स्वतःचा बचाव केला नाहीं; पण एक मोठी कैफियत सादर केली.

त्यांना प्रत्येक गुन्ह्याबद्दल तीन निरनिराळ्या शिक्षा देण्यांत आल्या व कांहीं एकाच वेळीं भोगावयाच्या होत्या. ही एकूण शिक्षा १ वर्ष ९ महिने होती. नेहरूंचा हा दुसरा तुरुंगवास पहिल्या तुरुंगवासांतून सुटल्यावर सहा आठवड्यांनीं सुरू झाला. ता. ३१ जानेवारी १९२३ रोजीं पंडितजींची सुटका झाली.

सन १९२३ ची कॉंग्रेस आटोपल्यावर नाभा संस्थानांत शीखांची जी चळवळ चालू होती त्या चळवळींत भाग घेण्यासाठीं एक जथा घेऊन पं. नेहरू गेले; पण त्यांना सरहद्दीवरच अटक करण्यांत आली. पंधरा दिवस कच्च्या कैदेंत काढल्यावर त्यांचा खटला सुरू झाला. प्रारंभीं प्रवेशबंदीचा हुकुम मोडल्याबद्दल सहा महिने व कटांत भाग घेतल्याबद्दल २ वर्षें अशी एकूण अडीच वर्षांची शिक्षा त्यांना ठोठावण्यांत आली. पण पुढें एकाएकीं त्यांची शिक्षा रद्द करण्यांत आल्याचें त्यांना कळविण्यांत आलें व नाभा संस्थानांत प्रवेश न करण्याबद्दल हुकुम बजावण्यांत आला. या अडीच वर्षांच्या शिक्षेपैकीं त्यांनीं जवळ जवळ एकही दिवस शिक्षा भोगली नाहीं.

१९२९ सालीं सायमन कमिशनचा निषेध करण्यासाठीं पं. नेहरू लखनौला गेले होते. त्यांची तुकडी अग्रभागीं होती. त्यांच्यावर लाठीवाले घोडेस्वार पोलीस घालण्यांत आले. पं. नेहरू या जमावांत होते. बाजूला व्हावें असा एक क्षणभर त्यांना मोह झाला होता, परंतु लगेच मोठ्या धैर्यानें ते पुढें आले व पोलीसांच्या लाठीमाराला त्यांनीं तोंड दिलें. या प्रसंगाबद्दल पंडितजी म्हणतात, " लाठीमाराचें जरी मला खूप दुःख झालें होतें तरी लाठीमार सहन करण्याइतकी ताकद माझ्यांत आहे याचाच मला अभिमान व आनंद वाटला. "

पं. नेहरूंच्या विविध राजकीय चळवळींमुळें १९२८–१९२९ सालींच त्यांना अटक होईल अशी बोलवा होती. पण १९३० च्या एप्रिलमध्यें सत्याग्रहाचा लढा सुरू झाल्यावर त्यांना पकडण्यांत आलें. मध्यप्रांतात

रायपूरला जाण्यासाठीं ते गाडींत बसत असतां ,ता. १४ एप्रिलला त्यांना पकडण्यांत आलें व मिठाच्या कायद्याखालीं त्यांना त्याच दिवशीं सहा महिन्यांची शिक्षा सांगण्यांत आली. ता. ११ ऑक्टोबरला त्यांची मुक्तता झाली; पण ते कायदेभंगाचे दिवस असल्यामुळें त्यांना फार दिवस स्वातंत्र्याचा उपभोग घेतां येणें शक्य नव्हतें. १४४ कलमाचा भंग केल्या-बद्दल नवव्या दिवशींच ता. १९ ऑक्टोबरला त्यांना पुन्हां अटक करण्यांत आली. कांहीं दिवसांनंतर त्यांचा खटला सुरू झाला. अलाहाबादचें त्यांचे कुठलें तरी एक भाषण घेऊन त्याबद्दल त्यांच्यावर इं. पी. कोड, कलम १२४–अ, १८८२ चा मिठाचा कायदा व १९३० चा सहावा वटहुकुम या कायद्यांचा भंग केल्याचा आरोप ठेवण्यांत आला व अठरा महिने, सहा महिने व सहा महिने अशी शिक्षा व ५००, १०० व १०० असा ७०० रुपये दंड करण्यांत आला. एकूण शिक्षा दोन वर्षें होती. पं. नेहरूंचा हा पांचवा तुरुंगवास होय. पंडित मोतीलाल यांच्या भयंकर आजारीपणामुळें ता. २६ जानेवारी १९३१ रोजीं त्यांची मुक्तता करण्यांत आली.

म. गांधी गोलमेज परिषदेहून परत येण्याच्या सुमारास संयुक्त प्रांतांतील किसान चळवळींत भाग घेण्याच्या आरोपावरून ता. २६ डिसेंबर १९३१ रोजीं अलाहाबादेहून मुंबईस जाणाऱ्या आगगाडींत पंडितजींना अटक झाली. ४ जानेवारीला त्यांचा खटला चालून दोन वर्षें सक्तमजुरी त्यांच्या वांट्याला आली. ही त्यांची सहावी तुरुंगाची वारी.

पं. नेहरूंचा हा तुरुंगवास ता. ३० ऑगस्ट १९३३ रोजीं संपला. तथापि सहा महिन्यांच्या आंतच त्याचें पुनरुज्जीवन झालें. कलकत्त्याच्या एका भाषणावरून ता. ११ फेब्रुवारी १९३४ रोजीं त्यांवर वॉरंट बजावलें गेलें. पोलिस येतांच पं. नेहरू हंसत म्हणाले, ' बहोत दिनोंसे आपका इंतजार करता था'; (मी तुमची वाटच पहात होतों.) १६ फेब्रुवारीला कलकत्त्यास त्यांचा खटला चालून त्यांची नेहमीची दोन वर्षांची शिक्षा त्यांना झाली. यावेळीं

नैनी अगर डेहराडून हीं त्यांचीं परिचित स्थळें नव्हतीं तर कलकत्त्याच्या अलीपुर तुरुंगांत त्यांना हवापालट करण्याची संधि मिळाली होती. पुढें त्यांना नैनीला आणण्यांत आलें. तेथें असतांना त्यांच्या पत्नीची प्रकृति बिघडल्यावरून त्यांची ११ दिवस तात्पुरती सुटका करण्यांत आली होती. या मुदतीनंतर ते परत नैनीला गेले. पुढें कमला नेहरूंची प्रकृति अधिकच बिघडत गेली व त्यांना जर्मनींत बेडन-वायलर येथें नेण्यांत आलें. ता. ४ सप्टेंबर १९३५ रोजीं पंडितजींची अचानक मुक्तता करण्यांत आली व ते विमानानें युरोपकडे रवाना झाले.

दुसरें महायुद्ध सुरू झाल्यावर नैतिक भूमिकेवरून युद्धाला विरोध करण्यासाठीं म. गांधींच्या प्रेरणेनें वैयक्तिक सत्याग्रहाचा लढा सुरू झाला. पुष्कळांनीं या लढ्यांत भाग घेतला व पुष्कळ पुढाऱ्यांना कांहीं तरी कारणा-वरून अटक करण्यांत आली. पं. नेहरूंचें असेंच झालें. त्यांनीं वैयक्तिक सत्याग्रहांत भाग घेतला नव्हता, पण त्यांचें कोठलें तरी भाषण काढून त्यांना गिरफ्दार करण्यांत आलें. या भाषणावर ‘ राजद्रोही ’ असा शिक्का मारून कोर्टानें त्यांना ऑक्टोबर १९४० मध्यें चार वर्षांची शिक्षा फर्मावली. पण हिटलरनें तिकडे रशियावर अचानक हल्ला चढविल्यामुळें सबंध जग हादरलें आणि त्यामुळें ब्रिटिश सरकारचेंही धाबें दणाणलें. अशा परिस्थितीमुळें शिक्षेची मुदत भरण्यापूर्वींच एका वर्षाच्या अवधींत ता. ४ डिसेंबर १९४१ रोजीं पंडितजींची सुटका झाली. पण हा मधला मुक्ततेचा काळ आठ नऊ महिन्यांपेक्षां अधिक नव्हता.

मुंबईस भरलेल्या ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटीच्या बैठकींत तारीख ८ ऑगस्ट १९४२ रोजीं महात्मा गांधींनीं ‘ चले जाव ’ ही ऐतिहासिक घोषणा केली व कॉंग्रेसनें ठराव करून तिला मंजुरी दिली. हिंदी स्वातंत्र्याचा हा प्रचंड रणघोष ब्रिटिश राजसत्तेला अर्थातच मानवला नाहीं व तिनें महात्मा गांधींसकट देशांतील सर्व पुढाऱ्यांना ८ ऑगस्टच्या पहांटे अटक करून

त्यांच्यावर बेमुदत स्थानबद्धतेचा हुकुम बजावण्यांत आला. पं. नेहरूप्रभृति वर्किंग कमिटीच्या सभासदांना अहमदनगरच्या किल्ल्यांत ठेवण्यांत आलें. पं. नेहरूंच्या आतांपर्यंतच्या तुरुंगवासापेक्षां हा तुरुंगवास सर्वांत दीर्घ मुदतीचा होता, पण त्याहिपेक्षां तो बिनमुदतीचा होता असें म्हटल्यास चालेल. चौकशीशिवाय किंवा खटल्याशिवाय स्थानबद्ध करून ठेवलेल्या अवस्थेंत पंडितजींनीं ३५ महिने किंवा १०४१ दिवस काढले. ता. २८ मार्च १९४५ रोजीं अहमदनगर किल्ल्यांतून त्यांना नैनीला हलविण्यांत आलें व १५ जून १९४५ रोजीं त्यांची मुक्तता झाली. पंडितजींचा हा नववा व शेवटचा तुरुंगवास होय.

पं. नेहरूंचे हे तुरुंगवास म्हणजे त्यांच्या कार्याची पावती किंवा त्यांच्या देशसेवेची कसोटीच होय. त्यांना आतांपर्यंत नऊ वेळां ' स्वराज्यमंदिरां 'त जाण्याचा योग आला. आतांपर्यंत त्यांना जितक्या शिक्षा झाल्या त्यांची जर बेरीज केली तर त्यांच्या साठ वर्षांच्या आयुष्यापैकीं निदान निम्मीं वर्षें तरी त्यांचीं तुरुंगाच्या कोठडींत गेलीं असतीं. पण अनेकदां त्यांच्या शिक्षा पूर्ण होण्यापूर्वींच त्यांना सोडून देण्यांत येत असे, त्यामुळें स्थानबद्धते-खेरीज त्यांना दीर्घ काळ तुरुंगांत खितपत पडावें लागलें नाहीं. त्यांच्या पहिल्या सहा महिन्यांच्या शिक्षेपासून शेवटच्या पस्तीस महिन्यांच्या स्थान-बद्धतेपर्यंत त्यांच्या शिक्षांची बेरीज केली तर ती एका जन्मठेपेच्या शिक्षे-इतकी भरेल. त्यांच्या तीन शिक्षा त्यांतल्या त्यांत दीर्घकालीन होत्या. या अवधींत त्यांनीं ' जगाचा ओझरता इतिहास,' ' आत्मचरित्र ' व ' भारताचा शोध ' असे तीन महत्त्वपूर्ण ग्रंथ लिहिले. पंडितजींना खरी स्वस्थता तुरुंगांतच मिळत असे, त्यामुळें त्यांचें हें संस्मरणीय वाङ्मय कारागृहांतच निर्माण झालें. जगांतलें पुष्कळसें अमर वाङ्मय तुरुंगाच्या कोठडींतच लिहिलें गेलें आहे हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे.

# अध्यक्षपदापासून पंतप्रधानपदापर्यंत : : ५

१९१२ सालीं पं. जवाहरलाल विलायतेहून परत आल्यानंतर कांहीं वर्षें त्यांनीं देशाचें राजकारण व कॉंग्रेसचें कार्य पाहण्यांत घालविलीं. त्या वेळच्या राजकारणांत आकर्षक असें कांहीं नव्हतें. परदेशांतून नवी दृष्टी घेऊन आलेल्या जवाहरलालजींसारख्या तरुणांना तें वेधक वाटण्यासारखें नव्हतें. लो. टिळकांची मंडाले तुरुंगांतून सुटका झाल्यावर ते कांहीं तरी करूं शकतील अशी तरुणांना आशा वाटत होती पण ती फोल ठरली. तथापि त्यांच्या-ऐवजीं ॲनी बेझंट यांच्या होमरूल चळवळीचा डिंडिम मात्र देशांत सर्वत्र गाजत होता. तींतच लो. टिळक सामील झाले आणि या चळवळीचीं सूत्रें त्यांनीं आपल्या हातीं घेतलीं. होमरूल चळवळ देशभर पसरली. संयुक्त प्रांतांत पं. मोतीलाल नेहरूंसारखे प्रख्यात वकील व नेमस्त पुढारी पुढें आले व त्यांनीं आपल्या प्रांतात तिचा प्रचार करण्यास प्रारंभ केला. डॉ. बेझंट यांच्या अटकेमुळें देशांत सर्वत्र निषेधाचें वारें खेळूं लागलें होतें. त्यांतच लखनौ येथें एक प्रांतिक परिषद भरविण्यांत आली व पं. मोतीलाल नेहरू यांची एकमतानें अध्यक्षस्थानीं योजना झाली.

आतापर्यंत पं. मोतीलाल हे जरी जुन्या जमान्यांतले कॉंग्रेसवाले होते तरी मनानें नेमस्त व वृत्तीनें राजनिष्ठ होते. सरकारचा निषेध करणें हें

त्यांना मुळींच रुचण्यासारखें नव्हतें. त्यामुळें या परिषदेच्या अध्यक्षस्थानावरून त्यांनीं जें भाषण केलें त्या भाषणांत त्यांनीं ब्रिटिशांच्या सद्भावनेवर विश्वास ठेवा असा आदेश दिला. ‘ ब्रिटिश लोक हेच आपले अखेरचे भाग्यविधाते आहेत, ’ असें जेव्हां त्यांनीं आपल्या भाषणांत विधान केलें तेव्हां श्रोत्यांतून एक खणखणीत आवाज निघाला, ‘ प्रश्नच आहे ! ’ त्याबरोबर सर्वांचे डोळे त्या प्रश्नकर्त्याकडे वेधले गेले. पं. मोतीलाल नेहरूही हा प्रश्न ऐकून एकदम चिडले व टेबलावर जोरानें मूठ आपटून गरजले, ‘ कोण म्हणतो हें ? ’ त्याबरोबर पुन्हां श्रोत्यांमधून आवाज आला, ‘ प्रश्नच आहे ! ’ पं. मोतीलाल नेहरू उसळले व म्हणाले, ‘ ज्याला असें वाटत असेल त्यानें पुढें यावें व माझें विधान खोडून काढावें ! ’ पण कोणी पुढें आलें नाहीं व सभा शांतपणें पार पडली. हा प्रश्न पं. जवाहरलाल नेहरूंनीं उच्चारला होता व मोतीलाल नेहरूंच्या मागाहून तें लक्षांत आलें. या प्रसंगावरून पित्यापेक्षां पुत्राची विचारसरणी किती जोरानें पुढें धांवत होती याची कल्पना येते.

पंजाब प्रकरणापूर्वीं रौलेट कायदा पास झाला होता व त्याच्या निषेधाचे व धिक्काराचे पडसाद सर्व देशभर घुमत होते. आणि ठिकठिकाणीं सभा, हरताळ व सत्याग्रह यांची लाट उसळली होती. नागपूरला म. गांधींचा असहकारितेचा सर्वव्यापी ठराव पास झाल्यावर कलकत्त्याच्या जादा अधिवेशनापासून त्या ठरावावर जोराची प्रतिक्रिया होऊं लागली. बहिष्काराच्या प्रश्नाला जोराची चालना मिळाली व असहकारिता आणि बहिष्कार यांचे निनाद हवेंत दुमदुमूं लागले. ब्रिटनचे प्रिन्स ऑफ वेल्स यांचें आगमन होतांच त्यांच्या स्वागताची प्रचंड मोहीम सुरू झाली व या मोहिमेंत भाग घेणारे लाला लजपतराय, सी. आर. दास, मोतीलाल नेहरू, जवाहरलाल नेहरू वगैरे शेंकडों जण सरकारी रोषाला बळी पडले.

जवाहरलाल नेहरूंना सहा महिन्यांची पहिली शिक्षा झाली, पण तीन महिन्यांनंतर सुटून आल्यावर त्यांना पिकेटिंगबद्दल पुन्हां पकडण्यांत आलें व

दीड वर्षांची शिक्षा झाली. १९२३ सालीं नाभा संस्थानांत सत्याग्रह केल्या-बद्दल त्यांच्यावर अटकेचा प्रसंग गुदरला व दोन वर्षांचा तुरुंगवास भोगण्याची पाळी आली; पण त्यांना ही शिक्षा भोगावी लागली नाहीं.

काँग्रेसमध्यें राजकारण करीत असतां जवाहरलाल नेहरूंना आपल्या शहराच्या स्थानिक स्वराज्य संस्थेंत भाग घेण्याची इच्छा झाली व त्याप्रमाणें ते नगरपालिकेच्या निवडणुकीला उभे राहिले व निवडूनही आले. इतकेंच नव्हे तर १९२२ ते १९२५ अशीं तीन वर्षें ते अलाहाबादचे मेयर उर्फ नगराध्यक्ष होते. हा मान त्यांच्या वयाच्या मानानें त्यांना फार तरुणपणीं मिळाला. या मानाच्या मागें त्यांचें जसें कर्तृत्व होतें त्याप्रमाणें मोतीलाल यांची पुण्याईही होती, हें विसरून चालणार नाहीं. काँग्रेसनें स्थानिक स्वराज्य संस्था काबीज करावयाच्या असें त्यावेळचें सार्वत्रिक धोरण असल्या-मुळें ठिकठिकाणचे प्रांतिक पुढारी नगराध्यक्षपदीं विराजमान झालेले दिसत होते. चित्तरंजन दास कलकत्त्याचे मेयर, विठ्ठलभाई पटेल मुंबईचे मेयर, वल्लभभाई पटेल अहमदाबादचे नगराध्यक्ष, न. चिं. केळकर पुण्याचे नगरा-ध्यक्ष व जवाहरलाल नेहरू अलाहाबादचे मेयर अशा प्रकारें स्थानिक स्वराज्य-संस्थांचें नेतृत्व नामवंत काँग्रेस पुढाऱ्यांच्या हातीं होतें. काँग्रेसच्या राजकारणाचा पुढें जसा उत्तरोत्तर उत्कर्ष, विकास व विस्तार होऊं लागला, तसतसा काँग्रेसच्या नेतृत्वाचा मध्यबिंदु वरवर सरकत चालला. स्थानिक स्वराज्य-संस्था व लोकल-बोर्डें काबीज केल्यानंतर प्रांतिक कायदे मंडळें व मध्य-वर्ती कायदे-मंडळें यांच्याकडे काँग्रेसचा मोर्चा वळला. प्रांतिक स्वायत्ततेनंतर प्रांतिक मंत्रिमंडळें, नंतर घटना परिषद आणि शेवटीं मध्यवर्ती मंत्रिमंडळ अशा क्रमाक्रमानें काँग्रेसच्या सनदशीर राजकारणाचा क्रांतिकारक विकास होत गेला.

गोहत्ती काँग्रेसनें पं. जवाहरलाल नेहरूंना ब्रुसेल्स येथें भरणाऱ्या साम्राज्य-विरोधी आंतरराष्ट्रीय परिषदेचे अधिकृत प्रतिनिधि म्हणून नियुक्त केल्यावर ते त्या परिषदेच्या अधिवेशनाला हजर राहिले व तेथें त्यांनीं फार महत्त्वाचा

भाग घेतला. पहिल्या दिवशीं ज्यांचीं भाषणें झालीं त्यांत ते होते आणि परिषदेच्या विषयनियामक समितींतही त्यांची नेमणूक झाली होती. इतकेंच नव्हे तर हिंदी शिष्टमंडळाचे प्रमुख या नात्यानें एक दिवस परिषदेच्या अध्यक्षस्थानीं बसण्याचा मान त्यांना मिळाला होता. या परिषदेनें शेवटीं पांच जणांचें जें कार्यकारी मंडळ निवडलें त्यांत डॉ. आइन्स्टिन, रोमां रोलां, मादाम सन्यत्सेन व जॉर्ज लॅन्सबरी यांच्याबरोबर पं. जवाहरलाल यांचाही समावेश झाला होता. या परिषदेमुळें पं. नेहरूंचा युरोपांतील पुढारी व आंतरराष्ट्रीय राजकीय कार्यकर्ते यांच्याशीं निकट संबंध आला व त्यांना व्यापक आंतरराष्ट्रीय दृष्टिकोणाची यथार्थ कल्पना आली. पंडित नेहरूंचा राष्ट्रीय आंतरराष्ट्रवाद येथूनच सुरू झाला असें म्हटल्यास तें चुकीचें ठरणार नाहीं.

हिन्दी जनतेनें स्वराज्यासाठीं जे प्रयत्न चालविले होते त्यांचें ध्येय 'होमरूल', 'जबाबदारीचें स्वराज्य', 'डोमिनियन स्टेटस्' ऊर्फ वसाहतीचें स्वराज्य यापलीकडे गेलें नव्हतें. पण जवाहरलाल नेहरूंनीं स्थापन केलेल्या 'हिन्दी स्वातंत्र्य संघ' या संस्थेच्या पुरस्कारानें त्यांनीं मद्रास कॉंग्रेसमध्यें 'हिन्दी राष्ट्राचें ध्येय संपूर्ण स्वातंत्र्य आहे,' अशा अर्थाचा ठराव मांडला व तो प्रचंड बहुमतानें मंजूर झाला. त्यांच्या या ठरावाला सुभाषचंद्र बोस यांच्याप्रमाणें पं. मदनमोहन मालवीय व डॉ. ॲनी बेझंट यांनींसुद्धां मनःपूर्वक पाठिंबा दिला. त्यावेळीं इंग्लंडचे होम मेंबर हेले व भारतमंत्रि बर्कनहेड यांनीं हिन्दी राष्ट्राच्या अंतिम ध्येयासंबंधीं जे उन्मत्त प्रलाप काढले होते त्यांना उत्तर देण्यासाठीं पं. जवाहरलाल नेहरूंनीं स्वातंत्र्याच्या ध्येयाचा ठराव मांडून त्यांना सणसणीत चपराक लगावली. मद्रास कॉंग्रेसच्या अधिवेशनांत जवाहरलाल नेहरूंना कॉंग्रेसचे सेक्रेटरी नेमण्यांत आलें.

स्वातंत्र्य संघाप्रमाणें जवाहरलाल नेहरूंनीं युवक संघ स्थापन करून युवकांच्या चळवळींना जोरदार चालना दिली. देशांतील तरुणांत जागृति उत्पन्न करण्याचें श्रेय कॉंग्रेसपेक्षां जवाहरलाल नेहरूंच्या युवक संघाला दिलें

पाहिजे. या युवकांमधूनच जरी जहाल क्रांतिकारक प्रवृत्ति निर्माण झाली तरी देशांतील स्वातंत्र्याच्या लढ्याला प्रभावशाली गति देण्याचें कार्य या चळवळीच्याच द्वारें झालें, हें कोणालाही मान्य करावें लागेल. १९२८ सालीं झांशीला भरलेल्या संयुक्तप्रांत प्रांतिक परिषदेच्या अध्यक्षपदावरून भाषण करतांना जवाहरलाल नेहरूंनीं युवक चळवळीचे उद्देश स्पष्ट केले व जातीय वादांत गुरफटलेल्या राजकीय पुढाऱ्यांना त्यांच्या अदूरदृष्टीबद्दल दोष दिला.

* * *

अलाहाबाद म्युनिसिपॅलिटीच्या अध्यक्षपदाची त्रैवार्षिक मुदत संपण्यापूर्वीच जवाहरलाल नेहरूंनीं निवृत्त होण्याचें ठरविलें. त्यावेळीं म्युनिसिपॅलिट्यांवर सरकारचीं इतकीं कडक बंधनें होतीं कीं कोणत्याही राष्ट्रीय वृत्तीच्या माणसाला नगरपालिकेंत काम करणें अशक्य होतें. जवाहरलाल बाहेर पडण्याची संधि पहात होते, इतक्यांत तीच चालत आली. १९२५ च्या अखेरीस पं. नेहरूंच्या पत्नी कमला नेहरू आजारी पडल्या व त्यांना प्रकृतिस्वास्थ्यासाठीं स्विट्झर्लंडला नेल्याशिवाय गत्यंतर नाहीं, असें डॉक्टरांनीं सांगितलें. त्यामुळें अलाहाबाद नगरपालिका व निर्जीव हिंदी राजकारण यांच्यापासून कांहीं काळ सुटका झाल्याचा त्यांना फार आनंद वाटला, यांत नवल नाहीं. परदेशांत गेल्याशिवाय नवी दृष्टी येणार नाहीं व मन उजळणार नाहीं असें त्यांना वाटत असल्यामुळें ही संधि येतांच १९२६ च्या मार्च महिन्यांत पत्नी व कन्या यांच्यासह त्यांनीं युरोपला प्रयाण केलें.

युरोपांतल्या या प्रवासांत पंडित नेहरूंना अनेक हिंदी क्रांतिकारक भेटले. श्यामजी कृष्णवर्मा, राजा महेंद्रप्रताप, मादाम कामा, मौलवी ओबेदुल्ला, लाला हरदयाळ, वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय व एम्. एन्. रॉय या लोकांना भेटण्याचा त्यांना योग आला. १९२७ च्या फेब्रुवारींत ब्रुसेल्सला भरलेल्या साम्राज्यविरोधी परिषदेला ते कॉंग्रेसचे अधिकृत प्रतिनिधि म्हणून हजर राहिले. त्यानंतर नोव्हेंबरमध्यें सोव्हिएट रशियाच्या दहाव्या वाढदिवसानिमित्त ते

त्यांना मुळींच रुचण्यासारखें नव्हतें. त्यामुळें या परिषदेच्या अध्यक्षस्थाना-वरून त्यांनीं जें भाषण केलें त्या भाषणांत त्यांनीं ब्रिटिशांच्या सद्भावनेवर विश्वास ठेवा असा आदेश दिला. 'ब्रिटिश लोक हेच आपले अखेरचे भाग्य-विधाते आहेत,' असें जेव्हां त्यांनीं आपल्या भाषणांत विधान केलें तेव्हां श्रोत्यांतून एक खणखणीत आवाज निघाला, 'प्रश्नच आहे!' त्याबरोबर सर्वांचे डोळे त्या प्रश्नकर्त्याकडे वेधले गेले. पं. मोतीलाल नेहरूही हा प्रश्न ऐकून एकदम चिडले व टेबलावर जोरानें मूठ आपटून गरजले, 'कोण म्हणतो हें?' त्याबरोबर पुन्हां श्रोत्यांमधून आवाज आला, 'प्रश्नच आहे!' पं. मोतीलाल नेहरू उसळले व म्हणाले, 'ज्याला असें वाटत असेल त्यानें पुढें यावें व माझें विधान खोडून काढावें!' पण कोणी पुढें आलें नाहीं व सभा शांतपणें पार पडली. हा प्रश्न पं. जवाहरलाल नेहरूंनीं उच्चारला होता व मोतीलाल नेहरूंच्या मागाहून तें लक्षांत आलें. या प्रसंगावरून पित्यापेक्षां पुत्राची विचारसरणी किती जोरानें पुढें धांवत होती याची कल्पना येते.

पंजाब प्रकरणापूर्वी रौलेट कायदा पास झाला होता व त्याच्या निषेधाचे व धिक्काराचे पडसाद सर्व देशभर घुमत होते. आणि ठिकठिकाणीं सभा, हरताळ व सत्याग्रह यांची लाट उसळली होती. नागपूरला म. गांधींचा असहकारितेचा सर्वव्यापी ठराव पास झाल्यावर कलकत्त्याच्या जादा अधि-वेशनापासून त्या ठरावावर जोराची प्रतिक्रिया होऊं लागली. बहिष्काराच्या प्रश्नाला जोराची चालना मिळाली व असहकारिता आणि बहिष्कार यांचे निनाद हवेंत दुमदुमूं लागले. ब्रिटनचे प्रिन्स ऑफ वेल्स यांचें आगमन होतांच त्यांच्या स्वागताची प्रचंड मोहीम सुरू झाली व या मोहिमेंत भाग घेणारे लाला लजपतराय, सी. आर. दास, मोतीलाल नेहरू, जवाहरलाल नेहरू वगैरे शेंकडों जण सरकारी रोषाला बळी पडले.

जवाहरलाल नेहरूंना सहा महिन्यांची पहिली शिक्षा झाली, पण तीन महिन्यांनंतर सुटून आल्यावर त्यांना पिकेटिंगबद्दल पुन्हां पकडण्यांत आलें व

दीड वर्षांची शिक्षा झाली. १९२३ सालीं नाभा संस्थानांत सत्याग्रह केल्या-बद्दल त्यांच्यावर अटकेचा प्रसंग गुदरला व दोन वर्षांचा तुरुंगवास भोगण्याची पाळी आली; पण त्यांना ही शिक्षा भोगावी लागली नाहीं.

काँग्रेसमध्यें राजकारण करीत असतां जवाहरलाल नेहरूंना आपल्या शहराच्या स्थानिक स्वराज्य संस्थेंत भाग घेण्याची इच्छा झाली व त्याप्रमाणें ते नगरपालिकेच्या निवडणुकीला उभे राहिले व निवडूनही आले. इतकेंच नव्हे तर १९२२ ते १९२५ अशीं तीन वर्षें ते अलाहाबादचे मेयर उर्फ नगराध्यक्ष होते. हा मान त्यांच्या वयाच्या मानानें त्यांना फार तरुणपणीं मिळाला. या मानाच्या मागें त्यांचें जसें कर्तृत्व होतें त्याप्रमाणें मोतीलाल यांची पुण्याईही होती, हें विसरून चालणार नाहीं. काँग्रेसनें स्थानिक स्वराज्य संस्था काबीज करावयाच्या असें त्यावेळचें सार्वत्रिक धोरण असल्या-मुळें ठिकठिकाणचे प्रांतिक पुढारी नगराध्यक्षपदीं विराजमान झालेले दिसत होते. चित्तरंजन दास कलकत्त्याचे मेयर, विठ्ठलभाई पटेल मुंबईचे मेयर, वल्लभभाई पटेल अहमदाबादचे नगराध्यक्ष, न. चिं. केळकर पुण्याचे नगरा-ध्यक्ष व जवाहरलाल नेहरू अलाहाबादचे मेयर अशा प्रकारें स्थानिक स्वराज्य-संस्थांचें नेतृत्व नामवंत काँग्रेस पुढाऱ्यांच्या हातीं होतें. काँग्रेसच्या राजकारणाचा पुढें जसा उत्तरोत्तर उत्कर्ष, विकास व विस्तार होऊं लागला, तसतसा काँग्रेसच्या नेतृत्वाचा मध्यबिंदु वरवर सरकत चालला. स्थानिक स्वराज्य-संस्था व लोकल-बोर्डे काबीज केल्यानंतर प्रांतिक कायदे मंडळें व मध्य-वर्ती कायदे-मंडळें यांच्याकडे काँग्रेसचा मोर्चा वळला. प्रांतिक स्वायत्ततेनंतर प्रांतिक मंत्रिमंडळें, नंतर घटना परिषद आणि शेवटीं मध्यवर्ती मंत्रिमंडळ अशा क्रमाक्रमानें काँग्रेसच्या सनदशीर राजकारणाचा क्रांतिकारक विकास होत गेला.

गोहत्ती काँग्रेसनें पं. जवाहरलाल नेहरूंना ब्रुसेल्स येथें भरणाऱ्या साम्राज्य-विरोधी आंतरराष्ट्रीय परिषदेचे अधिकृत प्रतिनिधि म्हणून नियुक्त केल्यावर ते त्या परिषदेच्या अधिवेशनाला हजर राहिले व तेथें त्यांनीं फार महत्त्वाचा

मॉस्कोला गेले. त्यावेळीं पं. मोतीलाल नेहरू युरोपांत आले होते. ही सर्वच मंडळी चारपांच दिवस मॉस्कोला राहिली होती. १९२७ अखेर जवाहरलाल परतले, व कॉंग्रेसच्या अधिवेशनासाठीं मद्रासला दाखल झाले.

युरोपांतून आल्यामुळें जवाहरलाल नेहरूंना अगदीं नवी दृष्टी आली होती व त्या दृष्टीनें ते हिंदी राजकारणाकडे व कॉंग्रेसकडे पाहूं लागले होते. मद्रासच्या बैठकींत त्यांनीं संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मांडला. त्याचप्रमाणें आगामी जागतिक युद्धाचा इषारा देऊन साम्राज्यशाहीशीं दोन हात करण्याची आपण तयारी केली पाहिजे असें सांगितलें. पं. नेहरूंच्या स्वातंत्र्याच्या या ठरावाला ॲनी बेझंट यांनीं पाठिंबा दिला होता हें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें आहे. कॉंग्रेसच्या अधिवेशनाच्या वेळीं मद्रासला एक रिपब्लिकन् परिषद भरली होती व तिचें अध्यक्षस्थान नेहरूंना देऊं केलें होतें. या परिषदेचें हें पहिलेंच अधिवेशन होतें व तिची कल्पना मोठी नावीन्यपूर्ण होती; त्यामुळें स्वतःला लोकशाहीवादी समजणाऱ्या नेहरूंनीं या परिषदेचें अध्यक्षस्थान विभूषित केलें.

हिंदी राज्यघटना तयार करण्यासाठीं सर्वपक्षीय परिषदेनें जी समिति नेमली होती तिचे अध्यक्ष पं. मोतीलाल नेहरू होते व या कमिटीनें तयार केलेल्या रिपोर्टाला ‘ नेहरू रिपोर्ट ’ असें जरी नांव देण्यांत आलें होतें तरी तो तयार करण्याचें बहुतेक श्रेय सर तेजबहादूर सप्रू यांनाच होतें. जवाहरलाल हे नेहरू-समितीचे सभासद नव्हते तरी कॉंग्रेसचे सेक्रेटरी असल्यामुळें त्यांना रिपोर्टाच्या कामीं मदत करणें भाग होतें. खरें पाहिलें असतां जवाहरलाल यांना ही कागदी घटना तयार करणें मुळींच मान्य नव्हतें. प्रत्यक्ष सत्ता हातीं आल्याशिवाय असे कागदी घोडे नाचविणें त्यांना नापसंत होतें, पण त्याहिपेक्षां या कमिटीनें ‘ वसाहतीचें स्वराज्य ’ हें जें अंतिम ध्येय ठरविलें होतें त्याची जवाहरलाल यांना चीड आली होती. पण कॉंग्रेसचे सेक्रेटरी या अधिकारपदामुळें त्यांनीं आपले मतभेद मनांत ठेवून जितकें शक्य होतें तितकें कामिटीला साहाय्य केलें.

पुढें सायमन कमिशन आलें आणि त्याच्या निषेधाची देशभर चळवळ सुरू झाली. जेथें जेथें हें कमिशन गेलें तेथें तेथें ' सायमन परत जा ! ' ' चालते व्हा ! ' अशा आरोळ्यांनीं आकाश भरून जात असे. ठिकठिकाणीं निषेधाच्या मिरवणुका निघत, पण त्यांना बंदी होई व त्या रोखल्या जात. अलाहाबादेस अशीच एक मिरवणूक निघाली असतां जवाहरलाल नेहरू, गोविंद वल्लभ पंत प्रभृतींवर पोलिसांनीं लाठीमार केला व मिरवणूक उधळून लावली. पं. नेहरूंना प्रत्यक्ष शारीरिक इजा या प्रसंगीं झाली व राष्ट्रीय पुढाऱ्यांना कशा हालअपेष्टा भोगाव्या लागतात याचा अनुभव आला.

१९२८ सालांत सायमन कमिशन-बहिष्कार व सर्वपक्षीय परिषद या दोन महत्त्वाच्या घटना घडल्या तरी जवाहरलाल यांचें सारें लक्ष समाजवादी दृष्टीनें देशांत संघटना कशी करतां येईल इकडे लागलेलें होतें. त्या दिशेनें प्रयत्न करण्यासाठीं त्यांनीं युवक चळवळ सुरू केली व कामगार परिषदेंत भाग घेण्यास प्रारंभ केला. त्या सालीं पंजाब, मलबार, दिल्ली, संयुक्तप्रांत इत्यादि ठिकाणच्या प्रांतिक परिषदांचे ते अध्यक्ष झाले व पुणें आणि कलकत्ता येथील युवक परिषदांचें त्यांनीं नेतृत्व केलें. तसेंच कलकत्ता कॉंग्रेसच्या वेळीं अखिल भारतीय ट्रेड युनियन कॉंग्रेसचे अध्यक्ष म्हणून त्यांची एकमतानें निवडणूक झाली.

कलकत्ता कॉंग्रेसनंतर १९२९ चें पुढचें अधिवेशन लाहोर येथें भरण्याचें ठरलें. सर्व प्रांतिक कमिट्यांनीं महात्मा गांधींचें नांव अध्यक्षपदासाठीं सुचविलें, पण गांधीजींनीं नकार दिला. त्यामुळें मोठी अडचणीची परिस्थिति निर्माण झाली. पण गांधीजींनीं जवाहरलाल नेहरूंचें नांव पुढें करून ' यंग इंडियां'त त्यांची खूप तरफदारी केली. गांधीजींच्या सूचनेचा कोणी अव्हेर करणें शक्य नव्हतें, पण पुष्कळांना ती मनांतून पसंत पडली नाहीं.

१९२९ सालच्या डिसेंबर महिन्याच्या अखेर लाहोर येथें भरणाऱ्या ४४ व्या कॉंग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून पं. जवाहरलाल नेहरूंची निवड करण्यांत आली. पं. मोतीलाल नेहरूंच्या पाठोपाठ दुसऱ्याच वर्षीं पित्याच्या

१२०२३
१९८१८३

## म. गांधी आणि पं. नेहरू : : ६

गांधी आणि नेहरू ! नेहरूंच्या जीवनाशीं गांधीजींचा इतका संबंध आला आहे कीं गांधींशिवाय नेहरूंचें चरित्र अपुरेंच राहील. नेहरूंचें जवळ जवळ अडीच तपांचें आयुष्य गांधीजींशीं निगडित आहे. नेहरूंच्या जीवनावर गांधींचा इतका परिणाम झाला आहे कीं कांहीं नैतिक व व अध्यात्मिक जीवनमूल्यें वजा केलीं तर, गांधींनींच खुद्द म्हटल्याप्रमाणें नेहरू आज गांधींचे वारस ठरले आहेत. नेहरूंच्या जीवनांत गांधींचा प्रवेश झाला नसता तर हिंदी राष्ट्राचा इतिहास कांहीं वेगळाच लिहिला गेला असता. त्याचप्रमाणें ही गोष्टही खरी आहे कीं गांधींना नेहरूंसारखा सच्चा व निष्ठावंत अनुयायी लाभला नसता तर त्यांचें देशोद्धाराचें कार्य इतकें सुफलित झालें असतें किंवा नाहीं याबद्दल शंकाच आहे. गांधी आणि नेहरू यांचें नातें सकृद्दर्शनीं गुरु-शिष्यसंबंधाचें दिसलें तरी वास्तविक पाहतां दोघे परस्परांचे पूरक आहेत. गांधी विश्वकुटुंबवादी असले तर नेहरू आंतर-राष्ट्रीयवादी आहेत. गांधी अध्यात्मवादी असले तर नेहरू भौतिकवादी आहेत. नेहरूंना गांधींची सत्य, अहिंसा, धर्म, आध्यात्मिकता, ईश्वरनिष्ठा, प्रार्थना किंवा अंतःसंदेश या गोष्टी मनापासून पटल्या नाहींत; कारण त्यांचा

पिंड वास्तववादी व व्यवहारी आहे. त्यांत श्रद्धा, अध्यात्म, धर्मनिष्ठा, इत्यादिकांना स्थान नाहीं. गांधींचें जीवन म्हणजे नीति आणि धर्म यांचा समन्वय होय. गांधी हे मुख्यतः संत व साधु पुरुष होत. राजकारण हें त्यांचें खरें कार्यक्षेत्र नव्हे. ‘अनिच्छन् अपि वार्ष्णेय बलादिव नियोजित’ या उक्तीप्रमाणें परकीयांच्या दास्यांतून हिंदी राष्ट्राची मुक्तता करण्यासाठीं ते राजकारणांत प्रविष्ट झाले. तथापि तेथेंही त्यांनीं आपलीं तत्त्वें सोडलीं नाहींत आणि यांतच गांधींच्या श्रेष्ठतेचें व जागतिक कीर्तीचें रहस्य अंतर्भूत झालेलें आहे.

महात्मा गांधींचा समाजवाद व पं. नेहरूंचा समाजवाद यांत पुष्कळच फरक आहे. आर्थिक समतेवर आधारलेला भौतिक स्वरूपाचा पंडितजींचा समाजवाद गांधीजींच्या विश्वस्त कल्पनेवर उभारलेल्या अध्यात्मिक समाजवादाशीं मुळींच जुळता नाहीं. हिंदी राष्ट्राचें अंतिम ध्येय समाजसत्तावादावर आधारलेल्या प्रजासत्ताक लोकशाहीचें आहे, अशी पं. नेहरूंची राजकीय विचारप्रणाली आहे. म. गांधींच्या खादीवर अगर ग्रामोद्योगावर त्यांचा विश्वास नसला तरी गांधीजींच्या विचारसरणींत कांहीं तथ्य आहे असें त्यांना निश्चित वाटे व त्या दिशेनें ते विचार करूं लागत. देशाच्या आर्थिक दुर्दशेवर खादी हा एक परिणामकारक उपाय आहे अशी त्यांची ठाम समजूत झाली होती. राजकीय व आर्थिक दृष्टीनें खादीचें महत्त्व गांधीजींप्रमाणें नेहरूंना मान्य होतें, पण गांधींचा ग्रामोद्योग त्यांना पटत नसे. कारण ते यांत्रिकीकरणाचे व आधिभौतिक शोधांचे पुरस्कर्ते आहेत. राजकारणांत अर्थकारणाला प्राधान्य असावें अशा मताचे ते होते. “मला स्वतः राजकीय व आर्थिक अशी दोन्हीं प्रकारची संपूर्ण लोकशाही हवी आहे;” असें गांधीजी म्हणत.

म. गांधी आणि पं. नेहरू यांची तुलना अनेकांनीं केली आहे. त्यांतल्या त्यांत चिनी विचारवंत लिन युटांग व हिंदी ग्रंथकार अनुपसिंग यांनीं केलेलें तौलनिक विवेचन विशेष वाचनीय आहे. लिन युटांग म्हणतातः—“हिंदी

स्वातंत्र्याच्या लढ्यांत माझ्या दृष्टीनें गांधींचें नेतृत्व प्रकृतिस्वरूपाचें आहे तर नेहरूंचें पुरुषस्वरूपी आहे. प्रकृति-पुरुषामध्यें प्रकृति ही अधिक स्थिर, स्थायी व मूलभूत स्वरूपाची असते. चीनमध्यें सन्यत् सेन व चिआंग-कै-शेक यांच्या अगदीं याच स्वरूपाच्या भूमिका आहेत. प्रकृति ही जगाचा चिरकालीन विचार करते व तात्पुरत्या गोष्टीकडे मुळींच लक्ष देत नाहीं. महात्मा गांधी हे हजारों, लाखों शतकांचे चिरकालीन पुढारी आहेत तर नेहरूंचें नेतृत्व आजच्यापुरतें, तात्कालिक आहे...गांधींच्या दृष्टीनें अहिंसा हेंच अंतिम साध्य आहे; हिंसेच्या मार्गानें जर हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळविण्याची पाळी आली असती तर हिंदुस्थान स्वतंत्र होण्यापेक्षां कायमचा गुलामगिरींत पडला तरी चालेल असें गांधींना वाटलें असतें. कारण त्यांच्या मतें हिंदी राष्ट्राचा आत्मा हिंसेच्या द्वारें नष्ट होईल. पं. नेहरूंचा पुरुषस्वरूपी आत्मा या दिशेनें विचार करणार नाहीं. गांधी हे धर्मनिष्ठ असले तर नेहरू निरीश्वरवादी आहेत. अस्पृश्यतेबद्दलचा भाग वजा केल्यास गांधींना चातुर्वर्ण्य संस्था मान्य आहे, पण नेहरू वर्णाश्रमपद्धतीचे शत्रू आहेत. ही पद्धति नष्ट करून हिंदी समाजाची नवी रचना व्हावी असें त्यांचें मत आहे. गांधी चरख्याचे पुरस्कर्ते आहेत तर नेहरूंना यांत्रिक गिरण्या हव्या आहेत. दारिद्र्यग्रस्त हिंदी जनतेचें आक्रंदन ऐकून म. गांधींचें अंतःकरण द्रवतें, कारण त्यांचें हृदय साधुसंताचें आहे. जवाहरलाल नेहरू तुमच्या आमच्याप्रमाणेंच त्याकडे आर्थिक दृष्टीनें पाहतात. गांधींना दरिद्रनारायणाची कींव वाटते तर नेहरूंना या दारिद्र्याचा समूळ नाश करावयाचा आहे. या दोघांत श्रेष्ठ कोण ? गांधींची धार्मिकता व गूढ अंतर्ज्ञान यांच्याबरोबरच त्यांची तीक्ष्ण बुद्धिमत्ता या गोष्टी भारतीय असूनही सर्वसामान्य जनतेला आकलन होण्यासारख्या नाहींत. जवाहरलाल नेहरू मात्र आपल्यांतले वाटतात. आजची हिंदुस्थानांतील परिस्थिति अशी आहे कीं जनता नेहरूंचें ऐकते, नेहरू गांधींचें ऐकतात व गांधी परमेश्वरी आदेश ऐकतात."

गांधी आणि नेहरू यांची अशी तुलना करण्यापेक्षां हे दोघे एकमेकांबद्दल काय म्हणतात तें पाहणें अधिक मनोरंजक व उपयुक्त होईल. १९२९ सालीं लाहोर काँग्रेसचे अध्यक्ष म्हणून जवाहरलाल नेहरूंची निवड झाली त्यावेळीं म. गांधींनीं ' यंग इंडियां 'त पुढीलप्रमाणें उद्‌गार काढले:—" जवाहरलाल नेहरूंचें शौर्य अद्वितीय आहे. देशभक्तीच्या बाबतींत त्यांची कोण बरोबरी करूं शकेल ? ते अविचारी आणि साहसी आहेत असें कांहींचें म्हणणें आहे; पण आजच्या काळांत हा त्यांचा एक गुणच म्हटला पाहिजे. त्यांच्या अंगीं योद्ध्याचा निधडेपणा व वीरवृत्ति असली तरी राजकारणी पुरुषाला लागणारी मुत्सद्देगिरी त्यांच्या ठायीं आहे. ते कडव्या शिस्तीचे मोठे भोक्ते आहेत व वाटेल तितक्या कडक शिस्तींत काम करण्याची त्यांनीं आपली तयारी दाखविली आहे. ते आपल्या सभोंवताच्या परिस्थितीपलीकडे अत्यंत दूरवर पाहणारे व दुसऱ्या टोकाला जाऊन विचार करणारे आहेत; तथापि ते व्यवहाराच्या योग्य मर्यादा उल्लंघून जाणार नाहींत. तसे ते व्यवहारी व विनयशील आहेत. त्यांचें हृदय स्फटिकाप्रमाणें स्वच्छ आहे व त्यांची सत्यप्रीति संशयातीत आहे. त्यांच्या हातीं राष्ट्राचें भवितव्य सुरक्षित राहील. "

अहिंसेच्या बाबतींतही नेहरू व गांधी यांचा मतभेद असे व तत्त्वदृष्ट्या नेहरूंना अहिंसा, खादी, ग्रामोद्योग वगैरे गोष्टी योग्य वाटत असल्या तरी व्यवहारांत या गोष्टींवर त्यांचा विश्वास नाहीं. जवाहरलाल हे खादीभक्त असले व कधीं काळीं चरख्यावर सूत कातीत असले तरी असल्या ग्रामोद्योगांना त्यांच्या विचारसरणींत स्थान नाहीं. ते यांत्रिकीकरणाचे पुरस्कर्ते आहेत. तीच गोष्ट अहिंसेची. म. गांधींचें तत्त्वज्ञान त्यांना मनापासून पटलेलें आहे व ते सबंध जग फिरून आलेले असल्यामुळें हिंसेमुळें किती भयंकर अनर्थ होतात हें त्यांनीं प्रत्यक्ष पाहिलेलें आहे. तथापि ज्याला प्रत्यक्ष राज्यकारभार करावयाचा आहे त्याला हें तत्त्व कसें व कितपत अमलांत

आणतां येईल, अशी त्याना शंका वाटते. गांधीजींच्या अहिंसेच्या यशस्वितेबद्दल ते म्हणतात:

"गांधीजींच्या अहिंसक आंदोलनामुळेंच आज आपला देश स्वतंत्र झालेला आपल्याला दिसत आहे. आपली स्वातंत्र्याची चळवळ अहिंसक स्वरूपांत झाली नसती तर लक्षावधि लोक प्राणास मुकले असते आणि चळवळीनें भूमिगत स्वरूप धारण करून दहशतवादाचा अंगीकार केला असता. पण तसें झालें असतें तर स्वातंत्र्याच्या चळवळीला जी सर्वव्यापक प्रचंड गति मिळाली ती तिला कधींच मिळूं शकली नसती. एवढेंच नव्हे तर दहशतवादी अथवा भूमिगत स्वरूपांत ती राहिली असती तर ब्रिटिशांनीं तिला सहज चिरडून टाकलें असतें."

पं. नेहरू गांधीजींबद्दल पुढीलप्रमाणें उद्गार काढतात:—

"ज्यांना गांधींचा प्रत्यक्ष परिचय नाहीं व ज्यांनीं त्यांचें लिखाणच फक्त वाचलें आहे त्यांची अशी कल्पना होण्याचा संभव आहे कीं गांधी हे अत्यंत कर्मठ, वैराग्यशील, गंभीर व जगाला विटलेल्या ख्रिस्ती धर्मगुरुसारखे आंबलेल्या चेहऱ्याचे आहेत. पण त्यांच्या लिखाणावरून अशी कल्पना होत असेल तर तो त्यांना अन्याय आहे. आपल्या लिखाणापेक्षांही ते मोठे आहेत. त्यांच्या लिखाणावरून दिसतें त्यापेक्षां ते अगदीं निराळे आहेत. त्यांचें हृदय सदैव प्रफुल्ल, चेहरा हास्यपूर्ण व वृत्ति हर्षित असते. ते आपल्याबरोबर जणूं हास्य व आनंद यांचा ठेवा घेऊन हिंडतात. त्यांच्या आगमनानें सर्वत्र नवचैतन्याचा सुवास दरवळूं लागतो.

"गांधी हें एक अपूर्व गूढ आहे तितकेंच तें कूटही आहे. गांधीजींचें व्यक्तित्व न उलगडणाऱ्या कोड्यासारखें चित्त कुंठित करणारें आहे. गेलीं कित्येक वर्षें त्यांच्यापुढें मी हतबुद्ध झालों आहे. गांधी अहिंसेचे पुरस्कर्ते व दरिद्रनारायणाचे कैवारी आहेत, पण ज्या राज्यपद्धतीचा पाया हिंसा आहे त्या पद्धतीला ते अनुकूल आहेत हें कसें? खरें पाहिलें तर ते अमुकच

पद्धतीचे पुरस्कर्ते, भोक्ते अगर प्रचारक आहेत असें नाहीं; ते अराजकवादी तत्त्वज्ञ आहेत. पण हें आदर्श ध्येय फार दूरवर असल्यामुळें सध्याच्या समाजपद्धतीला ते मान्यता देत असावेत...

" गांधीजींची लोकप्रियता व वजन हिंदुस्थानांत सर्व ठिकाणीं आहे, पण त्यांच्या अहिंसेमुळें अगर आर्थिक तत्त्वज्ञानामुळें ते हिंदुस्थानांतील पुढाऱ्यांत सर्वश्रेष्ठ व अग्रेसर झाले आहेत असें नाहीं. हिंदी जनतेपुढें त्यांनीं जो स्वातंत्र्याचा आदर्श ठेवला आहे त्यामुळें ते सर्वत्र आदरणीय झाले आहेत. स्वातंत्र्याची महत्त्वाकांक्षा, पाशवी सत्तेचा नैतिक व अहिंसक प्रतिकार, अन्यायाच्या परिमार्जनासाठीं सत्याग्रह इत्यादि अनेक गोष्टींमुळें गांधीजी हिंदी स्वातंत्र्याचें प्रतीक झाले आहेत. कांहीं प्रसंगीं कित्येक लोकांचा त्यांच्याशीं मतभेद असेल, पण हिंदी स्वातंत्र्याच्या लढ्याचा प्रसंग उद्‌भवला कीं ते सर्वजण त्यांच्यामागें जातात व त्यांनाच आपला एकमेव पुढारी समजतात. गांधीजींच्या थोरवीचें रहस्य यांतच आहे."

अहिंसेमुळेंच हिंदुस्थानाला स्वातंत्र्य मिळालें हा सिद्धांत नेहरूंना पूर्णपणें मान्य आहे.

कित्येक पाश्चात्य लोकांना याचा उलगडा होत नाहीं कीं गांधी आणि नेहरू यांचें जमतें कसें ? हे दोघे एका भूमिकेवर कसे एकत्र येऊं शकतात ? कारण त्यांच्या मतें " गांधी हे मुख्यतः धर्मनिष्ठ साधुसंत आहेत, तर जवाहरलाल निरीश्वरवादी, नास्तिक आहेत. गांधींचा जुन्या सरंजामशाहीकडे ओढा असून औद्योगीकरणाच्या ते विरुद्ध आहेत, तर नेहरू आधुनिक विचारांचे मार्क्सवादी आहेत व औद्योगीकरणाचे पुरस्कर्ते आहेत. गांधी शांततावादी तर नेहरूंना आधुनिक पद्धतीचें हिंदी राष्ट्रीय सैन्य हवें आहे. यावरून गांधी–नेहरू ही युति राजकीय धोरणासाठीं कांहीं काल एकत्र आलेली असली तरी लवकरच तिचा भंग झाल्याशिवाय राहणार नाहीं." पण

हें म्हणणें अगदीं चूक आहे हें काळानें सिद्ध करून दाखविलेंच आहे. या दोघांत कितीही मतभेद असले तरी त्यांची परस्परांसंबंधीं इतकी दृढ निष्ठा व आत्मीयता असे कीं त्यामुळें त्या दोघांचें ऐक्य व सामरस्य कायम राहिलें.

# पंडितजींच्या शब्दांत पं. नेहरू : : ७

पं. जवाहरलाल नेहरूंनीं आपल्या ' आत्मचरित्रा 'खेरीज इतरत्र जें पुष्कळच आत्मनिवेदनपर लिखाण केलें आहे, त्यावरून पंडितजींच्या वैयक्तिक जीवनाची, त्यांच्या स्वभाववैशिष्ट्याची व त्यांच्या डोळ्यांपुढील ध्येयसृष्टीची यथार्थ कल्पना येईल. पंडितजींच्या जीवनाचे जे विविध पैलू व कप्पे आहेत ते इतके गुंतागुंतीचे व रहस्यमय आहेत कीं सर्वसामान्य माणसाला त्यांच्या संपूर्ण स्वरूपाचें दर्शन होणें दुर्घट आहे. तथापि त्यांचें आत्मपर लिखाण सुसंगत रीतीनें संकलितपणें वाचलें तर मात्र पं. नेहरू आपल्याला संपूर्ण स्वरूपांत पहावयास मिळतात. याच दृष्टीनें त्यांच्या अफाट वाङ्मयांतील कांहीं आत्मनिवेदनपर वेंचे येथें संकलित केले आहेत. दुसऱ्यांनीं लिहिलेल्या चरित्रापेक्षां पं. नेहरूंनीं लिहिलेलें हें चरित्र वाचकांना स्फटिकाप्रमाणें पारदर्शक वाटेल :

" सहासात वर्षांपूर्वीं मला एका अमेरिकन प्रकाशकाचें विनंतिपत्र आलें. त्यानें ' माझ्या जीवनाचें तत्त्वज्ञान ' या विषयावर एक लेख मागविला होता. अशा प्रकारचे लेख एकत्र करून एक संग्रह प्रसिद्ध करण्याचें त्यानें योजिलें होतें. मला ती कल्पना आकर्षक वाटली. पण मला एकदम रुकार देववेना. आणि मी जसजसा विचार करूं लागलों तसतसा माझा नकार पक्का झाला. अखेर मी तो लेख लिहिला नाहीं.

" खरेंच, माझ्या जीविताचें तत्त्वज्ञान काय होतें ? मला मुळींच ठाऊक नव्हतें. कांहीं वर्षांपूर्वी मी इतका बिचकलों नसतों. त्यावेळीं माझ्या विचारांत व ध्येयदृष्टींत एक प्रकारचा निश्चितपणा होता तो आज विरून गेला आहे. गेल्या कांहीं वर्षांत हिंदुस्थान, चीन, युरोप इत्यादि ठिकाणीं, फार काय, सबंध जगभर ज्या घटना घडून आल्या त्या जशा घोटाळ्याच्या, त्रासदायक व प्रक्षुब्ध करणाऱ्या होत्या, त्याप्रमाणें भविष्यकाळ हा अंधुक धुक्यासारखा व काळाकुट्ट दिसत होता. त्यामुळें माझें मन विचलित व संत्रस्त होऊन गेलें.

" मूलगामी तत्त्वांच्या बाबतींत जरी मी संशयात्मा बनलों होतों तरी माझी संशयाकुलता दैनंदिन कार्यक्रमाच्या आड आली नाहीं. तथापि एकादे वेळीं त्यांच्यावर थोडा तरी परिणाम झाल्याशिवाय राहात नसे. धनुष्यावरून सोडलेला बाण ज्याप्रमाणें आपोआप पण निश्चितपणें लक्ष्यवेध करूं शकतो त्याप्रमाणें माझ्या तरुण वयांत मी आपल्या ध्येयावर एकनिष्ठेनें अविचल दृष्टि ठेवीत होतों. ध्येयापलीकडे मला दुसरें कांहीं दिसत नव्हतें. पण यापुढें मी तशा एकांतिक ध्येयनिष्ठेनें वागूं शकणार नाहीं. माझी ध्येयनिष्ठा जरी थोडी ढळली असली तरी कांहीं तरी करावें अशी माझी तीव्र इच्छा होती. पण हळूंहळूं राजकारणाबद्दल माझ्या मनांत वाढती अप्रीति उत्पन्न होऊं लागली आणि त्यामुळें माझ्या जीवनदृष्टींत एकदम क्रांति होणार असें दिसूं लागलें.

" जीवनाकडे पाहण्याची माझी पहिली दृष्टी जशी शास्त्रीय स्वरूपाची तशी आशावादीपणाचीही होती. अर्थात् माझें जीवन अत्यंत सुखी व समृद्ध असल्यामुळें आणि आत्मविश्वास व उत्साहशक्ति अंगांतून सळसळत असल्यामुळें मला जिकडे तिकडे आशावाद दिसत असल्यास आश्चर्य नाहीं.

" धर्माच्या बाबतींत म्हणाल तर मी कांहींसा नास्तिक व उदासीन होतों. सुविचारी लोक जो धर्म पाळीत होते तो मला मुळींच आकर्षक वाटला नाहीं. त्या धर्मांत कांहीं अर्थ असेल अशी माझी मुळींच भावना झाली नाहीं.

म्हणजे मी हिंदु धर्माबद्दलच बोलतों आहे असें नाहीं, तर मुसलमान, बुद्ध, यहुदी, खिस्ती इत्यादि धर्मांबद्दल माझें हेंच मत आहे. कोणताही धर्म घेतला कीं, त्याच्याशीं खुळचट समजुती, अंधविश्वास, धर्मभोळेपणा इत्यादि अनेक गोष्टी निगडित झालेल्या आढळतात; आणि जीवनाकडे पाहण्याची धर्माची जी दृष्टी आहे ती स्वाभाविक नाहीं. ती अमानुष, दैवी सामर्थ्यावर उभारलेली, अतएव अशास्त्रीय आहे.

* * *

" वर्तमानकाळ व इहलोक यांच्याबद्दलच मी काय तो विचार करीत असतों. परलोक अगर भविष्यकाळ याबद्दल मला मुळींच जिज्ञासा वाटत नाहीं. आत्मा या नांवाचा एकादा पदार्थ आहे किंवा मृत्यूनंतर मनुष्याला पुनर्जन्म येतो किंवा काय यासंबंधीं मला कांहींच ठाऊक नाहीं. आणि हे प्रश्न माझ्या दृष्टीनें अतिशय महत्त्वाचे नसल्यामुळें माझ्या मनाला त्यांचा मुळींसुद्धां उपसर्ग पोंचत नाहीं. मी ज्या समाजांत वाढलों आहें त्या समाजांत आत्मा, पुनर्जन्म, कर्मविपाक, अवतार इत्यादि कल्पना सर्वमान्य आहेत. माझ्यावर त्यांचा परिणाम झाला असला तरी प्रतिकूल खास झाला नाहीं. मनुष्याचें पार्थिव शरीर नष्ट झाल्यावर आत्मा जिवंत राहात असेल! नाहीं कोणी म्हणावें ? कार्य आणि कारण, कारण आणि परिणाम या सर्व-सामान्य सिद्धांतानुसार कर्मविपाकाचें तत्त्वज्ञान सिद्ध करून दाखवितां येणार नाहीं काय ? पण माझा असल्या कोणत्याही गोष्टीवर विश्वास नाहीं. ज्या क्षेत्राची आपल्याला माहिती नाहीं अशा अज्ञात प्रांतांतील गोष्टींची चर्चा करणें ही नुसती बौद्धिक कसरत आहे.

" अज्ञाताच्या पलीकडे जें गूढ भरलेलें आहे त्या बाबतींत मी पूर्ण अन-भिज्ञ आहे. मी या गूढ सृष्टीला ईश्वर असें म्हणावयासही तयार नाहीं. कारण देव, ईश्वर अशा कल्पनांवर माझा रतिभरही विश्वास नाहीं. एकाद्या

मानवी सर्वश्रेष्ठ पुरुषोत्तमाची किंवा देवतेची साकार मूर्ति बनविण्याची कल्पना माझ्या मनांत देखील येत नाहीं. आणि सर्वसामान्य लोक अशा देवदेवतांना निर्माण करतांना पाहून मला आश्चर्य वाटतें. ईश्वर ही कल्पना मला चमत्कारिक वाटते. बौद्धिक दृष्टीनें पाहिलें तर एकत्वाची कल्पना मला त्यांतल्या त्यांत पसंत आहे आणि वेदांतांतल्या अद्वैत सिद्धांताकडे मी पुष्कळ वेळां आकृष्टही झालेलों आहे. मात्र त्या सिद्धांतांतील सर्व रहस्य खोलवर मला समजलें आहे असें मी म्हणत नाहीं. निसर्गांतील विविधता व माधुर्य पाहून माझें मन स्तिमित होतें आणि माझ्या मनांत एकत्वाची, संवादित्वाची भावना उत्पन्न होते.

" जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोण नैतिक स्वरूपाचा असावा हें मला एकदम मान्य आहे, पण त्याचें तर्कदृष्टया मला समर्थन करतां येणार नाहीं. गांधीजी सत्यावर जो जोर देतात त्यायोगें मी त्यांच्याकडे आकृष्ट झालों आहें आणि साधनशुद्धीबद्दलचा त्यांचा हा आग्रह म्हणजे सार्वजनिक जीवनाला त्यांनीं एक नवीनच दृष्टी दिली आहे असें म्हटल्यास चालेल. सत्याचें तत्त्व गांधीजींनीं नवीनच शोधून काढलें आहे असें नाहीं, तर मोठ्या प्रमाणावर सार्वजनिक जीवनांत हें नैतिक तत्त्व प्रत्यक्ष अमलांत आणण्याची त्यांची योजना अगदीं अपूर्व आहे. असा प्रयोग यापूर्वीं कोणीं केलेला नाहीं. जगांत सर्वसामान्य लोक आपल्या ध्येयावर अचल दृष्टी ठेवतात, पण साधनांची फिकिर करीत नाहींत. पण गांधीजींचा साधनशुद्धीचा पुरस्कार अभूतपूर्व व लक्षणीय नाहीं काय ? त्यांचा हा प्रयोग हिंदुस्थानांत किती यशस्वी झाला हें मला सांगतां येणार नाहीं; पण हजारों लोकांच्या अंतःकरणावर त्यांच्या तत्त्वाचा निश्चित ठसा उमटला आहे यांत यत्किंचितही शंका नाहीं.

* * *

" मी जरी समाजवादी तत्त्वज्ञानाची मूलभूत भूमिका मान्य केली असली तरी त्यांतून उत्पन्न झालेल्या अनेक अंतर्गत वादांत पडण्याची मी तसदी

घेतली नाहीं. डाव्या पक्षाच्या लोकांविषयीं मला विशेषशी सहानुभूति नाहीं. ते लोक आपापसांतल्या बारीक सारीक भांडणांतच आपली उत्साहशक्ति खर्च करतात. आपलें जीवन दिवसेंदिवस अधिकाधिक भानगडीचें व घोटाळ्याचें होत चाललें आहे आणि आज आपली जी ज्ञानकक्षा वाढत आहे, तिच्या दृष्टीनें पाहिलें तर विशिष्ट तत्त्वांच्या घट्ट चौकटींत आपलें जीवन बसवण्याचा प्रयत्न करणें हें तर्काला धरून होणार नाहीं.

* * *

" मी गेल्या बारा वर्षांत अतिशय बदललों आहें. मी अधिक चिंतनशील झालों असून समतोल, शांत व समाधानी झालों आहे. पूर्वीसारखा मी चटकन् चिडत नाहीं अगर प्रक्षुब्ध होत नाहीं. मनाची खळबळ वाढू देत नाहीं, शक्य तितकें मन शांत व अलिप्त ठेवण्याचा प्रयत्न करतों. हा कदाचित् वयाचा परिणाम असेल. मी पूर्वीइतका क्षणिक विचलित होत नाहीं. कदाचित् जीवनांत अनेक धक्के-चपेटे बसल्यामुळें मी असा बदललों असेन.

* * *

" शरीरप्रकृतीच्या बाबतींत मी एकंदरीनें सुखी व सुदैवी आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. कॉंग्रेसच्या लागोपाठ कार्यक्रमांमुळें माझ्यावर अनेक वेळां इतका ताण पडत असे कीं, कधीं एकदां विश्रांति घेतों असें मला होई. तथापि त्यायोगें माझ्या प्रकृतीवर कधींही अनिष्ट परिणाम झाला नाहीं. याचें कारण मला वाटतें एकच आहे. मला आनुवंशिक शरीरसंपत्तीची जी उत्कृष्ट देणगी मिळाली तीमुळें मी एवढा निरोगी राहिलों अशी माझी समजूत आहे. आणि तितकीच ही गोष्टही खरी आहे कीं, आपलें शरीर सुस्थितींत रहावें म्हणून मी नेहमीं काळजी घेत असतों. आजारीपणाचा व दुर्बलतेचा मला जितका तिटकारा आहे तितकाच वातुळ व गलेलठ्ठ शरीराचा आहे. म्हणून व्यायाम, साधा व सात्त्विक आहार, मोकळी हवा व

मनःशांति हे आरोग्याचे नियम मी कसोशीनें पाळतों. आहाराच्या बाबतींत माझ्या विशेषशा आवडी निवडी नाहींत. फक्त जडान्नापासून आणि अतिरेकापासून मी अगदीं अलिप्त आहें...मी सूर्यस्नानाचा फार मोठा भोक्ता आहे. १९३२ सालीं तुरुंगांत असतांना कांहीं दिवस माझी प्रकृति बिघडली होती. कित्येक दिवस तापहि येत होता. पण माझ्या नेहमींच्या उपायानें माझी प्रकृति हळूहळू सुधारली. विशेषतः थंडीच्या दिवसांत सकाळच्या प्रहरीं मी खूप वेळ उन्हांत बसत असें. त्याचा मला खूप फायदा झाला.... व्यायामाच्या सर्व प्रकारांत शीर्षासन हा माझा सर्वांत आवडता व्यायाम आहे. नियमित शीर्षासनामुळें माझें शरीर सुस्थितींत राहिलें आहे असें मला वाटतें. माझ्या आतांपर्यंतच्या आयुष्यांत मन विचलित करणारे अनेक प्रसंग माझ्यावर आले आहेत, पण शरीराप्रमाणें माझें मनहि खंबीर असल्यामुळें कोणत्याही प्रसंगाचा माझ्यावर परिणाम झाला नाहीं. झोपेबद्दल माझी कधींही तक्रार नाहीं. डोकें दुखणें म्हणजे काय तें अद्याप मला ठाऊक नाहीं. एक सांगण्यासारखी आश्चर्याची गोष्ट म्हणजे मी सबंध दिवस इतकें लिहितों वाचतों तरी माझे डोळे चांगले आहेत!" (१९३५)

* * *

## राष्ट्रपति की जय!

प. जवाहरलाल नेहरू लखनौ व फैजपूर कॉंग्रेसचे दोन वेळां लागोपाठ अध्यक्ष झाले होते व रामगड कॉंग्रेससाठीं पुन्हां तिसऱ्यांदां त्यांचें नांव सुचविण्यांत आलें होतें. नेहरूंना अर्थातच ही सूचना पसंत नव्हती व त्यांचें म्हणणें कोणी ऐकावयास तयार नव्हतें; म्हणून जवाहरलाल नेहरू यांना अध्यक्ष म्हणून कां निवडूं नये हें जनतेपुढें स्पष्टपणें मांडण्यासाठीं जवाहरलाल यांनीं 'चाणक्य' या टोपण नांवानें एक लेख कलकत्त्याच्या 'मॉडर्न रिव्ह्यू' या

मासिकांत प्रसिद्ध केला. या लेखाचें नांव ‘ राष्ट्रपति ’ असें होतें. हा लेख पं. नेहरूंच्या व्यक्तित्वावर झगझगीत प्रकाश पाडणारा असल्यामुळें स्वतःच्या शब्दांत पंडितजी कसे दिसतात हें पाहण्यासारखें आहे. या लेखांतील महत्त्वाचा भाग पुढें दिला आहे :

“ गेलीं दोन वर्षें ते कॉंग्रेसचे अध्यक्ष आहेत व कांहींचा असा समज आहे कीं ते कॉंग्रेस वर्किंग कमिटी सांगेल तसे ऐकणारे सांगकामे आहेत व कमिटीच्या सभासदांचा त्यांच्यावर दाब आहे. पण हळूहळू जनतेंत त्यांनीं आपलें वजन वाढवीत आणलें आहे. सर्व प्रकारच्या लोकांत, गटांत, पक्षांत ते हिंडतात. मग तो शेतकरी असो, जमीनदार असो, भांडवलवाला असो, ब्राह्मण असो, अस्पृश्य असो किंवा मुसलमान असो. या सर्वांकडे जाऊन ते अशा प्रकारची भाषा बोलतात कीं त्या सर्वांचें चित्त आपल्याकडे आकृष्ट व्हावें. त्यांची उत्साहशक्ति त्यांच्या वयाच्या मानानें आश्चर्यकारक आहे. त्यांनीं देशाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत अनेक वेळां प्रवास केला आहे आणि प्रत्येक ठिकाणीं जनतेकडून त्यांचें प्रचंड उत्साहानें स्वागत होत आलें आहे. हिंदुस्थानच्या उत्तर टोकापासून कन्याकुमारीपर्यंत विजयी सीझरप्रमाणें ते मिरवले गेले आहेत. हें सर्व क्षणिक आहे कीं यापेक्षां त्यांत निराळा अर्थ आहे, याचा कांहींच उलगडा होत नाहीं.

“ जनतेनें डोक्यावर घेऊन नाचविलेलीं जवाहरलालसारखीं माणसें कितीही कर्तबगार व हुषार असलीं तरी लोकशाहीच्या युगांत तीं बेभरंवशाचीं असतात. जवाहरलाल हे स्वतःला लोकशाहीवादी व समाजवादी म्हणवतात, आणि ते तसे आहेतही; पण त्यांच्या भावना आणि विकार अनावर असल्या-मुळें त्यांच्या आहारीं ते जाणें अगदीं सहज शक्य आहे. जरा थोडा बिघाड झाला कीं, जवाहरलाल एकदम विचलित होतात व अशा प्रक्षोभाच्या परिस्थितींत त्यांना सर्वाधिकारी होणें मुळींच अशक्य नाहीं. समाजवाद व

लोकशाही यांचीं तत्त्वें तोंडानें उच्चारीत असतांही सर्वाधिकारशाहीचीं मुळें त्यांच्या मनांत घर करून आहेत.

" पण कांहीं झालें तरी जवाहरलाल हे मतानें किंवा मनानें फॅसिस्ट नाहींत, त्याहून किती तरी ते दूर आहेत. त्यांचा चेहराच तसा सांगतो आहे. ते कधींहि फॅसिस्ट होऊं शकणार नाहींत. तथापि सर्वाधिकाऱ्याचीं सर्व उपांगें त्यांच्याजवळ आहेत. अफाट लोकप्रियता, जबर इच्छाशक्ति, जनतेला आकर्षून घेण्याचें सामर्थ्य, निश्चित ध्येयप्रणाली, प्रचंड उत्साहशक्ति, संघटना-कौशल्य, अहंकार, कर्तृत्व, सहनशक्तीचा अभाव, दुर्बल व नालायक यांच्या-बद्दल तिरस्कार इत्यादि गुणावगुणांमुळें त्यांच्या अंगीं सर्वाधिकारत्वाचीं बीजें नाहींत असें कोण म्हणेल ? त्यांचे विकार पुष्कळदां अनावर होतात, पण मोठ्या कष्टानेंच त्यांचें नियंत्रण करण्यांत येतें. लोकशाहीच्या मंद गतीनें चालणाऱ्या कारभारांत झटपट व उत्कृष्ट कामें होऊं शकत नाहींत, हें त्यांना सहन होत नाहीं. शांततेच्या काळांत देशाचा कारभार ते उत्कृष्टपणें हाकूं शकतील, पण सध्यांच्या क्रांतीच्या काळांत ते सर्वाधिकारी सीझर होण्याचाच संभव अधिक आहे. आणि सीझर ही पदवी जवाहरलाल यांना मोठी आवडेल, नाहीं ?

" यांतच जवाहरलाल यांच्याप्रमाणें हिंदुस्थानालाही धोका आहे. जवाहर-लाल सीझर होण्यानें देशाचें कल्याण तर होणार नाहींच, उलट त्याच्या स्वातंत्र्यप्राप्तींत मात्र नाना तऱ्हेचे अडथळे येतील.

" गेलीं कांहीं वर्षें जवाहरलाल हे लागोपाठ कॉंग्रेसचे अध्यक्ष आहेत आणि या स्थानीं त्यांनीं आपली योग्यता इतकी प्रस्थापित केली आहे कीं त्यांनीं तिसऱ्यांदा अध्यक्ष व्हावें असें कांहीं जणांना वाटतें. पण ही फार मोठी चूक होईल. त्यायोगें जवाहरलाल यांना भलताच भाव चढेल व त्यांच्याशिवाय जणूं दुसरा माणूसच नाहीं अशी सर्वसामान्य जनतेची कल्पना होईल. आणि

एकाच माणसानें सदैव उच्चाधिकारपदावर राहणें हें सर्वाधिकाऱ्याचेंच लक्षण नव्हे काय? शिवाय, यायोगें आपण जवाहरलाल यांचा अहंकार व दुर-भिमान वाढविण्यास मदत केल्यासारखें होईल. आणि मग त्यांना असें वाटूं लागेल कीं हिंदुस्थानचा बिकट प्रश्न सोडविण्याचें सामर्थ्य माझ्या एकट्या-च्याच अंगीं आहे व मीच आतां कॉंग्रेसचा सर्वसत्ताधारी आहे. ही आपत्ति येऊं नये म्हणून जवाहरलाल यांना तिसऱ्या खेपेस कॉंग्रेसचें अध्यक्षपद देऊं नये.

" याशिवाय आणखी एक वैयक्तिक कारण आहे. जवाहरलाल कितीही उत्साही व कार्यक्षम दिसले तरी अलीकडे त्यांच्यांतला पूर्वीचा जोम व तरतरी कमी झालेली आहे. ते श्रमल्यासारखे झाले आहेत आणि पुन्हां जर त्यांना अध्यक्ष म्हणून निवडलें तर उत्तरोत्तर ते प्रकृतीनें अधिकच खालाव-तील. त्यांना स्वस्थता किंवा विश्रांति अशी कधीं ठाऊकच नाहीं. जो वाघावर स्वार झाला आहे त्याला खालीं उतरतांच येत नाहीं. पण त्यांचा शारीरिक व मानसिक अधःपात टाळण्यासाठीं आपण अशा मोठ्या जबाब-दारींतून त्यांना मुक्त केलें पाहिजे. तसेंच आपण त्यांची फार स्तुति करून त्यांना लाडावून ठेवतां कामा नये. त्यांच्याकडून भविष्यकाळीं पुष्कळ काम-गिरी व्हावी अशी अपेक्षा करण्याचा आपला हक्क आहे. जवाहरलाल कितीहि अहंकारी व आत्मनिष्ठ असले तरी आपण त्यांच्यावर योग्य तें नियंत्रण ठेवलें पाहिजे, म्हणजे ते ताळ्यावर येतील. "

• • •

# पंत प्रधानांचा एक दिवस : : ८

स्वतंत्र हिंदुस्थानचे पहिले मुख्य प्रधान पं. जवाहरलाल नेहरू हे जागतिक कीर्तीचे मुत्सद्दी, राजनीतिनिपुण व परराष्ट्रीय राजकारणाचे अध्वर्यु असले तरी खाजगी जीवनांत ते कसे दिसतात, कसे वागतात, कसे राहतात व कसे बोलतात यासंबंधीं कोणालाही जिज्ञासा असणें स्वाभाविक आहे. आंजपर्यंत पं. नेहरू काँग्रेसचे पुढारी होते, हजारों लोकांसमोर व्याख्यानें देत होते व देशासाठीं तुरुंगांत जात होते, पण ते आतां राज्यकर्ते झाले आहेत. काँग्रेसचे पुढारी असतांना ज्या भावनेनें ते देशाची सेवा करीत असत त्याच सेवेच्या भावनेनें त्यांनीं हिंदी राष्ट्राचीं अधिकारसूत्रें हातीं घेतलीं आहेत. पं. नेहरू आहेत तसेच आहेत, पण त्यांचें स्थान बदललें आहे. स्वातंत्र्याच्या चळवळीच्या वेळीं जनतेंत त्यांना जसें आदरणीय स्थान होतें तसें जनतेच्या वतीनेंच ते आतां उच्च अधिकारपद भूषवीत आहेत. एका महान् राष्ट्राचे कर्णधार या नात्यानें राजकीय भूमिकेवरून त्यांच्या यशापयशाची मीमांसा करणें निराळें व हिंदी जनतेचे आवडते पुढारी या नात्यानें त्यांच्याकडे पाहणें निराळें. या दोन अगदीं अलग भूमिका आहेत. पंडित नेहरूंचें राजकीय जीवन जितकें विविध घटनांनीं परिपूर्ण आहे तितकेंच त्यांचें वैयक्तिक

जीवनही आकर्षक आहे. पंडितजी जेव्हां प्रथम पंतप्रधान झाले त्यावेळीं जनता त्यांच्याकडे किती कौतुकानें, आदरानें व कुतूहलानें पाहत होती, हें पाहण्यासारखें आहे. दिल्लीच्या एका वृत्तपत्रप्रतिनिधीनें पं. नेहरूंच्या दैनंदिन जीवनाचें जें वर्णन केलें आहे तें वाचकांची जिज्ञासा तृप्त करील अशी आशा आहे.

प्रारंभीं पं. नेहरू नव्या दिल्लींत १७, यॉर्क रोड या बंगल्यांत राहत होते. नंतर सरसेनापतींचें निवासस्थान त्यांच्यासाठीं मोकळें करण्यांत आलें. अर्थात् पंतप्रधानांच्या इतमामाला साजेल असाच हा इमला आहे. त्यांचें घर म्हणजे लोकांच्या प्रेमादराचा विषय आहे. पं. नेहरू आपल्या पॅकार्ड क्लिपर गाडींतून सेक्रेटरीएटकडे जातांना केव्हां तरी दिसतील या आशेनें शेंकडों लोक त्यांच्या बंगल्याच्या आजूबाजूला व रस्त्यावर त्यांची वाट पहात असतात. या लोकांनीं पंडितजींना अनेक वेळां पाहिलें असेल, पण हिंदुस्थान सरकारचे पंतप्रधान या नात्यानें ते कसे दिसतात हें पाहण्यांत लोकांना विशेष कांहीं वाटत असलें पाहिजे यांत शंका नाहीं. आणि कां वाटूं नये? ते मोठे देशभक्त असले, अनेक वेळां तुरुंगांत जाऊन आले असले तरी राज्यकारभार चालवावयाला ते कितपत योग्य आहेत? ते अतिशय उतावळ्या स्वभावाचे, क्षुल्लक गोष्टीवरून एकदम गरम होणारे, क्षणार्धांत प्रक्षुब्ध होणारे, स्वतःच्या व्यक्तित्वांतच दंग होणारे आत्मनिष्ठ आहेत, अशी आज-पर्यंत त्यांच्याबद्दल पुष्कळांची समजूत होती. पण आतां पंतप्रधान झाल्यावर त्यांच्या स्वभावांत कितपत बदल झाला आहे, ते अधिक गंभीर झाले आहेत काय, त्यांच्या अंगीं मनमिळाऊपणा व दुसऱ्यांशीं जुळतें घेण्याची वृत्ति आली आहे काय, वगैरे प्रश्नांचीं उत्तरें जाणून घेण्याची पुष्कळांना उत्कंठा असेल.

अलाहाबादच्या त्यांच्या आनंदभवनाच्या मानानें हा दिल्लीचा यॉर्क रोडवरील बंगला कितीतरी क्षुद्र व लहान होता. तो भपकेदारही नव्हता अगर प्रचंडही नव्हता. खालच्या मजल्यावर पांचसहा खोल्या, दिवाणखाना, जेवणघर वगैरे असून वरच्या मजल्यावर निजावयाच्या खोल्या, ग्रंथालय व उघडी गच्ची होती. आतांचें निवासस्थान त्याहून कितीतरी भव्य, प्रचंड व विस्तृत आहे. कल्याणी सेन या लेखिकेनें पंतप्रधानांच्या दैनंदिन जीवनक्रमाचें पुढें जें वर्णन केलें आहे तें आजचें नाहीं. पंतप्रधानाचीं सूत्रें त्यांनीं जेव्हां प्रथम हातीं घेतलीं त्यावेळचें आहे, हें वाचकांनीं लक्षांत ठेवावें.

" पंतप्रधान झाल्यावर पंडितजी रात्रंदिवस आपल्या कामांत निमग्न असतात. किती काम करावें व किती करूं नये याची जणूं ते कधीं फिकीरच करीत नाहींत. सध्यां ते साठीच्या आसपास असले तरी त्यांचा उत्साह दुर्दम्य आहे. त्यांची झटपट काम करण्याची हातोटी व पद्धति तरुणांना लाजविणारी आहे. मंत्रिमंडळांत त्यांच्याइतकी कार्यक्षमता कोणाच्या अंगीं असेल असें वाटत नाहीं.

त्यांच्या दररोजच्या कामांत त्यांचे चिटणीस व मदतनीस म्हणून शिवदत्त उपाध्याय, एम्. ओ. मथाई व द्वारकानाथ कचरू हे तिघे जण सदैव त्यांच्या आसपास असतात. उपाध्याय हे कै. पंडित मोतीलाल नेहरूंचे खाजगी चिटणीस होते व आज पं. जवाहरलाल यांचा सर्व हिंदी पत्रव्यवहार तेच पहातात. त्यांना पं नेहरूंच्या घरांतले दिवाणजी म्हटलें असतां चालेल. मथाई यांच्याकडे पंडितजींचा इतर सर्व पत्रव्यवहार व बाकीचें कामकाज असतें. कचरू हे हिंदी संस्थान प्रजापरिषदेचे चिटणीस होते, पण पंडितजींनीं स्वतःचे खाजगी चिटणीस म्हणून त्यांची नेमणूक केली आहे. पं. नेहरूंनीं आपल्याबरोबर आनंदभवनांतला एक जुना नोकर आणला आहे. त्याचें नांव हरिलाल. तो अस्पृश्य असून वयाच्या ९ व्या वर्षीं पं. मोतीलाल यांच्याकडे आला. १९३७ सालीं संयुक्त प्रांत कायदेमंडळांत कॉंग्रेसच्या तिकिटावर

तो निवडूनही आला होता. हा माजी एम्. एल्. ए. पंडित नेहरूंचा कित्येक वर्षांचा इमानी नोकर आहे.

पंडितजींचा रोजचा कार्यक्रम पाहिला तर त्यांत एका क्षणाचीहि त्यांना उसंत नाहीं असें दिसून येईल. सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत ते निरनिराळ्या व्यवसायांत निमग्न असतात. आणि हे व्यवसाय इतके विविध व भरगच्च असतात कीं, रात्रीच्या वेळीं शांतपणें वाचन करावयाला त्यांना मनःस्वास्थ्य कसें सापडतें याचें आश्चर्य वाटतें. खूप रात्रीपर्यंत ते नुसतेंच वाचन करीत असतात असें नाहीं तर सरकारी फायली घेऊन काम करीत असतात. झटकन काम उरकण्याची त्यांची हातोटी वाखाणण्यासारखी आहे. रात्रीं जागरण करीत असल्यामुळें ते सकाळीं उशीरा उठतात. उठल्याबरोबर प्रथम कांहीं योगासनें, विशेषतः शीर्षासन करतात, आणि मगच त्यांचा रोजचा कार्यक्रम सुरू होतो. स्नान, चहा–फराळ उरकून साडे नऊ वाजतां ते कचेरीकडे जावयास निघतात व दीड वाजतां दुपारच्या जेवणाच्या वेळीं ते परत येतात. पण त्यावेळींही त्यांना स्वस्थता नसते. ते घाईघाईनें जेवतात व लगेच निघून जातात ! संध्याकाळीं साडेसहा सात वाजेपर्यंत त्यांचें काम चालू असतें. मंत्रिमंडळाची बैठक असली तर घरीं जाण्याला त्यांना याहूनही उशीर होतो. रात्रींच्या जेवणाच्या वेळीं ते दिवसभर काम करून थकून आलेले असल्यामुळें जेवणाकडे त्यांचें विशेषसें लक्ष नसतें. एकंदरीनें जेवणांत त्यांचें फारसें मन नाहीं. त्यांच्या विशेष आवडीनिवडी नाहींत. ते सामान्यतः शाकाहारी आहेत, पण मांसाहाराबद्दल त्यांना अरुचि नाहीं. त्यांची एकुलती एक कन्या सौ. इंदिरा गांधी सध्या त्यांच्याकडेच असते व गव्हर्नर जनरल राजाजी यांच्या नामगिरी या कन्येप्रमाणेंच आपल्या वडिलांच्या खाण्यापिण्याची आपुलकीनें काळजी घेते. पंडितजींच्या गृहिणीहीन घरांत इंदिरा हीच जणूं काय घरांतली मालकीण आहे. आणि त्याच दृष्टीनें पं. नेहरूंचें घर ती संभाळते. इतकेंच नव्हे तर पंडितजींच्या

जेवणाखाण्याकडे ती मातेच्या ममतेनें लक्ष देते व त्यांना आग्रहपूर्वक वाढते. त्यांच्याकडे येणाऱ्या पाहुण्यांची बडदास्त राखण्याचेंही काम तिनें आपल्याकडे घेतलें आहे. पंडितजींचे जामात फिरोज गांधी जाऊन येऊन असतात. ते सध्यां लखनौला 'नॅशनल हेरल्ड' या वृत्तपत्रांत काम करीत असतात. ते घटनासमितीचे सभासदही आहेत.

पंडितजींना विश्रांतीच्या वेळीं वाचनाशिवाय दुसऱ्या कशाचाही षोक नाहीं. त्यांना घोडयावर बसण्याची, बॅडमिंटन खेळण्याची व पोहोण्याची मनापासून आवड आहे. पण त्यांच्या दररोजच्या जीवनांत या गोष्टींना स्थान नाहीं. कधीं काळीं संधि मिळाली व सवड सांपडली तर थोडासा फेरफटका केल्याशिवाय ते राहणार नाहींत. त्याचप्रमाणें पाण्यांत चार हात मारल्याशिवाय त्यांचें समाधानही होणार नाहीं. ते कित्येक वर्षांत सिनेमाला गेले नाहींत. हिंदी संगीत, भारतीय नृत्य व चित्रकला या गोष्टी त्यांच्या विशेष आवडत्या दिसतात. सिनेमा-नाटक ही त्यांची विश्रांति नाहीं. क्वचित् एकाद्या वेळीं ते सिगारेट ओढतील; पण त्याशिवाय त्यांच्या जीवनांत व राहणींत चैन अशी कांहीं आढळणार नाहीं. मात्र प्रत्येक जेवणाच्या वेळीं त्यांचे कोणी ना कोणी मित्र त्यांच्याबरोबर असावयाचे हें ठरलेलेंच आहे. त्यांच्याशीं मनमोकळेपणानें गप्पा मारणें व पांच वर्षांचा छोटा नातू राजीव याच्याबरोबर खेळणें हे त्यांचे रिकामपणाच्या वेळांतले दोन आवडते व्यवसाय आहेत. सेक्रेटरीएटमध्यें जाण्यापूर्वी राजीवच्या पाठीवर थाप मारून त्याच्याशीं गंमतीचे चार दोन शब्द बोलल्याखेरीज त्यांचें पाऊल उचलत नाहीं. राजीव आपल्या आजोबांना 'नाना' म्हणतो; त्यालाहि आपल्या नानांची फार ओढ आहे. रात्रीं जेवण झाल्यावर इंदिरेबरोबर ते प्रेमळपणानें घरगुती विषयांवर हंसत खेळत गप्पा मारतात. हा मनोविनोदनाचा कार्यक्रम झाल्यावर ते माडीवरच्या आंतल्या खोलींत जातात व कामाला लागतात. एकदां कामाला लागले म्हणजे मध्यरात्र होईपर्यंत ते क्षणाचीही विश्रांति घेत नाहींत."

पं. नेहरू स्वभावानें गंभीर व वृत्तीनें खेळाडू आहेत. गांधीजींप्रमाणेंच मुलांबरोबर खेळणें त्यांना फार प्रिय आहे. परवां दिल्लीच्या नभोवाणी-केंद्रावर ‘ मेरा बचपन ’ या विषयावर त्यांचा एक छोटासा कार्यक्रम झाला होता. त्यावेळीं ते मुलांच्या घोळक्यांत बसले होते व त्यांना उद्देशूनच आपल्या बाळपणाच्या आठवणी सांगत होते. त्यांना जर मुलांचा सहवास मिळाला नाहीं तर त्यांच्या आयुष्यांतला निम्मा आनंद कमी होईल. इतरही अनेक विषयांत त्यांचें मन रमतें, पण त्यांना सवड होत नाहीं. त्यांना जर मुबलक रिकामा वेळ मिळाला—आणि गेल्या कित्येक वर्षांत त्यांना असा वेळ कधींच मिळाला नाहीं—असें गृहीत धरलें तर त्या वेळांत ते काय करतील ! त्यांना वाचनाची खूप आवड असल्यामुळें ते एकान्तांत जाऊन वाचीत बसतील किंवा खूप लांब लांब डोंगरावर फिरावयाला जातील. पोहोण्याची संधि ते सोडणार नाहींत. अथांग पाण्यांत मनमुराद पोहणें त्यांना मनापासून आवडतें. बागकामाचीही त्यांना हौस आहे. अहमदनगरच्या किल्ल्यांत स्थानबद्ध असतां वाचनाबरोबर त्यांनीं आपला निम्मा वेळ बागेंत काम करण्यांत घालविला. ग्रंथलेखन करावें असेंही त्यांना वाटतें, पण निवांत, शांत वेळ मिळत नाहीं. त्यामुळें त्यांचें महत्त्वाचें सर्व ग्रंथलेखन तुरुंगाच्या कोठडींतच झालेलें आढळून येतें.

आपल्या जीवनांत विशेष क्षोभाचे किंवा खळबळीचे प्रसंग आले नाहींत असें पंडितजी म्हणतात. पण ज्याच्या हातीं हिंदी राष्ट्राचें भवितव्य आहे त्याचें आयुष्य प्रक्षोभक व रोमांचकारक नाहीं असें कोण म्हणेल ?

ग्रंथ संग्रहालय
क्र. १८०२३
ता. ७/११/८३

## व्यक्ति आणि वाङ्मय : : १

पं. जवाहरलाल नेहरूंचा पिंड ग्रंथकाराचा नाहीं. राजकारण हें त्यांच्या रक्तांत जन्मजात भिनलेलें आहे. त्याचप्रमाणें आपलें जीवन गतिमान कसें होईल, त्यांत सदैव तेजस्विता, जिवंतपणा व चैतन्य कसें उत्पन्न करतां येईल याबद्दल त्यांची एकसारखी धडपड चाललेली दिसून येते. त्यांना कृतिशून्यतेची चीड आहे. एक क्षणभरही कार्य न करतां घालविणें त्यांना मुळींच आवडत नाहीं. ते असे प्रत्यक्ष कृतीचे भोक्ते व कार्यकर्ते असल्यामुळें आध्यात्मिक चिंतनांत गढलेले असे ते कधींच दिसणार नाहींत. त्याचप्रमाणें ते अत्यानंदांत रममाण होऊनही बसणार नाहींत. त्यामुळें म. गांधींप्रमाणें त्यांच्याजवळ कांहीं तत्त्वज्ञान आहे असें कोणी म्हणणार नाहीं. तुरुंगवासांत त्यांना एकांतवासी व्हावें लागलें तरी त्यांनीं कधीं तत्त्वचिंतनांत आपला वेळ घालवला नाहीं अगर जगाच्या भवितव्याविषयींच्या स्वप्नरंजनांतही ते रमले नाहींत. तुरुंगांत त्यांनीं बाग केली, झाडें लावलीं अगर इतर कामांत लक्ष घातलें, त्याप्रमाणेंच ग्रंथलेखनही केलें.

केवळ फुरसतीचा वेळ घालवण्यासाठीं पं. नेहरू ग्रंथकार झाले असें म्हटल्यास त्यांत यत्किंचितही अतिशयोक्ति होणार नाहीं. त्यांनीं पहिल्या

तुरुंगवासांत ' जगाच्या इतिहासाचें ओझरतें दर्शन ' घडविलें. १९३६ सालीं ' आत्मचरित्रा 'कडे ते वळले आणि १९४२ च्या दीर्घ तुरुंगवासाच्या काळांत ' हिंदुस्थानचा शोध ' करण्यांत त्यांनीं कांहीं महिने घालविले. पं. नेहरूंच्या खातीं फक्त हे तीनच ग्रंथ नाहींत. त्याच्या लेखांचे तीन चार संग्रह निघाले आहेत. नेहरूंचीं भाषणेंही पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालीं आहेत. तसेंच म. गांधींसंबंधीं त्यांनीं आतांपर्यंत जें लिहिलें व जीं भाषणें केलीं त्या सर्वांचें सारसंकलन करणारें पुस्तक नुकतेंच अमेरिकेंत निघालें आहे. पं. नेहरूंचा ' इंडिपेंडंट ' व ' नॅशनल हेरल्ड ' या दोन वृत्तपत्रांशीं पहिल्यापासून निकट संबंध असल्यामुळें त्या पत्रांत त्यांनीं अनेक वेळां अनेक प्रासंगिक लेख लिहिले. त्या वृत्तपत्रीय लेखांपैकीं कांहींना त्यांच्या लेखसंग्रहांत स्थान मिळालें आहे. पण या प्रासंगिक व तात्पुरत्या स्वरूपाच्या लेखांशिवाय, तुरुंगाच्या बाहेर असतांना पंडितजींनीं ग्रंथलेखन केलें नाहीं. जें थोडेंसें केलें तें पत्ररूपानें केलें. पं. नेहरूंची कन्या इंदिरा ही लहानपणीं त्यांना एकसारखे प्रश्न विचारून भंडावून सोडीत असे. ती १९२८ च्या उन्हाळ्यांत आपल्या आईबरोबर मसुरीला गेली असतां पं. नेहरूंनीं तिला उद्देशून जीं ३१ पत्रें लिहिलीं तीं ' पित्याचीं कन्यकेस पत्रें ' या नांवानें प्रसिद्ध झालीं आहेत. या पत्रांतून जगाच्या उत्पत्तीचा अगदीं स्थूल व संक्षिप्त इतिहास अतिशय सोप्या व मनोरंजक भाषेंत सांगण्यांत आला आहे. इंदिरेचें वय त्यावेळीं १० वर्षांचें होतें व तिला समजेल अशा पद्धतीनें पं. नेहरूंनीं हा अवघड विषय अगदीं सुलभ केला आहे. बालवाङ्मयांत हें पुस्तक मौल्यवान ठरेल.

पं. जवाहरलाल नेहरू हे लेखनाच्या हौसेसाठीं अगर पैसे मिळविण्यासाठीं लेखन करीत नाहींत. ते वृत्तपत्रलेखक असले तरी त्यांचें लेखन वरच्या दर्जाचें आहे. अगदीं अपरिहार्य असेल किंवा आतां लिहिल्यावांचून गत्यंतर नाहीं अशा वेळीं जेव्हां ते लिहितात, त्यावेळीं त्यांच्या लिहिण्यांत एक प्रकारचा जोम, त्वेष किंवा क्षोभ असतो. स्पेनवर लिहिलेले किंवा

चीन, झेकोस्लोव्हाकिया यांच्यासंबंधींचे त्यांचे लेख या दृष्टीनें पाहण्यासारखे आहेत. ‘ चाणक्य ’ या नांवानें १९३६ सालीं ‘ मॉडर्न रिव्ह्यू ’ मासिकांत त्यांनीं स्वतःसंबंधीं लिहिलेला लेख जसा जळजळीत आहे त्याप्रमाणें आत्मपरीक्षणात्मकहि आहे.

केवळ मनोविनोदनासाठीं पं. नेहरूंनीं आपलें आत्मचरित्र लिहिलें नाहीं तर आपल्याला आत्मनिरीक्षण करतां यावें व भविष्यकाळीं हें आत्मदर्शन मार्गदर्शक व्हावें म्हणून त्यांनीं हिंदी राजकीय इतिहासाच्या दृष्टीनें आपल्या चरित्रांतील महत्त्वाच्या घटना लिहून काढल्या.

* * *

जवाहरलाल हे व्यक्तिसमूहवादी पुढारी आहेत. हजारो, लाखों लोकांच्या सभेंत त्यांचें खरेंखुरें व्यक्तिमत्त्व प्रगट होतें. गर्दीत, समूहांत किंवा जनतेंत ते मनापासून रममाण होतात. ते संपूर्णपणें लोकशाहीचे पुरस्कर्ते आहेत. व्यक्तीपेक्षां तत्त्वाला ते अधिक महत्त्व देतात. त्यांना सर्वाधिकारित्वाचा तिरस्कार वाटतो. त्याच त्याच लोकांच्या हातीं सत्ताधिकार राहावा हें त्यांना मुळींच मान्य नाहीं. दर वेळीं नवे लोक पुढें यावेत असें त्यांचें नेहमीं म्हणणें असतें.

जवाहरलाल यांचें व्यक्तिमत्त्व कितीही रम्य, आकर्षक व आरस्पानी असलें तरी त्यांच्या व्यक्तिसमूहवादी स्वभावधर्मामुळें त्यांना जिव्हाळ्याचा असा कोणी मित्र नाहीं. ते जनतेंत जितके मिसळतात तितकेच ते जनतेपासून अलिप्त आहेत. कारण स्वतःच्या उच्च संस्कृतीचा व श्रेष्ठत्वाचा त्यांना यथार्थ अभिमान आहे. सर्वसामान्य जनतेचा उत्कर्ष व्हावा, तिच्या राहणीचें मान वाढावें, अशी त्यांची समाजवादी विचारसरणी आहे.

लाहोर कॉंग्रेसच्या अध्यक्षपदावरून त्यांनीं समाजवादी लोकराज्याची घोषणा केली आणि लखनौ कॉंग्रेसच्या वेळीं त्यांनीं पुन्हा समाजवादावरचा

आपला विश्वास जोरदारपणें प्रगट केला. कॉँग्रेसमध्यें समाजवाद आणण्याचा व कॉँग्रेसला नवीन वळण लावण्याचा त्यांनीं १९२७ पासून प्रयत्न केला. त्या वर्षी मद्रासच्या अधिवेशनांत त्यांनीं आगामी युद्धाच्या संकटाबद्दल इषारा दिला व हिंदुस्थानापलीकडील आंतरराष्ट्रीय जगांत काय चाललें आहे याची कॉँग्रेसच्या प्रतिनिधींना जाणीव करून दिली. त्यानंतर १९३१ सालीं कराची कॉँग्रेसमध्यें गाजलेला मूलभूत हक्कासंबंधीचा ठराव त्यांनींच मांडला होता. कॉँग्रेसच्या राजकारणांत परराष्ट्रीय खातें उघडण्याचें श्रेय जवाहरलाल यांनाच आहे. तसेंच नॅशनल प्लॅनिंग कमिटी स्थापन करून राष्ट्रीय नियोजन केलें पाहिजे ही कल्पना त्यांनीं दहा वर्षांपूर्वींच राष्ट्रापुढें मांडली होती व तिच्या कार्याला सुरुवातहि केली होती. पं. नेहरूंच्या कार्याचें व स्वभावाचें पृथक्करण करतांना त्यांच्या मनोरचनेंत समाजवादाचा स्थायीभाव आहे हें विसरून चालणार नाहीं. संस्थानी राजकारण असो, ट्रेड युनियन कॉँग्रेसची चळवळ असो, अगर नागरिक-स्वातंत्र्याच्या हक्काचा प्रश्न असो, त्यांचा समाजवादी दृष्टिकोण प्रामुख्यानें अनुभवास येत असे. तथापि कॉँग्रेसनें बहुमतानें ठरविलेल्या कार्यक्रमाशीं ते अत्यंत एकनिष्ठ राहिले. १९३७ सालीं कॉँग्रेसनें मंत्रिमंडळें स्वीकारण्याच्या ते विरुद्ध होते, पण बहुमताचा निर्णय त्यांनीं शिरोधार्य मानला. तीच गोष्ट महात्मा गांधींची. त्यांचा गांधीजींशीं कित्येक बाबतींत मतभेद असे, पण म. गांधींवर त्यांची अव्यभिचारी, अलोट निष्ठा होती.

मन:पूर्वकता, निष्ठा व सौंदर्यदृष्टि हे त्यांच्या स्वभावाचे कांहीं विशेष म्हणून सांगतां येतील. त्यांच्या स्वभावांत अनेक प्रकारची विसंगति सकृद्दर्शनीं आढळते. एका प्रसिद्ध लेखकानें त्यांच्या स्वभावाचें जें थोडक्यांत वर्णन केलें आहे तें मोठें उद्बोधक आहे. तो म्हणतो, " पं. नेहरूंच्या व्यक्तित्वाकडे स्वतंत्र दृष्टीनें पाहूं लागलों तर एक कधींही न सुटणारें कोडें डोळ्यांसमोर तरंगूं लागतें. अति अस्थिर, अतिशय स्थिर, अति उत्साही, अत्यंत

उदार, अति आसक्त, अत्यंत अनासक्त, अति अधीर, अतिशय धीर, अति समाजाभिमुख, अतिशय एकाकी, अति नास्तिक, अत्यंत आस्तिक—अशा परस्परविरोधी वृत्ति–प्रवृत्ति–निवृत्ति यांचें एक आकर्षक साकल्य म्हणजे पंडित नेहरू. त्यांना कोणत्याही एका विद्यमान विचारप्रणालीचे पुरस्कर्ते मानतां येत नाहीं. ते समाजवादी आहेत आणि साम्यवादी नाहींत. ते गांधीवादी आहेत आणि गांधीवादी नाहींत, ते लोकशाहीवादी आहेत आणि लोकशाही-वादी नाहींत; पं. नेहरू म्हणजे एक अखंड द्वंद्व आहे. ”

पं. नेहरूंचें जीवन अनेकरंगी असल्यामुळें व त्याला अनेक कक्षा, कानेकोपरे असल्यामुळें त्यांच्या स्वभावाविषयीं पुष्कळांच्या मनांत असा संदेह निर्माण होतो. वास्तविक पाहतां त्यांचें व्यक्तित्व पारदर्शक आहे. त्यांत कोणत्याही प्रकारचें गूढ किंवा रहस्य नाहीं. आणि त्यांचें हें व्यक्तिमत्त्व हजारों लोकांच्या सभेंत जितक्या प्रभावानें उठून दिसतें तितक्याच प्रकर्षानें तें त्यांच्या वाङ्मयांत प्रतिबिंबित झालें आहे. जवाहरलाल हे नुसते मुत्सद्दी नसून तळमळीचे देशभक्त, विशाल अंतःकरणाचे मानवतावादी व आधुनिक भारतीय संस्कृतीचे आदर्श आहेत. तसेंच त्यांची दृष्टी अत्यंत दूर क्षितिजा-पर्यंत पोंचणारी आहे, आणि पौर्वात्य व पाश्चिमात्य यांचा मधुर संगम त्यांच्या ठिकाणीं दृष्टीस पडतो. या गोष्टी पं. नेहरूंच्या वाङ्मयाच्या द्वारां जगाला प्रतीत होतात. पं. नेहरूंचें जीवितकार्य एका दृष्टीनें तात्कालिक आहे; पण त्यांचें वाङ्मय अमर आहे. या वाङ्मयाच्या योगेंच जगाला पं. नेहरूंच्या आकर्षक व विशाल व्यक्तिमत्त्वाची ओळख पटलेली आहे. म. गांधी व पं. नेहरू यांच्या दृष्टिकोनांत व मनश्चर्येत तफावत असली तरी नेहरू हेच गांधीजींचे वारस आहेत, हें नेहरूंच्या वाङ्मयावरून कोणालाही पटल्याशिवाय राहत नाहीं. पं. नेहरूंची उच्च दर्जाची देशभक्ति, उदात्त मानवता, प्रांजलपणा, ध्येयनिष्ठा व आंतरराष्ट्रीय दृष्टी यांपैकीं प्रत्येक गुण-

विशेषाचें यथार्थ दर्शन त्यांच्या वाङ्मयांत होतें. पं. नेहरू श्रेष्ठ असले तरी त्यांचें वाङ्मय त्यांच्याहून श्रेष्ठ आहे.

पं. जवाहरलाल नेहरूंचा तुरुंगांत लिहिलेला पहिला प्रचंड ग्रंथ म्हणजे 'जगाचा ओझरता इतिहास' हा होय. या ग्रंथाची सुरुवात २६ ऑक्टोबर १९३० रोजीं नैनीच्या तुरुंगांत झाली व तो ९ ऑगस्ट १९३३ रोजीं संपला. पं. नेहरूंनीं आपली कन्या इंदिरा ऊर्फ प्रियदर्शिनी इच्या १३ व्या वाढदिवसानिमित्त तिला पहिलें पत्र लिहिलें आणि अशा १९६ पत्रांतून त्यांनीं तिला जगाच्या इतिहासाची अगदीं धावती रूपरेखा सांगितली आहे. सुमारें ९५० पृष्ठांच्या या ग्रंथांत मानवजातीच्या उत्पत्तीपासून जगांतल्या राष्ट्रांच्या विकासाचा आजतागायत इतिहास ग्रथित झालेला आहे. ग्रंथाच्या प्रस्तावनेंत खुद्द पं. नेहरूंनीं म्हटल्याप्रमाणें हा कांहीं इतिहास नाहीं, तर इतिहासांतील कांहीं क्षणचित्रें आहेत. यांत नेहरूंच्या मतांचेंही पुष्कळदां आविष्करण झालेलें आढळतें. इतिहासाच्या अभ्यासकापेक्षां राजकारणाच्या अभ्यासकाला हें पुस्तक अधिक उपयुक्त ठरल्यावांचून राहणार नाहीं. या ग्रंथाची पहिली आवृत्ति १९३४ मध्यें प्रसिद्ध झाली. त्यानंतर लागोपाठ त्याच्या तीन आवृत्त्या निघाल्या.

जानेवारी १९३४ ते सप्टेंबर १९३५ या अवधींत सरकारी पाहुणचाराचा आस्वाद घेत असतां वेळ घालविण्यासाठीं म्हणून पं. जवाहरलाल नेहरू यांनीं आपलें आत्मचरित्र लिहून काढलें. हें आत्मचरित्र लिहिण्यांत त्यांचे आणखी दोन हेतु होते. आपल्या आतांपर्यंतच्या आयुष्यक्रमाचें निर्विकार दृष्टीनें सिंहावलोकन करतां यावें या उद्दिष्टानें त्यांनीं आत्मचरित्रास प्रारंभ केला व त्याप्रमाणेंच तें बहुतांशीं आत्मलक्षी झालेलें आहे. पं. नेहरूंच्या या आत्मचरित्रास 'आत्मदर्शन' हें नांव दिल्यास तें अधिक उचित होईल. या चरित्रांत पंडितजींच्या वैयक्तिक सुखदुःखांबरोबर व आकांक्षा-भावनांबरोबर कॉंग्रेसच्या इतिहासांतील अनेक संस्मरणीय व रमणीय रेखाचित्रें रेखाट-

ण्यांत आलीं आहेत. हिंदी राष्ट्राला नवी दृष्टी देण्याच्या दृष्टीनें म. गांधींच्या ‘ सत्याच्या प्रयोगां ’प्रमाणेंच पंडितजींची ही आत्मकथा अत्यंत बहुमोल आहे यांत शंका नाहीं. उत्कृष्ट भाषा, निर्भय व सडेतोड विचार, स्पष्टोक्ति-पूर्ण मतें, आत्मीयता, आकर्षक मांडणी इत्यादि अनेक गुणविशेषांमुळें हा ग्रंथ गांधीजींच्या आत्मचरित्राइतकाच सुरस झाला आहे. वाचकांना आपल्या विश्वासांत घेऊन त्यांच्याशीं मनमोकळेपणानें विश्रब्धालाप करण्याची विद्या गांधीजींप्रमाणें पंडितजींनाही अवगत आहे असें या पुस्तकावरून दिसून येईल. पुस्तक प्रसिद्ध होतें न होतें तोंच त्याची पहिली आवृत्ति खलास झाली व लागोपाठ पांच आवृत्त्या निघाल्या. या लोकप्रियतेच्या मुळाशीं पं. जवाहर-लाल नेहरू यांचें नांव तर आहेच, पण त्याशिवाय पुस्तकाचीही अपूर्वता आहे.

जवाहरलाल नेहरूंचा तिसरा ग्रंथ ‘ भारताचा शोध ’; हा त्यांच्या आत्म-चरित्राची अगर जगाच्या इतिहासाची पुरवणी ठरण्यासारखा आहे. त्यांत हिंदुस्थानचा प्राचीन इतिहास आहे, आत्मचरित्र आहे व अलीकडच्या हिंदी राजकारणाचा व परिस्थितीचा आढावाही आहे. ९ ऑगस्ट १९४२ ते २५ जून १९४५ पर्यंत पं. नेहरूंच्या नवव्या तुरुंगवासाच्या अवधींत त्यांनीं ‘ भारताचा शोध ’ हा ग्रंथ लिहिला. तुरुंगवासाच्या पहिल्या २० महिन्यांत त्यांनीं कांहींच लेखन केलें नाहीं. फक्त बागकाम केलें अगर वाचन केलें. पुढें पुढें कांहीं तरी लिहावें असें त्यांना वाटूं लागलें व आत्मचरित्राचा पुढचा भाग लिहितां लिहितां अनेक वेळां, पायाखालीं तुडविलेला आपला देश त्यांना नजरेसमोर दिसूं लागला व त्याच्या पूर्वेतिहासाकडे ते वळले. “ मी वर्तमानकाळाविषयीं लिहूं शकत नव्हतों, म्हणून भूतकाळाविषयीं लिहिण्याचा विचार केला... मी कांहीं तत्त्ववेत्ता नाहीं म्हणून भविष्यकाळाविषयीं काय लिहावें किंवा जगाला काय संदेश द्यावा ? भूतकाळासंबंधीं लिहावयाचें तर मी कांहीं इतिहासकार नाहीं. वर्तमानकाळाशीं संलग्न असलेल्या भूतकाळांत मी रममाण होत होतों आणि तेंच लिहूं लागलों.” अशा शब्दांत पंडितजींनीं आपल्या या नव्या ग्रंथाचें

प्रयोजन व स्वरूप सांगितलें आहे. अहमदनगरच्या किल्ल्यांत स्थानबद्ध असतांना १३ एप्रिल १९४४ रोजीं त्यांनीं हें पुस्तक लिहावयाला प्रारंभ केला व तें अवघ्या पांच महिन्यांत पुरें केलें. कॉंग्रेसच्या व निवडणुकांच्या निमित्तानें पं. नेहरूंनीं हिंदुस्थानभर जो अनेक वेळां प्रवास केला, त्यांना ज्या हजारों–लाखों लोकांसमोर बोलण्याचा प्रसंग आला त्यामुळें आपल्या हिंदुस्थानाबद्दल त्यांना जिज्ञासा वाटूं लागली व त्या जिज्ञासेच्या पोटींच त्यांना आपल्या देशाचा अगदीं नव्यानें शोध लागला. म्हणून त्यांनीं आपल्या ग्रंथाला ‘ भारताचा शोध ’ असें अर्थपूर्ण पण एक दृष्टीनें चमत्कृतिजनक असें नांव दिलें आहे. या ग्रंथाचे दहा विभाग असून एकूण ११७ प्रकरणें आहेत. हिंदी राष्ट्राच्या लढ्याचा अलीकडील इतिहास या पुस्तकांत पहावयास सांपडतो. नेहरू-वाङ्मयाचा प्रकर्ष या ग्रंथांत जणूं काय कळसाला पोंचलेला आहे. कलापूर्ण मांडणीप्रमाणेंच त्यांचें इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व वाखाणण्यासारखें आहे. पं. नेहरूंचें वाङ्मय इतकें समृद्ध व संपन्न आहे कीं त्याचा मुळांतूनच आस्वाद घेतला पाहिजे.

तथापि त्यांच्या विचारांचे नमुने म्हणून त्यांच्या वाङ्मयांतील कांहीं उतारे पुढें उद्धृत केले आहेत:—

[ १ ] “ कलकत्ता ठराव कायम असेल तर स्वातंत्र्य हें आपलें एकच ध्येय आहे. स्वातंत्र्य हा शब्द आजच्या जगांत मोठासा चांगला नाहीं. कारण त्याचा अर्थ निराळेपणा, एकटेपणा असा होतो. संकुचित राष्ट्रीयत्वाचा भारतानें पुष्कळ अनुभव घेतला आहे व तो सहकार्याची व परस्परावलंबनाची वाट चांचपडत आहे. आपण ‘ स्वातंत्र्य ’ शब्द वापरला म्हणून विशाल ध्येयाचे विरोधी होत नाहीं. ‘ स्वातंत्र्य ’ याचा आपला अर्थ ‘ ब्रिटिश सत्तेच्या व ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या वर्चस्वापासून मुक्तता ’ एवढाच आहे. आपण स्वतंत्र झाल्यावर जागतिक सहकार्याचे व संघटनेचे अवश्य प्रयत्न करूं आणि आपण मोठ्या गटांतील समान सभासद या नात्यानें

आपलें स्वातंत्र्य थोडें कमी करण्यासही तयार होऊं...स्वातंत्र्याकरितां करावी लागणारी कोणतीही चळवळ ही बहुजनसमाजाचीच असली पाहिजे व अशा चळवळी शांततामयच असल्या पाहिजेत....

...मला हें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे कीं मी सोशॅलिस्ट व लोकशाहीवादी आहे तसेंच राजेमहाराजे किंवा उद्योगपति यांच्यासंबंधीं माझें अनुकूल मत नाहीं. आजच्या हिंदी राष्ट्रीय सभेची जी घटना आहे तिच्यावरून ती संपूर्णपणें समाजवादी कार्यक्रमाचा अंगीकार करील असें मला वाटत नाहीं. पण आपण हें ध्यानांत घेतलें पाहिजे कीं समाजवादाचें तत्त्वज्ञान हळूहळू जगभर पसरत आहे, इतकेंच नव्हें तर समाजसंस्थेच्या अंतरंगांत तें क्रमशः भिनत आहे. फक्त त्याची गति व प्रगति किती आहे याची आपणांस कल्पना नाहीं. हिंदुस्थानाला जर आपलें दारिद्र्य व विषमता नष्ट करावयाची इच्छा असेल तर त्याला याच मार्गानें जावें लागेल. आपला देश मुक्त करण्यासाठीं आपण आतां ' उघडा कट ' किंवा उघड उघड बंड सुरू केलें आहे, तेव्हां सर्व हिंदी स्त्री-पुरुषांनीं यांत सामील व्हावें, असें त्यांना आवाहन करण्यांत येत आहे. "

( अध्यक्षीय भाषण; लाहोर काँग्रेसः १९२९ )

[ २ ] " मी पूर्वीं अनेकवार म्हटल्याप्रमाणें आज मला पुन्हां जोरदारपणें सांगावयाचें आहे कीं जागतिक घटना, घडामोडी, संघर्ष व सुख-दुःखें यांच्याशीं आपण एकरूप झालें पाहिजे, आत्मीयत्वानें व सहानुभूतीनें त्यांच्याकडे पाहिलें पाहिजे, तरच जगांत चाललेल्या विविध व परस्परविरोधी घटनांचा व संघर्षांचा आपल्याला अर्थ कळेल. युरोपांत आणि पूर्वेकडील देशांत आज सर्वत्र दंगल व लढे सुरू आहेत. पॅलेस्टाइनमध्यें ब्रिटिश साम्राज्यशाहीशीं अरबांचा जो लढा चालू आहे तो हिंदी स्वातंत्र्याच्या लढ्याप्रमाणें जागतिक संघर्षाचाच एक भाग आहे. लोकशाही आणि हुकुमशाही, राष्ट्रीयत्व आणि साम्राज्यवाद, समाजवाद आणि भांडवलशाही यांच्यामधील द्वंद्व नुसतें

वैचारिक स्वरूपाचें राहिलेलें नाहीं, तर त्याचें पर्यवसान बॉम्ब आणि बंदुका यामध्यें होत आहे...

संपूर्ण लोकशाही हें कॉंग्रेसचें ध्येय आहे व लोकशाही स्वरूपाच्या प्रजासत्ताक राज्यासाठीं तिनें प्रयत्न करणें अपरिहार्य आहे. माझी अशी इच्छा आहे कीं कॉंग्रेस ही समाजवादी संघटना व्हावी व नवें जग निर्माण करण्यासाठीं ज्या जागतिक संस्था प्रयत्न करीत आहेत, त्या संस्थांनीं सहकार्य करावें. पण सध्यांच्या कॉंग्रेसमधील बहुसंख्य वर्ग इतक्या पल्ल्यापर्यंत जावयास तयार होणार नाहीं, याची मला पूर्ण जाणीव आहे.

ब्रिटिश साम्राज्यशाहीचा नाश हा हिंदुस्थानांत उघड दिसत आहे. तें सरकार आपला आर्थिक प्रश्न सोडवूं शकण्याच्या व भयंकर दारिद्र्य दूर करण्याच्या वृत्तीचें नाहीं. अत्यंत क्रूरपणाची दडपशाही करावी व नागरिक आणि वैयक्तिक स्वातंत्र्य हेंही अमान्य करून आपला राज्यकारभार चालवावा अशी सरकारची वृत्ति आहे....कॉंग्रेस ही सतत शांततेचा पुरस्कार करून व परिणामकारक मार्ग अवलंबून आपल्याकडे तरुणवर्ग खेचीत आहे. या देशांतला अत्याचार हा मागेंच थांबला असता; पण सरकार आपल्या धोरणानें या अत्याचाराच्या मुळ्यांना पाणी घालून त्या असहाय्यतेची अत्याचारी वृत्ति वाढवीत आहे. दडपशाही असो वा नसो, पण सरकार मिदनापूर येथें किंवा बंगालमधील अन्य ठिकाणीं ज्या पद्धतीचा अवलंब करीत आहे ती निषेधार्ह आहे."

( अध्यक्षीय भाषण; लखनौ कॉंग्रेसः १९३६ )

[ ३ ] " हिंदुस्थानचे आणि जगाचे प्रश्न सोडाविण्याची गुरुकिल्ली समाजवादांतच आहे, अशी माझी पक्की खात्री झाली आहे. आणि ज्यावेळीं मी हा शब्द वापरतों त्यावेळीं तो पोकळ भूतदयावादी दृष्टीनें वापरत नसून शास्त्रीय, आर्थिक दृष्टीनें मला अभिप्रेत असतो. सोशॅलिझम् ऊर्फ समाजवाद हें नुसतें एक अर्थशास्त्रीय तत्त्व नाहीं तर त्याहून जास्त आहे; तें जीवनाचें तत्त्वज्ञान

आहे आणि त्याच दृष्टीनें मी त्याच्याकडे आकृष्ट झालों आहें. हिंदुस्थानांतील लोकांचें भयंकर दारिद्र्य, बेकारी, दुर्दशा व गुलामगिरी यांचा नायनाट समाजवादाशिवाय दुसऱ्या कशानेंही होणार नाहीं हें मला स्पष्ट दिसत आहे.

यावरून समाजवाद हें माझ्या दृष्टीनें नुसतें आर्थिक तत्त्व नसून जें मी आपल्या मनाशीं व हृदयाशीं कवटाळून धरलें आहे असें माझें प्राणभूत ध्येयवाक्य आहे. परकीयांची सत्ता मला सहन होत नाहीं म्हणून मी हिंदी स्वातंत्र्यासाठीं धडपड करतों. शिवाय त्यांत माझा दुसरा असा हेतु आहे. आर्थिक व सामाजिक क्रांति घडवून आणण्यासाठीं असा लढा सुरू आहे. सोशॅलिझमसाठीं मी लढत नाहीं. कॉंग्रेस ही साम्राज्यविरोधी असून देशाच्या राजकीय व आर्थिक घटनेंत क्रांति घडवून आणण्यासाठीं कॉंग्रेसची खटपट चालू आहे. देशांत चाललेल्या घडामोडींचें पर्यवसान समाजवादांत होईल अशी मला आशा आहे. आणि हिंदी राष्ट्राच्या सर्व दुर्दशेवर व दुःस्थितीवर समाजवाद हाच एकमेव उपाय आहे असें मला स्पष्ट दिसतें.

मी पुन्हां आपल्याला स्मरण देऊं इच्छितों कीं, आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचा तसाच सामाजिक स्वातंत्र्याचा प्रश्न हा एक जगांतील मोठ्या प्रश्नाचा भाग आहे....गेल्या आठ महिन्यांत आंतरराष्ट्रीय परिस्थितींत भयंकर उलथापालथ झाली आहे आणि निर्वाणीचा समय जवळ झाला आहे. प्रगति व परागति हीं जणूं काय एकमेकांवर आदळत आहेत व आपण प्रचंड गतीनें युद्धाच्या खाईकडे चाललों आहों. युरोपमध्यें फॅसिझमची यशस्वी दौड चालली आहे. ती कर्कश आवाजानें अधिकाधिक गर्जना करीत आहे व आंतरराष्ट्रीय राजकारणांत उघड उघड बदमाषगिरीचा शिरकाव करीत आहे. ही फॅसिस्ट प्रवृत्ति द्वेष, अत्याचार व युद्धपिपासा यांवर उभारलेली असून तिला वेळींच जर अटकाव केला नाहीं तर ती युद्धाकडे जगाला खेंचल्यावांचून राहणार नाहीं. ॲबिसीनियाचा त्यांत बळी पडला आणि आपण स्पेनमधील भयंकर प्रकार व त्याचा दुर्दैवी अंत पहात आहों.

ब्रिटिशांचें परराष्ट्रीय धोरणच या अनर्थाला कारणीभूत आहे. ह्या धोरणांत जरी बाह्यतः बदल झाला व मधून मधून त्यांत धरसोड दिसून आली तरी तें धोरण नाझी जर्मनीचा पुरस्कारच करणारें आहे....कॉंग्रेसची तात्काळ मागणी घटना परिषदेची आहे. तिच्यांतून लोकशाही राज्य स्थापन व्हावें व सर्व सत्ता आम जनतेच्या हातीं जावी. याचा स्वाभाविक परिणाम म्हणजे हिंदुस्थान व्यापून बसलेलें परकें सैन्य काढून घेतलें जाणें हाच आहे."

(अध्यक्षीय भाषण; फैजपूर कॉंग्रेसः १९३६)

[४] "या ठरावांत फक्त मूलभूत तत्त्वें ग्रथित केलीं आहेत आणि मला असा विश्वास वाटतो कीं कोणालाहि त्यांत वादग्रस्त असें कांहीं आढळणार नाहीं. आपल्याला स्वतंत्र व सार्वभौम लोकराज्य पाहिजे असा आपला दृढनिश्चय आपण बोलून दाखवीत आहों. हिंदुस्थान हा सार्वभौम असला पाहिजे, तो स्वतंत्र असला पाहिजे आणि तो लोकसत्ताक असला पाहिजे....कांहींचा या ठरावाला असा आक्षेप येण्याचा संभव आहे कीं त्यांत 'सोशॅलिस्ट स्टेट' (समाजवादी राष्ट्र) असे शब्द नाहींत. मी स्वतः सोशॅलिझमूचा पुरस्कर्ता आहें आणि मला वाटतें, हिंदी राष्ट्रालाहि समाजवाद मान्य होईल, इतकेंच नव्हें तर सबंध जगालाहि याच मार्गानें जावें लागेल असा मला विश्वास वाटतो. कांहींची अशी शंका आहे कीं, लोकराज्य या शब्दानें संस्थानिक बिचकण्याचा संभव आहे. आणि तें खरेंहि आहे. पण माझ्यापुरतें मला हें स्पष्ट करून सांगितलें पाहिजे कीं, राजेशाहीला मी मानीत नाहीं. माझें मत कसेंहि असलें तरी हिंदी संस्थानांबद्दल आपला सर्वांचा असा दृष्टिकोन आहे कीं, जें स्वातंत्र्य येऊं घातलें आहे त्या स्वातंत्र्यांत संस्थानी प्रजेला भागीदार होतां आलें पाहिजे....आपण जगाकडे मित्रत्वाच्या नात्यानें पाहिलें पाहिजे आणि जगांतील सर्व राष्ट्रांशीं मैत्री केली पाहिजे. गेलीं अनेक वर्षें इंग्लंडशीं

आपला झगडा चालू आहे; तरी देखील या देशाशीं आपण सख्य जोडलें पाहिजे. ”

( घटना-समितींत सार्वभौम लोकसत्ताक राष्ट्रासंबंधींच्या मुख्य ठरावावरील भाषण : १३-१२-४६ )

[ ५ ] “ या सभागृहाप्रमाणेंच मलाही पूर्ण जाणीव आहे कीं, हें आपलें यश अनेक प्रकारें कलंकित झालेलें आहे. तरी सुद्धां मला असें वाटतें कीं, हा क्षण आपल्या मातृभूमीसाठीं आपण चालविलेल्या संग्रामाचा यशस्वी शेवट दर्शविणारा आहे. आपलें ध्येय आपण गांठलें आहे. मात्र तें ज्या स्वरूपांत आपणांस प्राप्त व्हावयास पाहिजे होतें त्या स्वरूपांत आपल्या हातीं पडलें नाहीं. तथापि मला निश्चित असें वाटतें कीं आपण मिळविलेली गोष्ट सामान्य नाहीं...भूतकाळीं हिंदुस्थान हा एकादा बारीकसा, स्वयंकेंद्रित देश नव्हता. इतिहासकाळांत हिंदुस्थानचा केवळ दुसऱ्या देशांशींच संबंध होता असें नव्हे, तर हिंदुस्थान हा आंतरराष्ट्रीय केंद्र बनला होता. भारतीय संस्कृतीच्या मजबूत पायावरच हिंदुस्थानची शक्ति अवलंबून आहे. शिवाय हिंदुस्थानाचें सामर्थ्य त्याच्या सर्वसंग्राहक वृत्तींत आहे...आम्ही जगांतील इतर सत्ताभिलाषी राष्ट्रांप्रमाणें नाहीं. आमचा हेतु जगांत शांतता प्रस्थापित करण्याचें व शांतता प्राप्त करून देण्याचें कार्य करणें हा आहे. जगांतील सत्ताभिलाषी साम्राज्यशाही राजकारणाच्या गुंतागुंतींत आम्ही पडणार नाहीं. ”

( घटना समितीपुढील भाषण: १५–८–१९४७ )

[ ६ ] “ लष्करी दृष्ट्या हिंदुस्थान आज फारसा महत्त्वाचा नसला तरीही कसलेंच भय माझ्या मनांत नाहीं. बड्या राष्ट्रांचीं सैन्यें, त्यांचें आरमार, त्यांचे अणु बॉंब यांची मला कसलीही भीति वाटत नाहीं. माझ्या गुरूची ही शिकवण आहे. एका बड्या राष्ट्रापुढें व शक्तिमान् साम्राज्यापुढें आम्ही निःशस्त्र उभे राहिलों. आम्हांला पाठबळ मिळालें, आम्हांला सामर्थ्य लाभलें

तें आम्ही पापापुढें वांकलों नाहीं म्हणून. हीच एक शिकवण माझ्यापुढें व आपणां सर्वांपुढें आहे. आज जगापुढें जे प्रश्न आहेत त्यांच्या बाबतींत ती लागू पडेल कीं नाहीं हें मला माहीत नाहीं. ती एक गंभीर समस्या आहे. पण मला वाटतें कीं, जर आपण भीतीचें उच्चाटन केलें आणि कधीं असला धोका पत्करावयाचा असला तरीही जर आत्मविश्वास दृढ ठेवला, तर ते धोकेही पत्करावे असें वाटेल. आणि हिंसक भाषा, कृति आणि शेवटीं युद्ध या धोक्यापेक्षां वरील धोके वाईट नाहींत...अन्न व इतर जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा जगांत भासत असतांना, जगांतील अनेक भागांत लोक भुकेनें मरत असतांना, संयुक्त राष्ट्रसंघाचें सारें लक्ष राजकीय प्रश्नांतच गुंतून राहावें ही मोठी विस्मयकारक गोष्ट आहे. या संघानें कांहीं काळ तांतडीच्या राजकीय प्रश्नांच्या चर्चेतून थोडी सुट्टी घ्यावी आणि महत्त्वाच्या व गंभीर आर्थिक प्रश्नांकडे लक्ष द्यावें. जगांत अन्नाचा तुटवडा भासत असलेल्या प्रदेशांचें निरीक्षण करावें, असें मला वाटतें.''

(पॅरिस येथें भरलेल्या संयुक्त राष्ट्रसंघाच्या बैठकीपुढील भाषण : ३-११-४८.)

[ ७ ] ''राजकीय व संस्कृतिक दृष्टया राष्ट्रभाषेचा प्रश्न फार महत्त्वाचा आहे. हिंदुस्थानांत अनेक प्रांतिक भाषा आहेत व त्यांच्या विकासाकडे आपण अगत्य लक्ष पुरविलें पाहिजे. त्याच वेळीं अखिल भारतीय स्वरूपाची भाषा ही आपण तयार केली पाहिजे. अशी भाषा एकच असूं शकेल. ती म्हणजे हिंदी अगर हिंदुस्थानी; मग तिला कोणतेंही नांव द्या. राजकीय भूमिकेवरून अगर तात्कालिक भावनांच्या आहारीं जाऊन ह्या राष्ट्रभाषेच्या प्रश्नाचा निर्णय करणें घातुक ठरेल. आपल्या राष्ट्राच्या सांस्कृतिक विकासाच्या दृष्टीनें आपण या प्रश्नाकडे पाहिलें पाहिजे. भाषेंतल्या प्रत्येक शब्दाच्यामागें इतिहास असला पाहिजे व प्रत्येक शब्द अर्थवाहक असला पाहिजे; आणि विशेष

म्हणजे ह्या भाषेच्या विकासाला वाव पाहिजे. इंग्लिश भाषेप्रमाणें ही भाषा सर्वसंग्राहक, विकासक्षम व लवचिक असली पाहिजे. संस्कृत आणि पर्शियन या दोन प्राचीन भाषांचा जो अमोल ठेवा व वारसा आपल्याला लाभला आहे त्यांचा उपयोग करून सर्वांना उपयोगी पडतील असे कांहीं मौलिक शब्द निवडले तर माझ्या दृष्टीनें फार मोठें कार्य होईल. या मौलिक शब्दांची संख्या सुमारें ३००० असावी व ते सर्वांना समजतील व सर्वांना साधारणपणें माहीत असतील असेच असावेत. त्याचप्रमाणें कांहीं पारिभाषिक शब्दही निवडून काढावेत. अशा प्रकारें मूलशब्दांचे दोन कोश तयार केले तर भाषेचा प्रश्न सुटण्यास बरेंच साहाय्य होईल असें मला वाटतें."

(खास लेख : ८-३-४९)

[ ८ ] "पंतप्रधान या नात्यानें सरकारच्या सर्व कृत्यांची प्रशंसा व निंदा स्वीकारलीच पाहिजे. आपल्या हातून बऱ्याच चुका झाल्या त्याची मला जाणीव आहे. आज मी क्षमायाचनेच्या भावनेनें आपल्यापुढें बोलत आहे. देशाच्या हिताची कदर असलेल्या प्रत्येक नागरिकाला माझी अशी विनंती आहे कीं त्यानें निर्विकार मनानें सर्व परिस्थितीचा विचार करून, देशापुढील महत्त्वाचे प्रश्न सोडविण्यास मदत करावी...आज मी एका विशिष्ट गोष्टीबद्दलच बोलणार आहे. ती म्हणजे अन्न. अधिक धान्योत्पादन ही आपली आजची सर्वांत मोठी गरज आहे. यंदा देशाला १० टक्के धान्याची तूट येत आहे. धान्योत्पादनाचा अल्प मुदतीचा कार्यक्रम आणखी दोन वर्षें वाढवावा अशी माझी इच्छा आहे. सध्यां लागवडीस असलेल्या जमिनींतच उत्तम पीक काढण्याचा व दुय्यम पूरक अन्नाचें उत्पादन वाढविण्याचा हा कार्यक्रम आहे. जनतेनें तांदुळाचा उपयोग कमी करावा व अन्न वायां जाऊं न देण्याची काळजी घ्यावी. १९५१ नंतर परदेशांतून धान्य आणावयाचें नाहीं असें सरकारनें ठरविलें आहे. वाढत्या लोकसंख्येचाही आम्हीं विचार

केला आहे. अन्नोत्पादनाच्या या मोहिमेंत सर्वांनीं मनःपूर्वक सहकार्य केलें पाहिजे. अधिक धान्य पिकविण्याची प्रचंड मोहीम ही दारिद्र्य, अज्ञान व महागाई यांचा नाश करणारी असून, प्रत्येक नागरिकानें या मोहिमेंत सैनिकाप्रमाणें भाग घेतला पाहिजे व कष्ट केले पाहिजेत. ”

( दिल्लीच्या नभोवाणी केंद्रावरील भाषण: २९–६–४९ )

[ ९ ] “ कम्युनिस्टांचें धोरण हें हिंसात्मक मार्गांनीं चालणारें असून या धोरणाचा मजुरांच्या हिताशीं कांहीं संबंध नाहीं. त्या धोरणाचा सरळ अर्थ गडबड व गोंधळ माजविणें एवढाच आहे....हिंदुस्थानांतील परकीयांच्या ताब्यांतील वसाहतींबद्दल काय धोरण ठेवावयाचें त्याबद्दल जयपूर कॉंग्रेसमध्यें जी भूमिका ठरविली तिच्यांत बदल करण्याचें कांहींच कारण नाहीं. हा मुलुख हिंदुस्थानचाच एक अविभाज्य भाग असल्यानें त्यावर परकीयांचें वर्चस्व राहिलें तर तें आम्ही सहन करणार नाहीं. मात्र हें वर्चस्व जावें म्हणून आम्ही शांततेनेंच प्रयत्न करणार आहों...राष्ट्रीयीकरणापेक्षांही उत्पादनवाढ अधिक महत्त्वाची आहे. उद्योगधंदे राष्ट्रीय मालकीचे करावयाचे किंवा नाहीं यापेक्षांही हे धंदे राष्ट्राच्या मालकीचे केल्यानें उत्पादन वाढणार आहे काय हा खरा प्रश्न आहे. तात्त्विक भूमिकेवरून कांहींजण राष्ट्रीयीकरणाची ओरड करीत असतात, परंतु त्यांत व्यावहारिक अडचणी काय आहेत हें कोणी लक्षांत घेत नाहीं.

आपण धान्यवाढ करूं शकूं, अशी मला खात्री आहे. पण त्यासाठीं खूप प्रयत्न केले पाहिजेत आणि धान्यवाढीच्या या कार्यांत सर्व जनतेनें सामील होऊन सहकार्य केलें पाहिजे. धान्यवाढीची मोहीम म्हणजे दारिद्र्य व अज्ञान, कदान्न व वाढत्या किंमती याविरुद्ध पुकारलेलें युद्धच होय. ”

( नभोवाणी भाषण: ५–७–४९ )

[ १० ] " गेल्या दोन वर्षांत हिंदुस्थानानें अनेक संकटांना तोंड देऊन सर्व आघाड्यांवर प्रगति केली आहे असें मला वाटतें. सध्यांच्या अडचणीच्या परिस्थितींत सुद्धां हिंदुस्थान आपल्यापुढील प्रश्न खात्रीनें सोडवील. आज मला एका विशिष्ट विषयावर बोलावयाचें आहे. तो विषय म्हणजे मानव-जातीची प्राथमिक गरज आणि आपल्यापुढील मूलभूत प्रश्न—अन्न—हा होय.

चैनीच्या वस्तू नसल्या तरी आपलें चालेल, किंबहुना कांहीं गरजा पूर्ण झाल्या नाहींत तरी चालेल; पण अन्नावांचून आपलें चालणार नाहीं. आपण आपल्या देशांत पुरेसें अन्न पिकविलें नाहीं तर तर त्यासाठीं आपल्याला परक्या देशावर अवलंबून रहावें लागेल आणि अशा प्रकारचें परावलंबन आपल्याला परवडणार नाहीं. म्हणून परक्या देशाची धन करणारी अन्नाची तूट भरून काढण्यासाठीं सर्वांआधीं आपण हा प्रश्न हातीं घेतला पाहिजे. याचसाठीं सरकारनें १९५१ सालापर्यंत अन्नधान्यांच्या बाबतींत स्वयंपूर्ण होण्याच्या दृष्टीनें कार्यक्रम हातीं घेतला आहे. १९५१ नंतर परदेशांतून धान्य आणण्यांत येणार नाहीं. पदार्थांच्या वाढलेल्या किंमती व मजुरींतील वाढ अशा दुष्ट चक्रांत आपला देश सांपडला आहे. किंमती वाढतात म्हणून मजुरी वाढवावी लागते व मजुरी वाढविली कीं किंमती वाढतात. या दुष्ट चक्रांतून सुटण्यासाठीं उत्पादनक्षमता वाढवून उत्पादन पुरेसें करून पदार्थांच्या किंमती खालीं आणल्या पाहिजेत...आमच्या परराष्ट्रीय धोरणाबद्दल बोलावयाचें तर हिंदुस्थान कुठल्याही एका विशिष्ट गटांत जाणार नाहीं. आपलें स्वातंत्र्य-युद्ध लढतांनाही जगांतील परतंत्र राष्ट्रांना स्वातंत्र्य मिळावें, वांशिक भेदाभेदांना कोठेंही थारा असूं नये व जगांत शांतता राखावी अशीं तीन सूत्रें हिंदुस्थानानें जाहीर केलीं होतीं. याच तीन तत्त्वांवर हिंदुस्थानचें परराष्ट्रीय धोरण आंखण्यांत आलेलें आहे. पूर्वींचें सर्व विसरून पूर्व व पश्चिम यांनीं आतां नवें परस्पर सहकार्याचें नातें जोडावें अशी हिंदुस्थानची इच्छा

आहे. आतां आशिया हळूहळू जागृत होऊं लागला आहे, व यापुढें आशिया खंडाला राजकीय किंवा आर्थिक बाबतींत परकीय हस्तक्षेप सहन व्हावयाचा नाहीं."

( मुलाखत—दिल्ली, ५-८-४९ )

• • •

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. २९९५ नों. दि ...........
वि. ........ आ. वा ... क्र. ..................

१५०२३
३।११।५३

# पंडितजींचें विविध दर्शन : : १०

जगांतील निरनिराळ्या प्रमुख व्यक्तींनीं पं. जवाहरलाल नेहरूसंबंधीं वेगवेगळ्या प्रसंगीं जे उद्गार काढले आहेत ते येथें विशिष्ट दृष्टीनें संकलित करण्यांत आले आहेत. त्यांवरून निरनिराळे लोक पंडितजींकडे कशा विविध दृष्टिकोणानें पाहतात तें कळून येईल:—

" जवाहरलाल हे पक्के समाजवादी असून राष्ट्राला जेवढें झेपेल तेवढ्याचीच त्यांची मागणी आहे. आपल्या सभोंवतालच्या वातावरणाप्रमाणें आपलीं ध्येयें बदलण्याची त्यांची तयारी असते; या दृष्टीनें ते अस्सल व्यवहारी मुत्सद्दी आहेत. आपलें ध्येय साध्य करण्याचा सतत प्रयत्न करणारे ते ध्येयवादी आहेत. देशांतील तरुणांना त्यांच्याबद्दल अभिमान वाटावा व राष्ट्राला असा अत्यंत थोर सुपुत्र लाभला याबद्दल जनतेला आनंद वाटावा हें स्वाभाविक आहे.

" पं. जवाहरलाल नेहरू हे मुख्यतः देशभक्त आहेत, व पिता, बंधु ग्रंथकार, प्रवासी, आंतरराष्ट्रीयवादी इत्यादि अनेक नात्यांनीं त्यांचें चरित्र तितकेंच चमकदार आहे. तथापि आपला देश आणि आपल्या देशाचें स्वातंत्र्य यांच्यासाठीं ते आपल्या सर्वस्वाचा होम करावयाला मागें पुढें पाहणार नाहींत इतकी त्यांची राष्ट्रभक्ति जाज्वल्य आहे. दुसऱ्या देशाच्या स्वातंत्र्याचें

बलिदान देऊन त्यांच्या मोबदल्यांत आपला देश स्वतंत्र करूं पहाणें हें त्यांना कदापि रुचणार नाहीं. त्यांचें राष्ट्रीयत्व त्यांच्या आंतरराष्ट्रीयत्वाबरहुकुम आहे. ”

—म. गांधी

“ ज्या राजकारणाच्या क्षेत्रांत फसवाफसवी व बनवाबनवी चालते त्या ठिकाणीं जवाहरलाल नेहरूंनीं शुद्धतेचा पुरस्कार केला. सत्याबरोबर संकटें आलीं तरी त्यांनीं कधीं सत्याशीं प्रतारणा केली नाहीं व असत्याचा आश्रय करणें कांहीं वेळां सोईचें वाटलें तरी त्यांनीं असत्याची कांस धरली नाहीं. राजकारणांतल्या गुप्त कारवायांच्यापासून ते अगदीं अलिप्त आहेत. अशा गोष्टींचा त्यांना मनापासून तिटकारा आहे. ”

* * *

“ तरुण भारताच्या सिंहासनावर विराजमान होण्याची लायकी जवाहरलालइतकी दुसऱ्या कोणाचीच नाहीं. त्यांची भूमिका उदात्त आहे. त्यांचा निश्चय जसा अढळ आहे त्याप्रमाणें त्यांचें धैर्यही अचल आहे. त्यांची नैतिक शुद्धता व चारित्र्य यामुळें ते एवढ्या महत्पदास चढले आहेत.

जवाहरलाल हे एक प्रकारें ऋतुराज वसंतऋतुप्रमाणें सदैव तरुण, प्रसन्न, उत्साही व आल्हादकारक आहेत. ”

—रवींद्रनाथ टागोर

“ पं. नेहरूंचें इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व हा त्यांना जगाला जोडण्याचा एक महत्त्वाचा दुवा आहे. अत्यंत प्रभावशालीपणानें पण तितक्याच सहजतेनें इंग्रजी भाषा लिहिणारे जे पौर्वात्य लेखक आहेत त्यांत पंडित नेहरूंना वरचें स्थान द्यावें लागेल. त्यांचें हें आंग्लभाषाप्रभुत्व पाहून ज्यांची इंग्रजी ही मातृभाषा आहे असे इंग्रज लोकसुद्धां त्यांच्यापुढें शरण जातात, त्यांचा मोठेपणा मान्य करतात. नेहरूंचे राजकीय विचार ज्यांना पसंत पडत नाहींत

१५०२३
४।११।५३

# पंडितजींचें विविध दर्शन : : १०

जगांतील निरनिराळ्या प्रमुख व्यक्तींनीं पं. जवाहरलाल नेहरूंसंबंधीं वेगवेगळ्या प्रसंगीं जे उद्गार काढले आहेत ते येथें विशिष्ट दृष्टीनें संकलित करण्यांत आले आहेत. त्यांवरून निरनिराळे लोक पंडितजींकडे कशा विविध दृष्टिकोणानें पाहतात तें कळून येईलः—

" जवाहरलाल हे पक्के समाजवादी असून राष्ट्राला जेवढें झेपेल तेवढ्या-चीच त्यांची मागणी आहे. आपल्या सभोंवतालच्या वातावरणाप्रमाणें आपलीं ध्येयें बदलण्याची त्यांची तयारी असते; या दृष्टीनें ते अस्सल व्यवहारी मुत्सद्दी आहेत. आपलें ध्येय साध्य करण्याचा सतत प्रयत्न करणारे ते ध्येयवादी आहेत. देशांतील तरुणांना त्यांच्याबद्दल अभिमान वाटावा व राष्ट्राला असा अत्यंत थोर सुपुत्र लाभला याबद्दल जनतेला आनंद वाटावा हें स्वाभाविक आहे.

" पं. जवाहरलाल नेहरू हे मुख्यतः देशभक्त आहेत, व पिता, बंधु ग्रंथ कार, प्रवासी, आंतरराष्ट्रीयवादी इत्यादि अनेक नात्यांनीं त्यांचें चरित्र तितकेंच चमकदार आहे. तथापि आपला देश आणि आपल्या देशाचें स्वातंत्र्य यांच्यासाठीं ते आपल्या सर्वस्वाचा होम करावयाला मागें पुढें पाहणार नाहींत इतकी त्यांची राष्ट्रभक्ति जाज्वल्य आहे. दुसऱ्या देशाच्या स्वातंत्र्याचें

बलिदान देऊन त्यांच्या मोबदल्यांत आपला देश स्वतंत्र करूं पहाणें हें त्यांना कदापि रुचणार नाहीं. त्यांचें राष्ट्रीयत्व त्यांच्या आंतरराष्ट्रीयत्वाबरहुकुम आहे. ”

—म. गांधी

“ ज्या राजकारणाच्या क्षेत्रांत फसवाफसवी व बनवाबनवी चालते त्या ठिकाणीं जवाहरलाल नेहरूंनीं शुद्धतेचा पुरस्कार केला. सत्याबरोबर संकटें आलीं तरी त्यांनीं कधीं सत्याशीं प्रतारणा केली नाहीं व असत्याचा आश्रय करणें कांहीं वेळां सोईचें वाटलें तरी त्यांनीं असत्याची कांस धरली नाहीं. राजकारणांतल्या गुप्त कारवायांच्यापासून ते अगदीं अलिप्त आहेत. अशा गोष्टींचा त्यांना मनापासून तिटकारा आहे. ”

* * *

“ तरुण भारताच्या सिंहासनावर विराजमान होण्याची लायकी जवाहरलालइतकी दुसऱ्या कोणाचीच नाहीं. त्यांची भूमिका उदात्त आहे. त्यांचा निश्चय जसा अढळ आहे त्याप्रमाणें त्यांचें धैर्यही अचल आहे. त्यांची नैतिक शुद्धता व चारित्र्य यामुळें ते एवढ्या महत्पदास चढले आहेत.

जवाहरलाल हे एक प्रकारें ऋतुराज वसंतऋतुप्रमाणें सदैव तरुण, प्रसन्न, उत्साही व आल्हादकारक आहेत. ”

—रवींद्रनाथ टागोर

“ पं. नेहरूंचें इंग्रजी भाषेवरील प्रभुत्व हा त्यांना जगाला जोडण्याचा एक महत्त्वाचा दुवा आहे. अत्यंत प्रभावशालीपणानें पण तितक्याच सहजतेनें इंग्रजी भाषा लिहिणारे जे पौर्वात्य लेखक आहेत त्यांत पंडित नेहरूंना वरचें स्थान द्यावें लागेल. त्यांचें हें आंग्लभाषाप्रभुत्व पाहून ज्यांची इंग्रजी ही मातृभाषा आहे असे इंग्रज लोकसुद्धां त्यांच्यापुढें शरण जातात, त्यांचा मोठेपणा मान्य करतात. नेहरूंचे राजकीय विचार ज्यांना पसंत पडत नाहींत

ते सुद्धां नेहरूंच्या इंग्रजी भाषेचा गुणानुवाद गाण्यास तयार होतात. जोंपर्यंत इंग्लिश भाषा जगांत अस्तित्वांत आहे तोंपर्यंत इंग्लिश वाङ्मयाच्या क्षितिजावर पं. नेहरू हा तेजस्वी तारा सतत चमकत राहील, यांत शंका नाहीं."

—मादाम चिआंग-कै-शेक

" जवाहरलाल नेहरूंचें एकदम डोळ्यांत भरण्याजोगें वैशिष्ट्य म्हणजे त्यांची कलाभिरुचि. त्यांच्या लेखनांतून किंवा राजकीय व्याख्यानांतून त्यांच्या कलेचा प्रत्यय आल्यावांचून राहत नाहीं. नेहरू हे जर राजकीय पुढारी झाले नसते तर नामांकित कवि किंवा प्रथितयश कलावंत म्हणून त्यांनीं नांव मिळविलें असतें. तरल भावना, सूक्ष्म कल्पकता, सौहार्द व आत्मौपम्यबुद्धि, हीं कलावंताचीं सर्व लक्षणें त्यांच्या ठायीं आहेत. म्हणून दु:खी मानवजातीविषयीं ते अत्यंत जिह्वाळ्यानें बोलूं शकतात व पोटतिडिकीनें लिहूं शकतात. त्यांचें हृदय जसें सहानुभूतीनें ओथंबलेलें आहे त्याप्रमाणें सौंदर्यबुद्धि त्यांच्या नसानसांतून वाहत आहे. ते सृष्टिसौंदर्याचे भोक्ते आहेत हें सांगण्याची जरूरी नाहीं. पण राजकारणांतसुद्धां त्यांची कलात्मक सौंदर्य-दृष्टी लोपलेली नाहीं हें विशेष पाहण्यासारखें आहे. आणि त्यांतच त्यांच्या थोरपणाचें रहस्य आहे."

—प्रा. हुमायून कबीर

" जवाहरलाल म्हणजे एक कोडें आहे. अनुयायी नसलेल्यांचे ते पुढारी आहेत. ते गांधीजींचे ऐकतात म्हणून कांहीं जणांना आनंद वाटतो तर ते गांधीजींच्या विरुद्ध जातात म्हणून कांहीं जण त्यांची स्तुति करतात. दुसऱ्यांच्या मागें जाणारे ते पुढारी आहेत. आंतरराष्ट्रीय दृष्टीचे ते राष्ट्रवादी आहेत; तसेंच ते भावनाशील पण बुद्धिवादी आहेत. जनतेला नेहरूंच्याबद्दल आदर न वाटतां प्रेम वाटतें. त्यांच्यामागें पक्ष किंवा अनुयायी नाहींत. एका

दृष्टीनें ते अगदीं एकाकी आहेत. पण त्यांचें व्यक्तित्व व चारित्र्य इतकें प्रभावशाली आहे कीं सबंध जग त्यांच्याकडे आकर्षिलें जातें. गांधींप्रमाणें त्यांच्याभोंवतीं धार्मिकतेचें किंवा नीतीचें प्रकाशवलय नाहीं, तथापि त्यांचें व्यक्तिमत्त्व इतकें प्रखर आहे कीं त्यापुढें त्यांना कशाचीच जरूरी नाहीं."

—के. आर. कृपलानी

" महात्माजींनीं ' आपला राजकीय वारस जवाहर आहे ' असें अनेकवार सांगितलें होतें. त्यांचे ते उद्गार किती सार्थ होते याचा प्रत्यय आज येत आहे. त्यांची निवड अत्यंत योग्य ठरली आहे. गांधीजींचीं तत्त्वें आज पं. नेहरूच आचरणांत आणीत आहेत व जगाच्या राजकारणांत त्यांनीं हिंदी राष्ट्राला मानाचें स्थान मिळवून दिलें आहे."

—सरदार पटेल ( १४-११-४८ )

" राजकीय जीवनाच्या प्रारंभापासून वडील व गांधीजी यांचा जबरदस्त पाठिंबा पं. नेहरूंना मिळाला. अर्थात् नेहरूंनीं आपल्या उदात्त गुणांमुळें मिळालेला पाठिंबा योग्यच होता असें दाखवून दिलें. पण पुढारीपण सहज लाभल्यामुळें त्यांच्या राजकीय अनुभवांत मोठी उणीव राहिली व त्याचा परिणाम म्हणजे राजकीय आणि सामाजिक बाबतींत त्यांनीं अनेक प्रसंगीं विशिष्ट दृष्टिकोन स्वीकारला. नेहरू विशिष्ट मर्यादेपर्यंत उदार आहेत. त्यांचें व्यक्तिमत्त्व रम्य व हृदयंगम आहे. ते अतिशय सुसंस्कृत असून त्यांच्या ठिकाणीं चोखंदळपणा आहे. त्यांना काव्याची आवड आहे आणि ते मोठे साहित्तिक आहेत. त्यांना राजकीय देखाव्याची किंवा हिकमतीची आवड नाहीं. ते मनापासून ध्येयवादी आहेत. गेलीं चोवीस वर्षें त्यांची लोकप्रियता सतत टिकून आहे. पं. नेहरू उतावीळ आणि भावनाशील आहेत.

पं. नेहरू हा एकाकी तारा आहे. कॉंग्रेसमधील पक्ष किंवा गटबाजीचें राजकारण यापासून ते स्वतःला नेहमींच अलिप्त राखण्याचा प्रयत्न करीत आले आहेत. आपल्याभोंवतीं अनुयायांचा घोळका जमणें त्यांना मुळींच आवडत नाहीं. आपल्या दर्जाला तें कमीपणा आणणारें आहे असें त्यांना वाटतें. त्यांना एकाकीच काम करणें आवडतें. "

—डॉ. बाळकृष्ण केसकर

" तसें पाहिलें तर भावाविषयीं लिहिणें सोपें नाहीं. आणि त्यांतल्या त्यांत जो भाऊ स्वतःचा आदर्श म्हणून पुढें आहे अशाविषयीं लिहिणें तर फार कठीण. जवाहरलालसारखी व्यक्ति विरळा आहे. आधुनिक युगांत निर्माण झालेल्या अत्यंत थोर व्यक्तींपैकीं जवाहरलाल एक आहे. जवाहरलाल जगांतील सर्व दलितांचा कैवारी आहे. जवाहरलाल लोकशाही तत्त्वांचा कट्टा पुरस्कर्ता आहे. जवाहरलालचें धैर्य असामान्य आहे. त्याचें स्फटिकासारखें शुद्ध अंतःकरण लखलखणाऱ्या पोलादी तलवारीची आठवण करून देतें. जवाहरलाल ध्येयवादी व ध्येयाशीं एकनिष्ठ आहे. आणीबाणीच्या काळांत जवाहरलाल अत्युच्च तेजानें तळपतो. तो एक दुर्दमनीय योद्धा आहे...पण या सर्वांपेक्षांही महत्त्वाची गोष्ट म्हणजे तो प्रेमळ आहे व याचकरितां त्याला बरोबर ओळखणारे त्याच्यावर प्रेम करतात. विशेषतः कौटुंबिक वातावरणांत त्याचें व्यक्तिमत्त्व विशेष खुलतें. आजारी माणसाची शुश्रुषा करतांना जवाहरलालच्या चेहऱ्यावरील भाव पाहण्यासारखे असतात. जवाहरचें खरें व्यक्तिमत्त्व येथेंच प्रगट होतें. जवाहरलालची श्रद्धा आम्हांस सतत स्फूर्ति देतेच पण त्याबरोबरच आमचा निश्चय अढळ राहण्यास मदत करते. "

—श्री. विजयालक्ष्मी पंडित

" थोरला भाऊ या नात्यानें-जवाहर आदर्श आहे. आम्हां दोघी बहिणीं-पेक्षां तो वयानें बराच मोठा असला तरी त्यानें आमच्यावर कधींच हुकमत

किंवा दादागिरी गाजविली नाहीं. त्यानें आपलीं मतें आमच्यावर कधींच लादलीं नाहींत. वडील गेल्यानंतर त्यांच्या जागीं आम्हांला तोच आहे या भावनेनें आम्हांला फार मोठा धीर व आधार वाटतो....ज्यांना जवाहरची पूर्ण माहिती नाहीं त्यांना असें वाटतें कीं राजकारण, लेखन व वाचन या पलीकडे त्याला दुसऱ्या कोणत्याच गोष्टीची आवड नाहीं. पण हें खरें नाहीं. याशिवाय त्याला आकृष्ट करणाऱ्या आणखी किती तरी गोष्टी आहेत. त्याचें आयुष्य विविध रंगांनीं भरलेलें आहे. त्याला घोड्यावर बसून फेरफटका करण्याची फार हौस आहे व त्याला उत्तम रीतीनें घोड्यावर बसतांही येतें. पोहण्याचीही त्याला आवड आहे. तो आपण होऊन सिनेमा-नाटकाला कधीं जाणार नाहीं. पण आमच्या आग्रहाखातर गेला, आणि चित्रपट चांगला असला तर त्यांत तो रममाण झाल्याशिवाय राहणार नाहीं. पण त्याची सर्वांत आवडती करमणूक कोणती असेल तर लहान मुलें ही आहे. मुलांशीं खेळतांना तो आपलें वय विसरतो व त्यांच्याशीं एकरूप होतो. मुलांची त्याला जी आवड आहे त्यामुळें त्याच्या जीवनांत एक अपूर्व गोडवा निर्माण झाला आहे...कित्येकांना जवाहरचे दोषच तेवढे दिसतात व त्यावरच ते टीकास्त्र चालवतात. पण खरोखर त्यांना जवाहर नीट कळला नाहीं असें म्हणणें भाग पडतें. तो तुमच्याआमच्यासारखाच गुणदोषसंपन्न मानवप्राणी आहे. पण ज्या ठिकाणीं सर्वसामान्य माणसें पराभूत होतात त्या ठिकाणीं तो विजयी होतो, हें त्याच्या मोठेपणाचें रहस्य आहे. हिंदी राष्ट्र आज जवाहरलालला डोक्यावर घेऊन नाचत आहे तें केवळ त्याचे असामान्य गुण, धाडस, शौर्य व शक्ति यांच्यामुळेंच नाहीं, तर त्याच्यांत जे मानवी गुणविशेष आहेत त्यामुळें तो हिंदी राष्ट्राच्या गळ्यांतला ताईत बनला आहे...बाहेरच्या जगाला जवाहर आनंदी व हसतमुख दिसला तरी त्याला दुःखाचे अनेक कडू घोट गिळावे लागले आहेत. ज्यावेळीं त्याला प्रेमळ सहचरीच्या प्रेमाची आवश्यकता होती त्यावेळीं त्याची तरुण पत्नी

त्याला सोडून जावी हा त्याच्यावर फारच मोठा दुर्दैवाचा आघात होय. हें दुःख त्याच्या हृदयांत किती खोल जाऊन बसलें त्याची इतरांना कल्पनाही येणार नाहीं. जवाहरचें जीवन म्हणजे गुलाबपुष्पांची शेज नाहीं, तर त्याग, कष्ट आणि श्रम यांची कांटेरी शय्या आहे. ”

—सौ. कृष्णा हाथीसिंग

“ जगांत आजपर्यंत होऊन गेलेल्या थोर पुरुषांपैकीं पं. जवाहरलाल हे एक आहेत, असें इतिहासांत नमूद केलें जाईल. ज्यानें स्वतःला अगर आपल्या देशाला कमीपणा येईल असें कोणतेंही कृत्य केलें नाहीं व ज्याच्या अंगीं सर्वोच्च सचोटी व दानत आहे असा हा सच्चरित्र पुरुष आहे. ”

—लॉर्ड माउंटबॅटन

“ जवाहरलाल नेहरू उच्च खानदानी ब्राह्मण कुळांत जन्मलेले कुलदीपक होत. त्यांची शरीराकृति मोठी आकर्षक आहे. ते गौरवर्णाचे, मध्यम बांध्याचे व सडपातळ आहेत. त्यांचें वय आज पन्नाशींच्या पुढें असलें तरी रवींद्रनाथ टागोरांनीं म्हटल्याप्रमाणें ते सदैव नवजवान आहेत. त्यांचें यौवन शाश्वत आहे. ते अतिशय सूक्ष्मसंवेदी, चिकित्सक व सुसंस्कृत आहेत. त्यांची अभिरुचि उच्च दर्जाची व सुसंपन्न आहे. त्यांना अव्यवस्था, बेशिस्तपणा, गोंधळ व गबाळपणा यांची चीड आहे. शारीरिक सामर्थ्याची त्यांना फार आवड आहे. डोंगर, पर्वत, नद्या, ढग, बर्फ, झरे, धबधबे व मुलें यांचे ते भोक्ते आहेत. लहान मुलांत मिसळणें व त्यांच्या हास्यांत सामील होणें हें त्यांना आवडतें. कधीं कधीं ते एकदम विकारवश होतात, पण लागलींच शांत होतात. ते जसे तरल बुद्धीचे आहेत त्याप्रमाणें बुद्धिवादीही आहेत. ते धनाढ्य कुळांत जन्मलेले असूनही समाजवादी झाले आहेत. त्यांनीं राष्ट्रासाठीं आपल्या सर्वस्वाचा त्याग केला आहे. त्यांनीं मनांत आणलें असतें तर त्यांना

आरामशीर गाद्या-गिरद्यांवर लोळून आयुष्याचा मनमुराद उपभोग घेतां आला असता, पण तसें न करतां त्यांनीं तुरुंगांत कष्टांत व हालअपेष्टांत दिवस काढणें अधिक पसंत केलें. ”

—डॉ. अनुपसिंग ( कॅनडा )

● ● ●

# अमेरिकेचा शोध

परिशिष्ट : १ :

अमेरिकेचे अध्यक्ष प्रे. ट्रूमन यांच्या निमंत्रणानुसार हिंदुस्थानचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांनीं ता. ११ ऑक्टोबर रोजीं अमेरिकेच्या भूमीवर पदार्पण केलें. इंग्लंडहून त्यांना आणण्यासाठीं प्रे. ट्रूमन यांनीं ' इंडिपेन्डन्स ' नांवाचें आपलें खास विमान पाठविलें होतें. यापूर्वीं हिंदुस्थानांतून अनेक देशभक्त अमेरिकेस गेले होते पण हिंदी राष्ट्रातर्फे अधिकृत, राजकीय स्वरूपाची अशी पं. नेहरूंची ही पहिलीच भेट होय. स्वतंत्र हिंदुस्थानचे पहिले पंतप्रधान, थोर मुत्सद्दी व महात्मा गांधींचे राजकीय वारस या नात्यानें पं. नेहरूंकडे अमेरिकन जनता कुतूहलानें पहात असल्यामुळें त्यांच्या भेटीबद्दल एकंदर जनतेंत औत्सुक्य वसत होतें. याचें प्रत्यंतर त्यांनीं अमेरिकेंत पाऊल ठेवल्या-पासून त्यांना प्रत्येक क्षणीं आलें.

वॉशिंग्टनच्या विमानतळावर उतरतांच त्यांच्या स्वागतासाठीं अमेरिकेचे अध्यक्ष प्रे. ट्रूमन जातीनें हजर होते. त्याचप्रमाणें त्यांचें मंत्रिमंडळ, वरिष्ठ परराष्ट्रीय अधिकारी, अमेरिकेंतील हिंदी वकील श्रीमती विजयालक्ष्मी पंडित वगैरेंनीं या स्वागतांत भाग घेतला. पं. नेहरू विमानतळावर उतरतांच त्यांना १९ तोफांची सलामी देण्यांत आली. प्रेसिडेंट ट्रूमन यांनीं पंडितजींचें स्वागत करतांना जें भाषण केलें त्यांत पं. नेहरूंची ही सफर म्हणजे अमेरिकेचा शोध आहे असे सूचक उद्गार काढले. पं. नेहरूंच्याबरोबर त्यांची कन्या सौ. इंदिरा गांधी व हिंदी सरकारचे आर्थिक सल्लागार सर चिंतामणराव देशमुख होते. पंडित नेहरूंचें स्वागत सरकारी रीत्या अध्यक्ष ट्रूमन व परराष्ट्र-मंत्रि डीन अचेसन यांनीं केलेंच, पण त्याहीपेक्षां जनतेनें, विद्यापीठांनीं, नगरपालिकांनीं व नीग्रो लोकांनीं त्यांचें जें अगत्यपूर्वक स्वागत केलें तें अपूर्व होतें.

पं. नेहरूंनीं आपल्या २६ दिवसांच्या अमेरिकन दौऱ्यांत सुमारें १०,००० मैलांचा प्रवास केला. न्यूयॉर्कपासून सॅन्फ्रॅन्सिस्कोपर्यंत, अमेरिकेच्या पूर्व-किनाऱ्यापासून पश्चिम किनाऱ्यापर्यंत नेहरूंनीं अनेक शहरांना भेटी दिल्या. न्यूयॉर्क शहरानें त्यांना मानपत्र देऊन त्यांना नागरिकत्वाची सनद अर्पण केली. कोलंबिया विद्यापीठानें त्यांना 'डॉक्टर ऑफ लॉज्' ही बहुमानाची पदवी देऊन त्यांच्याविषयीं आपला आदरभाव व्यक्त केला. कोलंबिया विद्यापीठांत पं. नेहरूंनीं जें भाषण केलें तें जागतिक युद्ध, शांतता व हिंदी राष्ट्राचें परराष्ट्रीय धोरण या दृष्टीनें फार महत्त्वाचें ठरेल. त्यांनीं अशींच आणखीही अनेक भाषणें केलीं; त्यांत विस्कॉन्सिन विद्यापीठांतील भाषणाचा उल्लेख केला पाहिजे. याशिवाय हार्वर्ड, कॅलिफोर्निया, प्रिन्स्टन, शिकागो इत्यादि विद्यापीठांनीं त्यांचा सन्मान केला. पं. नेहरू हे नुसते मुत्सद्दी नाहींत तर ते बहुश्रुत विद्वान आहेत., त्यांच्या या पल्लवग्राही पांडित्यामुळेंच ते जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. आइन्स्टिन व तत्त्वज्ञ डॉ. ड्यूई यांना भेटून त्यांच्याशीं चर्चा करूं शकले. नेहरूंच्या सरकारी कार्यक्रमांत नीग्रोंच्या कार्यक्रमाचा समावेश नव्हता. पण त्यांच्या विनंतीवरून पंडितजी हार्लेम गेथें गेले व त्यांच्या स्वागताचा त्यांनीं स्वीकार केला.

पं. नेहरूंनीं नऊ विद्यापीठांना भेटी दिल्या व एकंदर ४० जाहीर भाषणें केलीं. न्यूयॉर्कप्रमाणें सॅन्फ्रॅन्सिस्को नगरपालिकेनें त्यांना मानपत्र देऊन नागरिकत्वाचे हक्क बहाल केले. या मानपत्रांतील पुढील वाक्यें विशेष संस्मरणीय आहेत. त्यांवरून अमेरिकन जनता नेहरूंच्याकडे कोणत्या दृष्टीनें पहात होती हें कळून येईल:—"तुमचें श्रेष्ठत्व हें भारताच्या सीमा ओलांडणारें आहे व तुम्ही जगाचे नागरिक आहां असेंही म्हणतां येईल, याची आम्हां सर्वांना जाणीव आहे; तुमच्या प्रिय महात्मा गांधींच्या शिकवणुकीचे थोर भाष्यकार म्हणून तुमचें नांव चिरंजीव होईल." या मानपत्राच्या

शेवटीं गीतेंतील एक श्लोक दिला होता. अमेरिकेप्रमाणें कॅनडाच्या पार्लमेंट-पुढें पं. नेहरूंचें भाषण झालें. अमेरिकेच्या संयुक्त कॉंग्रेसपुढें भाषण करण्याचा बहुमान शतकांतून एकाद्यालाच मिळतो. ओटावा येथें असतांना ते कॅनडाच्या गव्हर्नर जनरलचे पाहुणे होते तर अमेरिकेंत ते वॉल्डॉर्फ-ॲस्टोरिया या प्रचंड हॉटेलमध्यें उतरले होते. पंडितजींचा मुक्काम ४० व्या मजल्यावर होता व त्यांचे ९ चिटणीस १२ टेलिफोन्सवर नेहरूंच्या चाहत्यांशीं एक-सारखीं प्रश्नोत्तरें करीत. नेहरूंच्याभोंवतीं त्यांच्या चाहत्यांचा एवढा मोठा गराडा असे, कीं ते शेते, मळे किंवा धब्धबे पहावयास जावोत अगर टेनेसी व्हॅली धरणाला भेट देवोत, त्यांना एक क्षणाचीही फुरसत नसे. पं. नेहरूंनीं आपल्या मुक्कामांत अनेकदां पत्रकार परिषदा घेतल्या व चार दोन वेळां नभोवाणी कार्यक्रमांतही ते सामील झाले.

पं. नेहरूंचा हा अमेरिकेंतील दौरा एका दृष्टीनें 'राजकीय असला तरी या प्रवासांत त्यांनीं मुत्सद्देगिरीच्या कोणत्याही वाटाघाटी केल्या नाहींत अगर राजकीय चर्चाही केली नाहीं. त्यांनीं एक दोन ठिकाणीं सहजगत्या गहूं, यंत्रें व यंत्रज्ञ यांची हिंदुस्थानला जरूरी आहे असें सांगितलें, पण त्याबाबत मागणी अगर करार केले नाहींत. पंडितजींवर प्रे. ट्रूमन, परराष्ट्र-मंत्रि डीन अचेसन व अनेक विद्यापीठांचे प्रमुख यांनीं स्तुतिसुमनें उधळलीं. त्यांत थोडासा औपचारिकपणा असला तरी त्या वर्णनांत फारशी अतिश-योक्तिही नव्हती. “ पं. नेहरू हे श्रेष्ठ प्रतीचे लोकसेवक आहेत. ” हे प्रे. ट्रूमन यांचे उद्गार अवास्तव आहेत असें कोण म्हणेल ?

पं. नेहरूंच्या अमेरिकन दौऱ्याची फलश्रुति म्हणजे हिंदुस्थान व अमेरिका यांच्यांत नवीन उत्पन्न होणारी स्नेहभावना ही होय. पं. नेहरूंनीं ता. ५ नोव्हेंबर रोजीं विस्कॉन्सिन विद्यापीठांत भाषण करतांना बरोबर हीच भावना व्यक्त केली होती. ते म्हणाले : “ मी येथें जसा वैयक्तिक रीत्या आलों

आहे त्याप्रमाणें हिंदुस्थानचा मुख्य प्रधान या नात्यानेंही आलों आहें. पण त्याहीपेक्षां हिंदी राष्ट्राचें प्रतीक ही माझी मुख्य भूमिका आहे. माझे स्वतःचे गुणदोष कांहींही असोत, माझी ही भेट हिंदुस्थानच्या दृष्टीनें अलीकडच्या काळांत विशेष महत्त्वाची आहे असें मी समजतों. आजच्या जागतिक परिस्थितींत राष्ट्राराष्ट्रांचें सौहार्दीकरण अत्यंत आवश्यक आहे आणि माझी ही भेट त्याच सुहृद्भावनेची द्योतक आहे. ”


● ● ●

# पंडितजींची कुंडली

परिशिष्ट : २ :

पं. जवाहरलाल नेहरूंची जन्म तारीख इसवी सनाप्रमाणें १४ नोव्हेंबर १८८९ ही असली तरी शालिवाहन शकाप्रमाणें त्यांची जन्मातिथि कार्तिक वद्य ६ शके १८११ रोज गुरुवार ही येते. नेहरूंनीं आपला जन्मदिवस मार्गशीर्ष वद्य ७ संवत् १९४६ असा दिला आहे. ज्यांना पं. नेहरूंच्या कुंडलीचा व त्यांच्या आयुष्याचा अभ्यास करावयाचा असेल त्यांच्यासाठीं ही कुंडली येथें मुद्दाम देत आहोंत.

## जन्मकुंडली




● ● ●

# पं. जवाहरलाल यांच्या जीवनांतील ठळक प्रसंगांची सनावलि

परिशिष्ट : ३ :

| | | |
|---|---|---|
| १४ नोव्हेंबर | १८८९ | —अलाहाबाद येथें जन्म. |
| मे | १९०५ | —उच्च शिक्षणासाठीं इंग्लंडला प्रयाण. |
| | १९१० | —केंब्रिज कॉलेजांतून बी. ए. |
| | १९१२ | —बॅरिस्टर होऊन हिंदुस्थानांत परत. |
| डिसेंबर | १९१२ | —बांकीपूरच्या कॉंग्रेसला हजर. |
| वसंतपंचमी | १९१६ | —कु. कमला कौल यांच्याशीं दिल्ली येथें विवाह. |
| ६ डिसेंबर | १९२१ | —पहिला तुरुंगवास—६ महिने शिक्षा. |
| ३ मार्च | १९२२ | —मुक्तता. |
| ११ मे | १९२२ | —पुन्हां अटक व तुरुंग ( १ वर्ष ९ महिने ) |
| ३१ जानेवारी | १९२३ | —सुटका. |
| मे | १९२३ | —नाभा संस्थानांत प्रवेश-बंदी व अटक. |
| | १९२७ | —परदेशीं प्रयाण; मॉस्को येथें झालेल्या सोव्हिएट वार्षिकोत्सवास हजर. |
| २९ डिसेंबर | १९२९ | —लाहोर कॉंग्रेसचे अध्यक्ष |
| ४ एप्रिल | १९३० | —कायदेभंगाबद्दल शिक्षा ( ६ महिने ) |
| ११ ऑक्टोबर | १९३० | —सुटका. |
| १९ ऑक्टोबर | १९३० | —राजद्रोहाच्या कायद्याखालीं २ वर्षें शिक्षा. |
| २६ जानेवारी | १९३१ | —आकस्मिक मुक्तता. |
| ६ फेब्रुवारी | १९३१ | —पं. मोतीलाल नेहरू यांचा मृत्यु. |
| ५ मार्च | १९३१ | —गांधी-आयर्विन करार. |

| | | |
|---|---|---|
| ४ जानेवारी | १९३२ | —राजद्रोही भाषणाबद्दल २ वर्षें शिक्षा. |
| ९ ऑगस्ट | १९३३ | —तुरुंगांत 'जगाच्या इतिहासाची ओझरती ओळख' हा ग्रंथ पुरा केला. |
| ३० ऑगस्ट | १९३३ | —सुटका. |
| ११ फेब्रुवारी | १९३४ | —पुन्हां अटक व तुरुंगवास ( २ वर्षें ) |
| १४ फेब्रुवारी | १९३५ | —नैनीच्या तुरुंगांत आत्मचरित्र पुरें केलें. |
| ४ सप्टेंबर | १९३५ | —कमला नेहरूंच्या आजारीपणामुळें मुक्तता. |
| ५ सप्टेंबर | १९३५ | —युरोपला प्रयाण. |
| २८ फेब्रुवारी | १९३६ | —कमला नेहरूंचा मृत्यु. |
| १२ एप्रिल | १९३६ | —लखनौ काँग्रेसचे अध्यक्ष. |
| २१ डिसेंबर | १९३६ | —काँग्रेसचे तिसऱ्यांदा अध्यक्ष—फैजपूर. |
| | १९३७ | —ब्रह्मदेश–मलाया या देशांना भेट. |
| | १९३८ | —स्पेन, झेकोस्लोव्हाकिया इत्यादि देशांना भेटी. |
| २० ऑगस्ट | १९३९ | —चीनला प्रयाण. |
| १ सप्टेंबर | १९३९ | —हिंदुस्थानांत परत. |
| ऑक्टोबर | १९४० | —४ वर्षें शिक्षा. |
| ४ डिसेंबर | १९४१ | —मुक्तता. |
| ९ ऑगस्ट | १९४२ | —मुंबई येथें अटक व अहमदनगर येथें स्थानबद्ध ( नववा तुरुंगवास ) |
| सप्टेंबर | १९४४ | —अहमदनगरच्या किल्ल्यांत 'भारताचा शोध' हा ग्रंथ लिहून पुरा केला. |
| १५ जून | १९४५ | —१०४१ दिवसांच्या स्थानबद्धतेंतून सुटका. |
| २ सप्टेंबर | १९४६ | —राष्ट्रीय सरकारचे उपप्रमुख म्हणून अधिकारग्रहण. |
| | १९४६ | —सरहद्द प्रांतांत दौरा व प्राणावर प्रसंग. |
| १ डिसेंबर | १९४६ | —इंग्लंडला प्रयाण. |

| | | |
|---|---|---|
| १३ डिसेंबर | १९४६ | —घटना-परिषदेंत उद्दिष्टासंबंधींचा ठराव मांडला. |
| जानेवारी | १९४७ | —हिंदी स्वातंत्र्याची चर्चा करण्यासाठीं इंग्लंडला प्रयाण. |
| १५ ऑगस्ट | १९४७ | —हिंदुस्थान स्वतंत्र झाला. |
| ,, | ,, | —स्वतंत्र हिंदुस्थानचे पाहिले मुख्य प्रधान. |
| ३० जानेवारी | १९४८ | —दिल्ली येथें म. गांधींची हत्या. |
| डिसेंबर | १९४८ | —कॉमनवेल्थ परिषदेसाठीं लंडनला भेट. |
| ७ मार्च | १९४९ | —अमेरिकेंत येण्यासाठीं प्रे. ट्रूमन यांचें आमंत्रण. |
| ७ ऑक्टोबर | १९४९ | —अमेरिकेस प्रयाण. |
| ११ ऑक्टोबर | १९४९ | —प्रे. ट्रूमन यांच्या ‘ इंडिपेंडन्स ’ या खास विमानांतून वॉशिंग्टन येथें पं. नेहरूंचें आगमन. १९ तोफांची सलामी. प्रे. ट्रूमन आपल्या मंत्रिमंडळासह स्वागतासाठीं हजर. |
| १७ ,, | ,, | —न्यूयॉर्क शहरातर्फे पं. नेहरूंना मानपत्र. |
| ,, | ,, | —कोलंबिया विद्यापीठातर्फे पं. नेहरूंना ‘ डॉक्टर ऑफ लॉज ’ ही बहुमानाची पदवी अर्पण करण्यांत आली. |
| २० ,, | ,, | —लेक सक्सेस येथील यूनो कचेरीला पं. नेहरूंची भेट. |
| २४ ,, | ,, | —ओटावा येथें कॅनडाच्या पार्लमेंटपुढें पं. नेहरूंचें भाषण. |
| १ नोव्हेंबर | १९४९ | —सॅन्फ्रॅन्सिस्को येथें पं. नेहरूंचें स्वागत. कॅलिफोर्निया विद्यापीठांत भाषण. |
| ७ नोव्हेंबर | १९४९ | —अमेरिकेचा दौरा संपवून हिंदुस्थानकडे रवाना. |
| १४ नोव्हेंबर | १९४९ | —मुंबईस दाखल. |